# तीर्थरूप महाराष्ट्र

पं. महादेवशास्त्री जोशी

म. ग्रं. सं. ठाणे
विषय भू प्रवास
सं. क्र. ५८७




REFBK-0020795
REFBK-0020795

# तीर्थरूप महाराष्ट्र

## भाग दुसरा

पं० महादेवशास्त्री जोशी •



कॉन्टिनेन्टल प्रकाशन •

पं. महादेवशास्त्री जोशी यांची ग्रंथसंपदा

**कथा**

| | |
|---|---|
| वेलविस्तार | खडकातील पाझर |
| विराणी | मोहनवेल |
| कल्पित आणि सत्य | भावबळ |
| प्रतिमा | प्राचीन सुरस गोष्टी ( भाग १ ते १० ) |

**यात्रावृत्त**

तीर्थरूप महाराष्ट्र ( भाग १ व २ )
महाराष्ट्राची धारातीर्थे ( भाग १ व २ )

**इतर**

| | |
|---|---|
| गुणमंदिर | कल्पवृक्ष |
| ज्ञानेश्वरी - प्रवेशिका | गोड स्त्रीगीते |
| नवनीत रामायण | नवनीत भारत |
| सुलभ काव्यशास्त्र | नवनीत भागवत |

या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने
मिळालेला सवलतीच्या दरातील कागद वापरला आहे.

● द्वितीय आवृत्ती १९५३
● तृतीय आवृत्ती १९५६
● चतुर्थ आवृत्ती १९६१
● षष्ठम आवृत्ती १९७५

● किंमत पाच रुपये

प्रकाशक ●
अनंत अंबादास कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयानगर कॉलनी
पुणे : ३०

सर्व हक्क लेखकाधीन ●

मुखपृष्ठ : सजावट ●
पंडित सोनवणी
नासिक

मुद्रक ●
न. शं. कुलकर्णी
टीचर्स प्रिंटिंग प्रेस
७२०/२० नवी पेठ
पुणे : ३०

मराठी ग्रंथ संग्रहालय
२०८९५

माझे कृपावंत सासू-सासरे
कै० ती० दत्तात्रय घनश्याम फडके
आणि
कै० ती० सौ० जानकीबाई फडके
यांस सादर समर्पण



# प्रस्थान

महाराष्ट्र म्हटला, की एक विस्तीर्ण त्रिकोण डोळ्यांपुढे उभा राहतो. उत्तरेला तो सातपुड्याच्या पर्वतश्रेणीला जाऊन भिडला आहे. त्याचे दक्षिण टोक कारवारपर्यंत खाली गेले आहे. पूर्व बाजूने तेलंगण ही त्याची सीमारेषा आहे. आणि पश्चिमेला सह्याद्रीचा घाट उतरून तो थेट पश्चिम सागरात जाऊन भिजला आहे. ' महाराष्ट्र म्हणजे महंत राष्ट्र। म्हणौन महाराष्ट्र। ' आणि तो आपला महाराष्ट्र !

महाराष्ट्राच्या पाठीशी सुमारे तीन हजार वर्षांची परंपरा आहे. अगस्त्यापासून महाराष्ट्राच्या कर्त्या पुरुषांची परंपरा सुरू होते. दंडकारण्यात महाराष्ट्राच्या निर्मितीची मुहूर्तमेढ त्याने रोवली. शकपूर्व सातव्या शतकापासून या प्रदेशात आर्यांची रीघ लागली. शकपूर्व तिसऱ्या इथे रट्टांची छोटी छोटी राज्ये निर्माण झाली. आर्यांपैकीच शेकडो गोत्रांचे रट्ट म्हणजे शाण्णव कुळीचे मराठे इथे वेगवेगळ्या विभागांवर वर्चस्व गाजवू लागले. पुढे या छोट्या राष्ट्रांचे मिळून महाराष्ट्र सिद्ध झाले. जे महाकांतार होते, तेच महाराष्ट्र बनले.

या प्रदीर्घ कालावधीतल्या महाराष्ट्राच्या इतिहासाचे समग्र दर्शन घ्यायचे तर ते ' विश्वरूपदर्शन 'च ठरेल. मौर्यांपासून इंग्रजांपर्यंत कितीतरी राजवटी इथे ' उत्पद्यन्ते विलीयन्ते ' झाल्या. अनेक संघर्ष माजले आणि शमले. कित्येक धर्मपंथ आणि उपासनामार्ग यांचा इथे विकास आणि संकोच झाला. अनेक पुरे पट्टणे भरभराटली आणि पडली. नवे देव आले, नवे आदर्श निर्माण झाले

आणि नवी तीर्थेही माहात्म्य पावली. बऱ्यावाईट दोन्ही प्रकारांनी महाराष्ट्राचा इतिहास हा अद्‌भुत इतिहास आहे.

महाराष्ट्राच्या एकेका अंगाचे दर्शन, अनेक विद्वान संशोधकांनी परिश्रमपूर्वक घेतले आहे. कोणी राजकारणाचे, कोणी इतिहासाचे, कोणी वाङ्‌मयाचे, कोणी संस्कृतीचे, कोणी विद्या-कलांचे, तर कोणी शिल्प आणि स्थापत्य यांचे. महाराष्ट्राच्या तीर्थक्षेत्रांचीही प्रवासवर्णने झालेली आहेतच. आणि या ज्ञानभांडारातून माझ्या अल्पशा मुठीत मावले, तेवढे द्रव्य घेऊन मी या तीर्थयात्रेचे प्रस्थान ठेवले.

माणूस ज्या वेळी एखाद्या अनोळखी प्रांतात पदार्पण करू इच्छितो, त्या वेळी पूर्वी कोणीतरी ती वाट मळवलेली आहे की काय, ते पाहण्याची त्याला सहज जिज्ञासा होते. त्याप्रमाणे मीही महाराष्ट्राच्या स्थलवर्णनाची यात्रिकांनी आणि प्रवाशांनी लिहिलेली काही पुस्तके वाचली. त्या त्या क्षेत्रापुरती मर्यादित असलेली वर्णनात्मक पुस्तके मिळण्यासारखी होती, तीही मिळवून नजरेखाली घातली. आणि हे सर्व वाङ्‌मय वाचून मला असे वाटले, की याहून अगदी वेगळ्या रीतीने ‘ तीर्थरूप महाराष्ट्रा ’चे महात्म्य आजच्या पिढीला सांगता येण्यासारखे आहे आणि सांगणे जरूर आहे. केवळ प्रवासवर्णन हे पल्लवग्राही होते. केवळ पुराणातले आधार देऊन त्या त्या क्षेत्रातल्या प्रत्येक स्थानाचे महात्म्य प्रतिपादणे उपहासास्पद ठरते. आणि प्रत्येक गोष्टीचा बारीकसारीक तपशील देण्याची गरज नसते. या सर्व गोष्टीत तारतम्य राखून आणि वाचकाला क्षेत्राचे दिव्यत्व आणि पावकत्व तेवढे प्रतीत व्हावे, अशा धोरणाने मी ही लेखमाला लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

माझ्या डोळ्यांपुढे जो वाचकवर्ग आहे, तो सश्रद्ध तर आहेच ; शिवाय रसिक आणि तत्त्वजिज्ञासूही आहे. अशा त्या वाचकवर्गाच्या मनःप्रसादासाठी ही माझी साहित्यसाधना आहे. त्यामुळे क्षेत्रात असे असे देऊळ आहे, अशी अशी देवप्रतिमा आहे आणि असा असा तिचा परिवार आणि परिसर आहे, एवढ्या वर्णनावरच मी थांबलो नाही. तर त्या देवतेच्या मागे केवढा इतिहास उभा आहे, त्या दैवतसंप्रदायाचा महाराष्ट्रावर कोणता आणि केवढा प्रभाव पडला आहे, तिथले स्थापत्य आणि शिल्प कोणत्या जातीचे अन् कालातले आहे, कोणते दिव्य भौम उत्पात आणि विधर्मीयांचे अत्याचार त्या त्या क्षेत्राला सोसावे

लागले आहेत, त्या त्या तीर्थाविषयी आणि देवतेविषयी पुराणकारांची आणि कविजनांची रसवंती काय बोलली आहे, आणि महाराष्ट्राच्या लोकगीतांतून आणि स्त्रीगीतांतून, त्यासंबंधीचे कोणते उल्लेख आढळतात, इत्यादी अनेक गोष्टीचे यावच्छक्य निदर्शन प्रवासवर्णनाच्या अनुरोधाने मी केले आहे.

तीर्थ आणि देव यांचा आपण समजतो, त्याहून फार मोठा व्यापक अर्थ आहे. केवळ कुंड किंवा जलप्रवाह म्हणजे तीर्थ नव्हे. केवळ मूर्ती म्हणजे देव नव्हे. पुण्यश्लोक महाभागांनी जे वसवले, ऋषि–मुनींनी जिथे तपे आणि व्रते आचरली, संत-महंतांनी जिथे राहून असंख्य जनांना कर्मभक्ति-ज्ञान उपदेशिले, ते क्षेत्र म्हणजेच तीर्थ. तपोनिधी आणि भक्तराज हेच जलांना तीर्थपदवी देतात आणि मूर्तींना देवकळा चढवतात. पितृभक्त पुंडलीक भीमेच्या तीरावर सेवाधर्म आचरीत बसला आणि मग परब्रह्म स्वतःच्या पायांनी त्याच्या भेटीस आले. आधी अगस्त्य मुनीने आणि नंतर रामप्रभूने वास्तव्य केल्यामुळे पंचवटी-परिसराला तीर्थरूपता लाभली. गौतमाची तपोभूमी म्हणूनच ब्रह्मगिरीचा महिमा विस्तारला. श्रीनरसिंहसरस्वती लोकोद्धारासाठी बारा वर्षे राहिले म्हणूनच कृष्णातीराला आगळे महत्त्व आले. हा सर्व अर्थ लक्षात घेऊनच कविकुलगुरूने तीर्थ शब्दाची व्याख्या केली आहे –

**यदध्यासितमर्हद्भिस्तद्धि तीर्थं प्रचक्षते ।**

‘ जे पूज्य पुरुषांनी वसवले, तेच तीर्थ ! ’

आपला महाराष्ट्र सह्याद्रीने उत्तुंग झाला आहे. सागराने गंभीर बनला आहे. आणि कृष्णा, गोदा, भीमा, तापी या चार सरितांच्या प्रवाहांनी रसमय झाला आहे. महाराष्ट्रातली बरीचशी पुण्य क्षेत्रे या नद्यांच्या परिसरातच आहेत. या क्षेत्रांचे तीन वर्ग कल्पिता येतात–देवताक्षेत्रे, अवतारक्षेत्रे आणि संतक्षेत्रे. पंढरपूर, करवीर, त्र्यंबकेश्वर, भीमाशंकर, मोरगाव इत्यादी क्षेत्रे ही देवताक्षेत्रे होत. नरसोबाची वाडी, औदुंबर, पंचवटी, परशुराम ही अवतारक्षेत्रे होत. देहू, आळंदी, पैठण, सज्जनगड, ही संतक्षेत्रे समजावी.

भरतखंडात महाराष्ट्र प्रदेश अनेक दृष्टींनी वैशिष्टचपूर्ण आहे असे म्हटले तर तो ‘ प्रांतीयतेचा संकुचित अभिमान ’ ठरू नये. तीर्थक्षेत्रांच्या बाबतीतही महाराष्ट्राला असामान्यत्व आहे. करवीर आणि नासिक-त्र्यंबकेश्वर ही भारतीय कीर्तीची दोन पुराणक्षेत्रे महाराष्ट्रात आहेत. शिवशंकराची तर या प्रदेशावर

विशेषच कृपा. बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाच ज्योतिर्लिंगे एकटचा महाराष्ट्राच्या वाटचाला आली आहेत. अष्टविनायक हे गणपतीचे आठ अवतार, तर सर्वस्वी महाराष्ट्राचेच आहेत. दत्तावताराचे तर महाराष्ट्र हे कार्यक्षेत्र. भारत वर्षात जगदंबेची जी साडेतीन पीठे आहेत, त्यातली दोन मुख्य पीठे करवीर आणि माहूर–ही महाराष्ट्रातच मांडली आहेत. आणि महाराष्ट्राला परम भाग्याने लाभलेली ज्ञानेश्वरादी संतपरंपरा ! या बाबतीत कोणीही महाराष्ट्राला 'धन्य धन्य' म्हणावे.

महाराष्ट्राची तीर्थे म्हटली तरी सर्व तीर्थांची वंदना मला करता येणार नाही. मी प्रमुख आणि प्रातिनिधिक क्षेत्रे तेवढी निवडली आणि त्यांचा प्रपंच केला. शिव, विष्णू, देवी, दत्त आणि गणपती हीच आपली प्रमुख दैवते होत. त्या सर्वांची 'वाङ्मयी पूजा' या पुस्तकाच्या दोन्ही भागांत मिळून झालेली आहे. कृष्णा, गोदा, भीमा या महानद्यांच्या यशोलहरीही यात उठलेल्या आहेतच.

माझ्या बाबतीत हे उभयभागात्मक पुस्तक महद्‌भाग्याचे ठरले आहे. याच्या पाच आवृत्त्या योग्य कालावधीत संपल्या. वाचकांनी या पुस्तकावर खूप प्रेम केले. अनेकांना त्यातून महाराष्ट्रयात्रेची प्रेरणा झाली. कित्येकांनी मला तशी लेखी-तोंडी पावती पण दिली. पण गेली काही वर्षे हे पुस्तक बाजारात उपलब्ध नव्हते. त्याच्या पुन्हा प्रकाशनात काही अडचणी निर्माण झाल्या होत्या.

पण या बाबतीत माझे एकान्तमित्र श्री. अनंतराव कुलकर्णी पुढे आले. त्यांचे सुपुत्र श्री. अनिरुद्ध कुलकर्णी यांनी त्यांच्या विचाराला होकार भरला. श्री. कुलकर्णी यांचे कॉन्टिनेन्टल प्रकाशन मराठीच्या प्रकाशनक्षेत्रात नाव मिळवून राहिले आहे. त्या प्रकाशनाच्या द्वारे माझे तीर्थरूप महाराष्ट्र नव्याने पुढे येत आहे. याचा मला खूप आनंद होतो. त्या पिता-पुत्रांना मनःपूर्वक धन्यवाद.

प्रस्तुत पुस्तकाच्या दोन्ही भागांचे मी पुनर्लेखन केले आहे. काही अनावश्यक अन् कालबाह्य मजकूर काढला आहे. काही नवी भर टाकली आहे. गोकर्ण महाबळेश्वर आणि गाणगापूर ही क्षेत्रे वगळली आहेत. कारण ती महाराष्ट्रात येत नाहीत. माहूरची रेणुका हा नवा लेख समाविष्ट केला आहे. वाचकांनी या गोष्टीची नोंद घ्यावी.

आषाढ शुद्ध एकादशी<br>शके १८९७

– महादेवशास्त्री जोशी

अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | परशुराम क्षेत्र | १ |
| २ | तुळजाभवानी | १८ |
| ३ | भीमाशंकर | ३६ |
| ४ | वेरुळचा घृष्णेश्वर | ५१ |
| ५ | रामटेक | ६५ |
| ६ | नाथांचे पैठण | ७५ |
| ७ | धन्य देहू गाव | ९२ |
| ८ | आळंदीची वारी | १०५ |
| ९ | माहूरची रेणुका | १२३ |

# १. परशुराम क्षेत्र

समंत पंचक क्षेत्रात एक अतिभव्य यज्ञ सुरू होता. भार्गव परशुराम त्याचा यजमान होता. दुष्ट क्षत्रियांच्या संहाराचे अंगीकृत कार्य तडीस नेल्यानंतर शस्त्र खाली ठेवण्याच्या वेळचे ते जणू व्रतोद्यापन होते. त्या वेळी साऱ्या उत्तर भारताचा तो सार्वभौम सम्राट होता. पृथ्वीवरची सर्व धन-वैभवे त्याच्या मालकीची होती. आणि म्हणूनच तो यज्ञ सर्वांगी सुसंपन्न होता. वेदशास्त्रपारंगत तपोधन त्या ठिकाणी ऋत्विज म्हणून आले होते. ज्याने परशुरामाला उपनयन प्रसंगी द्विजत्वदीक्षा दिली, तो कश्यप महामुनी त्या यज्ञाचा अध्वर्यू होता. यज्ञाची दहा वाव लांब आणि नऊ वाव रुंद असलेली वेदी अंतर्बाह्य सुवर्णाची होती, यावरून इतर यज्ञपात्रांची कल्पना करावी.

यज्ञ समाप्त झाल्यावर सर्व ऋत्विजांना भरपूर दक्षिणा मिळाली. जे याचक होते, ते धनी झाले. अध्वर्यूचा अधिकार मोठा, तसे त्याला मिळायचे दानही मोठे. ते देताना रणयज्ञात संपादिलेल्या समस्त भूमीचे परशुरामाने कश्यपाच्या हातावर दानोदक सोडले. निरासक्त होऊन आणि 'न मम' म्हणून. मानव-जातीच्या इतिहासातले ब्राह्मणाने ब्राह्मणाला दिलेले हे पहिले अन् शेवटचे महादान होय. क्षणापूर्वीचा सम्राट दुसऱ्याच क्षणाला हसतमुखाने अकिंचन झाला. भूमीशी त्याला काही कर्तव्य नव्हते. राजदंडाचा त्याला लोभ नव्हता. दुष्ट दुर्मद क्षत्रियांवर दंडप्रहार करता करता ती भूमी त्याच्या पायाशी लोळण घेऊन आली होती. त्याला तिचे ओझे झाले होते. आणि म्हणूनच तो घाई-घाईने आपल्या स्वामित्वाचा त्याग करून सोवळा झाला होता.

पण ते दानोदक हातावर वाळायच्या आतच कश्यपाने त्याला सुनावले. 'माझ्या भूमीत तू राहू नको. तुझा इथला हक्क संपला.' परशुरामाने कसलीही खळखळ न करता ती आज्ञा शिरसावंद्य मानली. तो नर्मदापार

करून खाली सह्याद्रीकडे आला आणि घाट उतरून पश्चिम समुद्राच्या तीरी दाखल झाला.

ज्या भूमीत त्याने पदार्पण केले होते, ती नव्याने जन्माला आली होती. ती ‘ काश्यपी ’ नव्हती. सह्याद्रीची सतत पायधुणी करणाऱ्या सागराच्या कुशीतून ती वर आली होती. भृगुकच्छा (भडोच) पासून तो तहत कन्याकुमारीपर्यंतच्या या प्रदीर्घ पट्टीवर थोड्याच कालात वन्य वृक्षांची दांगे माजली होती. दऱ्या-दरकुटयात रानटी पशूंची वाढ झाली होती. वृक्षकोटरांत पक्षिगण जमला होता. आता तिथे शिकार भरपूर मिळण्यासारखी होती. म्हणूनच अनार्य, असंस्कृत असे कोंग लोक तिथे घरकुले करून राहिले होते. घाटावरचे लोक म्हणूनच त्या भूमीला कोंगवणच म्हणायचे. जसे कोळ्यांचे ‘ कोळवण ’, गोंडांचे गोंडवन, तसेच हे कोंगांचे कोंगवण. कोण्यातरी माणसाने त्यातला व खाऊन टाकला आणि ते कोंगण झाले. आणि त्यातही वर्णभेद होऊन कोकण हा सुट-सुटीत शब्द रूढ झाला.

पण ती भूमी अजून संस्कारहीन होती. अजून तिथे नांगराचा फाळ शिरायचा होता. कुदळीच्या टोची बसायच्या होत्या. खोरे अंगात घुसायचे होते. त्रिकोण चौकोनांच्या कणेरांगोळ्या काढणारा, ती भूमी धान्यधारक करणारा शेतकरी अजून तिथे अवतरायचा होता. खरे म्हणजे त्या भूमीचा उद्धारकर्ता अजून तिला भेटायचा होता. परशुरामाच्या रूपाने त्याचे आगमन झाले आणि त्या नवभूमीने त्याला ‘ स्वागतम् ’ म्हटले.

परशुराम हीच भूमी आता आपली म्हणणार होता. त्याने ठरवले, की आपण हिच्यात सौंदर्य आणायचे. हिला कलेची भूमी बनवायचे. या तांबड्या जांभ्या दगडाच्या मातीत नवजीवनाचे उद्यान फुलवायचे. आजवर त्याने केले होते ते संहाराचे कार्य. वाहवले होते ते रक्ताचे पाट. नररुंडे परशूच्या घावाने अंतराळात उडवण्याचा अघोरी खेळ अपरिहार्य म्हणून त्याला खेळावा लागला होता. त्याच्या अंतरातल्या विधायक प्रवृत्तींना डोके वर काढायला कधी उसंतच मिळाली नव्हती. संहाराच्या तांडवात सर्जनाचे लास्य दडपले गेले होते. ते आता रोमारोमांतून प्रकट झाले.

पण हे प्रचंड कार्य केवळ दोन हातांनी सिद्धीला जाण्याजोगे नव्हते. सहस्रावधी हात एकजुटीने त्यासाठी राबायला हवे होते. म्हणून प्रथम परशुरामाने

कुठून तरी चौदा गोत्रांची चौदा ब्राह्मण कुळे समुद्रमार्गे या भूमीवर उतरवली. नेमकी कुठून ते इतिहासवेत्ते अजून सांगत नाहीत. कोणी म्हणतात, की चित्पावनांचे हे मूळ पुरुष इराण, इजिप्त, पॅलेस्टाइन इकडून कुठून तरी आले असावेत. तर कोणी म्हणतात, की वरच्या भारतातूनच परशुरामाने आपले आवडते हे ब्राह्मण इकडे आणले. विधात्याने विश्वसृष्टी वाढवण्यासाठी जसे कश्यपादी दहा मानसपुत्र निर्मिले, तसेच हे त्याच कार्यासाठी आणलेले चौदा चित्पावन परशुरामाचे मानसपुत्र होत. सारस्वतांचा इतिहासही असेच सांगतो. ते म्हणतात, परशुरामाने आमची चौदा कुटुंबे कोकणच्या भूमीत उतरवली.

ही नवागत कुटुंबे परशुरामाला स्वामीच नव्हे; तर देव मानू लागली. परशुरामाच्या योजकतेला अनुसरून ही मंडळी जीवेप्राणे त्या भूमीत खपू लागली. मोकाट वाढलेली जंगले त्यांनी तोडली. ओढयांना बांध घालून पाट काढले ' माळियें जेंउते नेले । तेउते निवांतची गेले ' असे ज्ञानेश्वर म्हणतात. त्याप्रमाणे ते पाणी त्यांना इष्ट असलेल्या जागी झुळझुळू लागले. केळी पोफळींची प्रमाणबद्ध लागवड झाली. पोफळी म्हणजे सुंदरसुकुमार ललना. वाऱ्याने जरा आधिक दांडगाई केली, की त्या पिळवटून निघायच्या. दक्षिणायन लागले की पोफळींचे तेवढे अंग उभे करपून जायचे. म्हणून मग त्यांच्या रक्षणासाठी समर्थ असे आंबे फणस त्यांच्या भोवती लोकांनी वाढवले. मधून मधून माडांची लावणी केली. माड म्हणजे कोकणचा कल्पवृक्ष. स्वर्गातल्या कल्पवृक्षांनी लाजून डहाळ्या पाडाव्या अशी त्यांची उंची आणि समृद्ध फलसंपदा. त्यांची शहाळी म्हणजे जणू अमृताचे कलश. त्यांचे मिष्ट, मधुर जल पाहूनच ' सुधा भीता दिवंगता ' असे आम्हाला वाटते. या माडांनी त्या राबणाऱ्या लोकांच्या घरावर अन् अंगणावर कृपाछत्र धरले. शेताच्या बांधावर उभे राहून ते राखणदारी करू लागले.

समतळ भूमीत भातखाचरे तयार झाली. शेताशेतांतून पिवळी धान्यलक्ष्मी डोलू लागली. चित्पावनांचाही वंशवेल वाढला, सारस्वतांचाही वाढला. वसाहत विस्तारत चालली. नवनवे भूप्रदेश लागवडीखाली येऊ लागले. सगळे तळ कोकण हिरवे झाले. चिरंजीव परशुरामाने चिपळूणच्या डोंगरावरून दूर दृष्टीने हे सगळे पाहिले. त्याच्या डोळ्यांची धणी पुरली. जीवनातल्या कृतार्थतेचे सुखसमाधान तो अनुभवू लागला. पूर्वी एका काळी तो कलिंग देशातल्या मही

नदीकाठच्या महेंद्रपर्वतावर वास्तव्य करून होता. आता त्याने चिपळूणच्या डोंगरावरच वास्तव्य करायचे ठरवले. त्यालाच दुसरा महेंद्र पर्वत मानले.

आणि याच डोंगरावर त्या सहाव्या अवताराच्या दर्शनासाठी आम्ही त्या दिवशी निघालो होतो. महाराष्ट्रातली इतर क्षेत्रे हिंडताना मी आनंद उपभोगला नव्हता असे नव्हे. पण या कोकणभूमीचा प्रवासी होताना मला होणारा आनंद हा निजानंद होता. कोकणही माझी जन्मभूमी अन् माझ्या पूर्वजांची कर्मभूमी होती. माझ्या भावनांचे अदृश्य पण अतूट धागे तिथे गुंतलेले होते. एस्. टी. च्या बसला ताशी तीस मैल ही वेगमर्यादा असली तरी माझ्या मनाच्या रहंवराला कोण आवरणार ! पुणे ते थेट चिपळूण अशा वाऱ्या करणाऱ्या गाडीत बसलो असता माझे मन सह्याद्रीच्या शिखरांवरून खाली झेपावत होते.

पाटण सुटले अन् कोयना भेटली. ती कऱ्हाड क्षेत्री कृष्णेशी प्रीतिसंगम करायला निघाली होती. आमचा रस्ता तिच्या उगमाकडे चालला होता. आटपसर पात्र अन् बेताचेच पाणी. आगामी हिवाळा आताच तिच्या मुळावर आला होता. पात्र ठायी ठायी उघडे पडले होते. वर्षाकाळी ज्यांच्या डोक्यावरून पाणी जायचे, ती लव्हाळी अन् झुडपे आता 'तटस्थ' झाली होती. पण अशा या पडत्या काळीसुद्धा कोयना संथ होती, प्रसन्न होती. अजून ती तीरावरच्या मळचांना पोशीत होती. बारा वाटांनी वैभव पळू लागले तरी आपले दान-धर्माचे व्रत न सोडणाऱ्या एखाद्या सत्त्वधीर गृहलक्ष्मीसारखी ती मला वाटली.

आमचा तांबडा रस्ता तिला कसा समांतर जात होता. नदी जरा 'डोंगी' झाली की रस्त्यानेही जरासे अंग वाकडे करावे. तिने डावीकडचे मोठे वळण घेतले की वाटायचे, आता हिची अन् आमची फारकत होणार. पण रस्ताही नेमके तसेच अन् तेवढेच वळण घेऊन तिला म्हणे, 'मी नाही एवढ्यात तुझ्या-पासून दूर होणार !' तिने उजवी मोहर दाखवली की मी म्हणे, 'आता हिचे उल्लंघन करावे लागणार.' पण रस्ता कसला वस्ताद ! तोही आपल्या शरीराला तसाच बाक देई. अखेर आम्ही ग्रामसीमेजवळ तिचा पूल ओलांडला. ती सह्यकन्या मग उजवी वळता वळता आम्हाला बोलली, 'शुभास्ते पंथानः सन्तु!'

हेळवाकच्या पुढे कासटीवाले कुळवाडी गाडीत चढ़ू लागले. निसर्गात फरक पडला तसा भाषेतही. वाटेत गुरांची गोठण दिसली. गाई पोटभर पाणी

पिऊन वृक्षच्छायेत डुलकी घेत होत्या. दुधाची तलफ आलेले एक वासरू आईला ढुशा देऊन ' ऊठ ' म्हणत होते. रानातल्या नाचणीच्या शेतांची कापणी सुरू झाली होती. भ्रूविलासांना अनभिज्ञ असलेल्या कृषकवधू आमच्या धावत्या गाडीकडे नेत्रदले फुलवून पाहात होत्या. अशी ओझरती दृश्ये पाहात पाहात थोड्याच वेळात आम्ही सह्याद्रीच्या माथ्यावर दाखल झालो.

आजचे तिथले कोयनानगर अजून निर्माण व्हायचे होते. सह्याद्रीच्या पोटात अजून भुयारी पाट खोदले जायचे होते. अजून धरण व्हायचे होते. खालचे वीजकेंद्र लखलखायचे होते. हे सारे निर्मितिवैभव अजून स्थापत्यविशारदांच्या कल्पना-जगातच होते. अजून भूकंप व्हायचे होते. लोकांना अकल्पित असे खाली अन् वर धक्के बसायचे होते. कोकणातले अन् घाटावरचे लोक अजून बिनघोर होते.

आता घाटाखाली असंख्य शिखरे, अनंत दऱ्या अन् अगणित वृक्ष पसरले होते. काही शिखरे सपाट होती, सुगम होती. तुटलेले काळे कडे भीतिदायक वाटत होते. बाहेर सर्वत्र उन्हे पडली होती. त्यांना घाबरलेल्या अंधाराला सह्याद्रीने आपल्या उदरात सुरक्षित जागा दिली होती. खरोखर आमच्या प्रवासगीतेतला हा विश्वरूपदर्शन योग होता. एकेक वळण घेऊन गाडी एकेक टेकडी उतरत होती. अर्ध्या-पाऊण तासात तिने पायथा गाठला. माझ्या काळजा-वरचे ओझे उतरले.

आता आम्ही वासिष्ठी नदीला उजवी ठेवून चिपळूण जवळ करीत होतो. जागोजाग भाताची रचलेली उडवी उंच दिसत होती. अजून मळण्या व्हायच्या होत्या. आश्विन पौर्णिमेला आग्रयण नवान्न शिजले असले तरी भाताच्या राशी अजून घरातल्या कणगीत पडायच्या होत्या. वासिष्ठी नदी या बाजूला अक्षरशः निर्जल होती. जणू उथळसा मोठा चरच. तिच्यातले ओबडधोबड गोटे राख फासल्यागत पांढुरके दिसत होते. जसे काही कुंभमेळ्याला जमलेले दसनाम गोसावीच. आम्ही चिपळुणात पोचलो अन् पाग नाक्यावर आमच्या मुक्कामी दाखल झालो.

चिपळूणहून परशुरामाला जाणारी गाडी गर्गाचार्यांच्या मुहूर्तावर निघत होती. त्या रात्री थंडीनेही चांगलाच प्रताप दाखवला होता. अंथरुणातून उठणे जिवावर आले. चालायला लागलो, तर हातपाय काकडून गेले. परशुरामाच्या डोंगरावर येऊन गाडी थांबली तरी अजून उषःप्रकाशाचा पत्ता नव्हता. तारका

अजून दिमाखात होत्या. झाडापेडातला अंधार अजून निश्चित होता. पाखरांचे प्रातःस्मरण अजून सुरू झाले नव्हते. त्यामुळे आम्हाला तिथल्या पथिकाश्रमात बराच वेळ थांबावे लागले. मालक वाचाळ होता. त्याच्या गोष्टी ऐकता ऐकता बाहेर फटफटीत उजाडले.

आम्ही तिथेच घसा गरम केला आणि देवळाकडे जायला निघालो. त्या अरुंद रस्त्यावरून निसर्गाच्या काव्याचे रसग्रहण करीत जात असता आमच्यापैकी कोणीतरी उद्गारले. 'तो पाहा समुद्र !' मी उजव्या बाजूला तोंड वळवले अन् थबकलोच. समुद्रच होता तो. पण खाऱ्या पाण्याचा नव्हे; तर धुक्याचा. वासिष्ठी नदीतून ते धुके वर उठले होते. तिकडची सारी सृष्टी आच्छादन घालून त्याने अदृश्य केली होती. 'वाढता वाढता वाढे' अशा क्रमाने त्याने तिकडचे डोंगरसुद्धा गिळीत आणले होते.काहींची फक्त बोटभर शिखरे वर उरली होती. पण त्यांचंही लक्षण ठीक दिसत नव्हतं. अजून लाटांचे लोट वर उठतच होते. पृथ्वी जणू विरघळून, बाष्परूप होऊन आपल्या 'द्यौस' पतीला सर्वांगी खेव द्यायला निघाली होती.

आले, आले ! ते आणखी वर चढले. खालच्या साऱ्या आसमंतावर धूसर पांघरूण पडले. आता ते मलाही वेढील. त्याच्या लाटा माझ्या डोक्यावरून जातील. मी द्रवरूप पण अपारदर्शक अशा भिंतीत कोंडला जाईन. विश्वापासून अलग, एकटा पडेन. मग मी मलाच जाणायचे. माझ्यावरच प्रेम करायचे. मीच एकटा माझा अन् बाकी सारे शून्य ! पण मी तरी आहे त्या स्वरूपात शिल्लक उरेन का ? कदाचित माझ्यातलेही पार्थिव अणू बाष्परूप बनतील. मीही अनेक तरंगांतला एक तरंग बनून अंतराळात भ्रमेन . . . या अभिनव कल्पनेसरशी मी एकदम निःशब्दाचा कवी झालो. त्या विशाल, मऊ मऊ काव्यातला रस 'दे दे' म्हणून पिऊ लागलो. एवढ्यात कोणीतरी माझी तंद्री मोडली. 'चला, पाय उचला !'

ज्या बाजूने आम्ही डोंगर चढलो, त्याच्या दुसऱ्या पालथणाला परशुरामाचे देऊळ होते. आता थोडे उतरायला हवे होते. त्यासाठी रुंदशी 'पाज' बांधलेली होती. तिच्या तोंडावरच गावकऱ्यांचे गोधन आम्हाला सामोरे आले. वरून वैदिक ऋषींच्या प्रकाशधेनू अवतरत होत्या आणि खालून या परशुरामाच्या गाई वर चढत होत्या. त्यांना वाट देऊन आम्ही खाली उतरू लागलो.

एक हजार फूट उंच डोंगरावर हे गाव वसले आहे. वस्तुतः गावाचे नाव आहे पेढे पण देवस्थानामुळे 'परशुराम' याच नावाने ते प्रसिद्ध झाले. लोकसंख्या दोन हजारांच्या आतच. ती वाढण्याची शक्यता कमीच. कारण मुलगा शिकला, मोठा झाला की तो मुंबईची बोट पकडतो. गावात उरतात ती म्हातारीकोतारी. कसेबसे आयुष्य ढकलायचे अन् एक दिवस देह ठेवायचा.

परशुरामाच्या भोवती पहिले मंडल आहे मानवांचे अन् दुसरे वृक्षांचे. प्रत्येक घरापुढे सारवलेले प्रशस्त अन् स्वच्छ अंगण. त्यावर झापांचा मांडव. कोकणाच्या संस्कृतीत अंगणाला फार महत्त्व आहे. तो जणू घराचाच एक महत्त्वाचा भाग. एका बाजूला तुळशी वृंदावन, कडेला शेवंती, अबोली अन् जाईजुई वाढवलेल्या. जास्वंदीचे अन् तगरीचे एखादे झाड तरी हवेच. आधी फुले देवाला, नंतर घरच्या लेकीसुनांना अन् उरली तर आल्यागेल्याला दृष्टिसुख द्यायला.



परशुरामाचे देऊळ

अशा या अंगणात कोणीही येऊन टेकावे. मुलाबाळांनी स्वच्छंद बागडावे. घरची गृहलक्ष्मी त्या अंगणातले खडेगोटे केरसुणीनेच नव्हे; तर निऱ्यांनीसुद्धा लोटील. पुढच्या वाटेवर इकडून तिकडून दहा पंधरा हात केरसुणी फिरवील. अतिथअभ्यागताला प्रसन्न वाटावे, हा त्यातला कोवळा भाव!

काहींच्या परसात लिंबिणी लागलेल्या होत्या. काहींच्या परसात पपनसे लोंबकळत होती. कुठे रसबाळचा केळ्यांचे घड गोपुच्छासारख्या लांब दांड्यांच्या बोंड्या हालवीत होते. प्रत्येक घराच्या भोवती गडगा उभारलेला. त्याबाहेर बांबूंची बने डोलत होती. फणस तर जिकडे तिकडे. कोकणचा दुसरा महावृक्ष म्हणजे फणस. त्याचा आसरा हा आमचा 'महापुरुषसंश्रय!' फणस फुटला की तो प्रथम आमच्या पानातली उजवी बाजू संभाळतो. पिकला म्हणजे रसाळ किंवा कापे गरे देतो. आणि उलगला तरी मातीत मिसळून भिंतीशी

लिपलेल्या आठळचा पावसाळ्यासाठी उरतातच. फणसांची संगत धरून कुठे कुठे कोकंबाची झाडे असायचीच. सरबत प्यावे, तर ते कोकंबाचेच !

हे सगळे आसमंत वैभव न्याहाळीत आम्ही चौघड्याखालच्या महाद्वारातून देवाच्या प्राकारात शिरलो. प्रथम तिथे स्नान करून शुचिर्भूत झालो अन् मग पुढे पाऊल टाकले. त्या विस्तीर्ण प्राकारात त्यावेळी एकही माणूस नव्हते. कुठे आवाज नाही, गोंगाट नाही. सगळे कसे नीरव, निवांत ! देवाजवळ जसे असायला पाहिजे तसे. तिथे भपका नव्हता; पण स्वच्छता होती. पंढरपूर–करवीरची संपदा नव्हती; पण स्वयंपूर्णता होती.

प्रथम देवदर्शन अन् मग आलतू फालतू चौकश्या, हे उचित समजून आम्ही सोळखांबी मंडपात आलो आणि तिथून गाभारा गाठला. हारीने उभ्या असलेल्या गाभाऱ्यातील तीन सुरेख, सायुध पाषाणमूर्तींनी माझे मन वेधून घेतले. डावीकडचा खालचे दोन्ही हात उताणे सोडलेला तो काम, उजवीकडचा तसाच दुसरा तो काल आणि मधला परशुराम. काल-काम हे विश्वेदेवांपेकी आहेत. पण त्यांनी परशुरामाचा शेजार का केला ते समजत नाही. तिथले लोक त्या तीन मूर्ती एकत्र पाहून त्यांना ब्रह्मा-विष्णु-महेश समजतात.

तिन्ही मूर्तींत परशुरामाची मूर्ती जरा अधिक उंच आहे. त्याच्या चार हातांपैकी खालचा हात अभय मुद्रेत आहे. बाकीच्या हातांत अनुक्रमे बाण, धनुष्य अन परशू अशी तीन आयुधे आहेत. याच परशूने प्रथम त्याने आईचे शिर तोडले आणि नंतर तोच परशू दुष्ट दुर्मद क्षत्रियांवर चालवला.



काम, परशुराम, काल

त्याचा पहिला शत्रू हैहय कुळातला सहस्रार्जुन. नर्मदेच्या उत्तर तीरावरची माहिष्मती म्हणजे आजचा ओंकार मांधाता ही त्याची राजधानी होती. हिमालयाच्या पायथ्यापर्यंत त्याचे साम्राज्य गाजत होते, हे साम्राज्य मिळवण्यासाठी हैहयांनी अनेक क्षत्रियांची राज्ये धुळीला मिळवली होती. त्यासाठी त्यांनी

वायव्य सरहद्दीपलीकडच्या शक, यवन, पल्हव, या लढाऊ जमातींची कुमक मागवली होती. हैहयांची आक्रमणे ब्राह्मणाइतकीच क्षत्रिय राज्य कर्त्यांनाही बाधली होती.

हैहय कार्तवीर्याने कारण नसताना जमदग्नीची होमधेनू त्याच्या आश्रमातून ओढून नेली. त्यानंतर काही कालाने लांडग्याची वृत्ती धारण करून खुद्द जमदग्नीचा म्हणजे परशुरामाच्या बापाचाच खून पाडला.

हैहयांच्याच वृत्तीचे अनेक क्षत्रिय राजे होते. त्यांना जणू ऊतमात आला होता. ब्रह्मजमातीचा उच्छेद करण्यात त्यांना आसुरी आनंद लाभत होता. आज अत्रीची कुचाळकी करावी, उद्या वसिष्ठांच्या आश्रमावर धाड घालावी, परवा आणखी कोणाच्या पर्णकुटीतून ब्राह्मणांच्या बायका-मुली पळवाव्या, कोणावर थुंकावे, कोणाचे अन्न भक्षावे, कोणाला जीवे मारावे, असे चीड आणणारे प्रकार वाढत्या प्रमाणात क्षत्रियांनी चालू केले होते. असल्या गोष्टी नित्य परशुरामाच्या कानांवर येत होत्या. त्याचे रक्त तापत होते. आणि जेव्हा कार्तवीर्याने खुद्द त्याच्या बापालाच ठार केल्याचे त्याने पाहिले, तेव्हा मात्र तो पुरता खवळला. त्याने आपला परशू उभारून प्रतिज्ञा केली. 'मी या दुर्मद क्षत्रियांचा संहार करीन!'

परशुरामाने लगेच आजूबाजूच्या तपोवनातल्या ब्रह्म युवकांची दुर्दम्य संघटना उभारली. रुद्राक्षांची माळ ओढणाऱ्या त्यांच्या हातात रौद्र शस्त्रे दिली. त्यांना धनुर्विद्येत तरबेज केले. 'स्वस्थ बसाल तर नामशेष व्हाल!' हे भीषण सत्य त्यांच्या काळजात ठसवले. हजारो ब्रह्म सैनिक परशुरामाच्या या मोहिमेत प्राणपणाने लढायला सिद्ध झाले. हैह यांनी ज्यांना ज्यांना सतावले होते, सुखाने अन्न खाऊ दिले नव्हते, असे काही क्षत्रिय राजेही या मोहिमेत परशुरामाला साह्यकारी झाले. मग परशुरामाने हैहयांसकट अनेक दुष्ट, छळक, अत्याचारी क्षत्रियांचा संहार केला.

खरे पाहू जाता परशुरामाने एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रिय केली, हा केवळ वदतोव्याघात आहे. केवढ्याही अतिपराक्रमी पुरुषाला ही गोष्ट अशक्य होती. वाल्मीकीने त्याला क्षत्रविमर्दन न म्हणता राजविमर्दन म्हटले आहे. ते लक्षात ठेवायला हवे. त्याने सरसकट क्षत्रियांवर शस्त्र धरले नव्हते, तर ते दुष्ट, दुर्जन राजांवर धरले होते. कृष्णावतारात कृष्णाने पांडवांना हाताशी धरून

जे आणि ज्या प्रकारचे कार्य केले, ते आणि त्याच प्रकारचे कार्य परशुरामाने आपल्या अवतारात केले. वाल्मीकीरामायण आणि रेणुका माहात्म्य या ग्रंथात अनेक ठिकाणी तसे स्पष्ट म्हटले आहे.

काही काळ हा ब्रह्म-क्षत्रांचा संघर्ष चालला. त्यात क्षत्रियांचीच हानी झाली असे समजायचे कारण नाही. ब्रह्मजमातीवरही त्याचे दुष्परिणाम घडायचे ते घडलेच. साऱ्या विधायक शक्ती संहारात गुंतल्यामुळे उभय जमातींचा उत्कर्ष थांबला. आणखी एक गोष्ट लक्षात ठेवायची ती ही, की परशुरामाच्या काळात ब्रह्म-क्षत्र या जाती बनल्या नव्हत्या. त्यांचे स्वरूप जमातींचे होते. या देशात दृढमूल व्हायचे तर त्या दोन्ही जमातींना कायमचे वैर धरून चालण्यासारखे नव्हते. काही झाले तरी ब्रह्म-क्षत्र हे एकमेकांचे शेजारी होते.

संघर्षाचा कंटाळा अन् उबग आल्यानंतर उभय समाजातले विचारवंत पुरुष-हा शेजारधर्म वाढवण्याच्या मार्गाला लागले. ‘ आमचे चांगले असेल ते तुम्ही घ्या ; तुमचे चांगले असेल ते आम्हाला द्या, असा हळूहळू परस्पर सहकार निर्माण होऊ लागला. हळू हळू मागचे घाव बुजू लागले, मने मिळू लागली. आणि याच सात्त्विक वृत्तीतून पुढे दाशरथी रामाच्या कालापर्यंत ब्रह्म-क्षत्रांचे ऐक्य अन् परस्पर पूरकत्व सिद्ध झाले. मग भगवान् मनूने ब्रह्म क्षत्रांच्या या वर्धिष्णू ऐक्याचे गोडवे गायले–

**ना क्षत्रं ब्रह्म भवति क्षत्रं ना ब्रह्म वर्धते ।**
**ब्रह्म-क्षत्रे तु संयुक्ते इहामुत्र च वर्धते ॥**

‘क्षत्रावाचून ब्रह्माचे अस्तित्व टिकणार नाही. ब्रह्मावाचून क्षत्र वाढणार नाही. ब्रह्मक्षत्र जर संयुक्त झाले, तर समाजाचे इहपर कल्याण साधेल. ’

ब्राह्मणांनी अध्ययन-अध्यापन करायचे, राजाचे पौरोहित्य करून त्याच्या-बरोबर राजकारणातही भाग घ्यायचा अन् क्षत्रियांनी वरील उभयविध कार्य करणाऱ्या ब्राह्मणांचे संरक्षण आणि संगोपन करायचे अशी शिस्त प्राचीन आर्य समाजात पाळली जात असे. ऐतरेय ब्राह्मणाच्या आठव्या पंचिकेत या शिस्तीचे विवेचन अन समर्थन केलेले आहे. शास्त्र अन शस्त्र यांच्या योजनापूर्वक सह-कार्याने संस्कृतीचे संवर्धन आणि सर्व समाजाचे संगोपन होते. असा समाज शास्त्राचा सिद्धान्त आहे.

परशुरामाच्या काळात वरील दोन शक्तींचा तोल बिघडला होता. तो बिघडलेला तोल सावरण्याचे कार्य परशुरामाने केले. ब्रह्म–क्षत्रांनी मिळून समाजाचा उत्कर्ष साधला पाहिजे, ही जाणीवही परशुरामामुळेच निर्माण झाली. परशुरामाच्या अवतार कृत्याचा हा थोडक्यात निष्कर्ष आहे.

आणखी एका मुद्द्याचा इथेच विचार करायला हवा. परशुरामाने जर सरसकट क्षत्रियांचा संहार केला असता, तर या घटनेमुळे भारतातल्या सर्व क्षत्रिय जाती त्याच्या विरोधी झाल्या असत्या. पण वस्तुस्थिती तशी नाही. कित्येक क्षत्रियकुळे आजही परशुरामाला देव मानणारी आहेत. हिमाचल प्रदेशातले राजपूत लोक त्या परिसरात परशुरामाचे राज्य आहे, असे आजही मानतात. नवे धान्य प्रथम परशुरामाला अर्पण करण्याची प्रथा त्यांच्यात आहे. उत्तर प्रदेशातल्या मुजफ्फराबाद जवळ परशुरामाचे एक मंदिर आहे. तिकडचे क्षत्रिय लोक आजही त्याच्या यात्रेसाठी जातात. लमाण लोक स्वतःला क्षत्रिय समजतात अन् परशुराम हे त्यांचे कुलदैवत आहे. ते लोक पायी प्रवास करून महेंद्रगिरीवर परशुरामाच्या यात्रेसाठी जातात. अपरांताच्या भूमीत परशुरामाने केवळ ब्राह्मण कुळेच नव्हेत; तर काही क्षत्रिय कुळेही आणून वसवली. त्यांचे वंशज परशुरामाला कुलदैवत म्हणूनच भजतात.

परशुरामाच्या मूर्तीला न्याहाळीत असता माझे मन अशा प्रकारे सात-आठ हजार वर्षांपूर्वीच्या कालखंडाची दखल घेऊन आले.

मंदिरात एक जटाधारी वृद्ध वैदिक बसला होता. मुखाने स्वाध्याय करीत होता. त्याने आमच्या हातावर तीर्थोदक घातले. ‘अमुक द्या’ नाही ‘तमुक ठेवा’ नाही. सगळे काही आमच्या मर्जीवर. मधल्या दालनातले देवाचे शेजघर पाहून आम्ही बाहेर पडलो. सभामंडपाच्या पूर्वभागी असलेल्या मारुतीला वंदून तुळशीवृंदावनाकडून प्रदक्षिणेला प्रारंभ केला. परशुरामाच्या मागच्या बाजूला रेणुकेचे लहानसे मंदिर आहे. रेणुका ही परशुरामाची आई हे सांगायला नको असले, तरी ती सोमपा क्षत्रियाची कन्या होती, हे सांगायला हवे. तिचे दुसरे लाडके नाव कामली होते.

मायलेकरांची ही दोन्ही देवळे हेमाडपंती आहेत. रेणुका मंदिराच्या बाह्य स्तंभावर काही चित्रे कोरलेली आहेत. ती वगळल्यास बाकी इथे कसलीच कलाकुसर नाही. परशुरामाच्या डाव्या अंगाला गंगा आणि उजव्या सोंडेचा

गणपती आहे. या दोन्ही मूर्ती सुबक संगमरवरी आहेत. बाणगंगा हे इथले मुख्य तीर्थही याच अंगाला आहे. या लंबचौकोनी कुंडात मैलावरच्या सवतसडा ओढ्याचे पाणी आणून सोडलेले आहे. हा सगळा पाट चिरेबंदी आहे. कोण्या निराजीपंत नावाच्या ब्राह्मणाने हे पुण्य पदरी घेतले. परशुरामाने धरित्रीच्या उरात बाण खोचून ही गंगा वर आणली आणि तिचे नाव बाणगंगा पडले असे सांगतात. कुंडातल्या पाण्याचा उपसा झाला की तळाशी पाच बाणरंध्रे दिसतात.

परशुराम हा सप्त चिरंजीवांपैकी एक आहे. भरुचपासून तो मलबारपर्यंतचे लोक येन केन प्रकारेण परशुरामाशी आपला संबंध दर्शवितात. मलबारात तर परशुरामाचा शकच चालू आहे. त्याने कोकण वसवले, ही तर सर्वश्रुत गोष्ट! मूळचा महेंद्र पर्वत सोडून तो आपल्या वसाहतीत कायमच्या वास्तव्याला आला असे जाणते सांगतात. पण तो नक्की कोणत्या ठिकाणी राहिला आहे हे मात्र कोणाला ठाऊक नव्हते. तो शोध लावला, तो एका गाईने. ती बहुधा जमदग्नीच्या होमधेनूची वंशज असावी.

ती इथे या डोंगरावर येऊन नित्य पान्हा सोडी. गुराख्यांनी हे काही दिवस पाहिले. त्यांना त्या गोष्टीचे नवल वाटले; पण कोडे उलगडले नाही. अखेर कोण्या पुण्यवंताला दृष्टान्त देऊन परशुरामाने आपण इथे असल्याचे निवेदिले. तेव्हापासून या विशिष्ट भूमिकेचीच परशुराम म्हणून पूजाअर्चा सुरू झाली. अजून तिथे मंदिर नव्हते. पण योग तरी कसा आश्चर्यजनक पाहा ! या हिंदू अवताराचे मंदिर निर्माण व्हायचे होते ते एका अहिंदू मुस्लीम स्त्रीकडून.



देवळाची दुसरी बाजू

इ. स. १४०० सालची गोष्ट. आदिलशहाच्या बेगमेने आपली तारवे समुद्रात लोटली होती. ती ठराविक काळाने कार्यभाग साधून परत यायची. पण तशी ती आली नाहीत. त्यांचा पत्ताही लागेना. बेगम अस्वस्थ झाली. तिचे ते धनसंकट होते. माणूस संकटाच्या वातचक्रात सापडला, की मग त्याला देव

आठवतो, असा नेहमीचा अनुभव. बेगमेलाही तो आठवला. कोकणचा स्वामी अन् समुद्राचा शास्ता म्हणून परशुराम तिच्या कानांवर आला होता. तिने मग त्यालाच नवस केला. ' देवा, माझी तारवे सुरक्षित किनाऱ्याला लागू देत. मी हातचे रत्नजडित कंकण लावून तुझे देऊळ बांधीन ! ' श्रीकृपेने तारवे सलामत आली. तिने मग जवळच्या दाभोळचातून काळे दगड आणवले आणि त्या ' भूमिके 'वर गाभारा उभारला. अशा रीतीने देवाला मंदिर लाभले. भक्तांना आनंद लाभला.

समोरच्या टेकडीवर एक दीपमाळ आम्हाला दिसत होती. तीही बेगमेच्याच अमलातली आहे. ही दीपमाळ उभारणाऱ्या कारागिराने दिशासाधन केले आहे. परशुराम, त्याच्या दारीचे तुळशीवृंदावन आणि ही दीपमाळ ही एका रेषेत येतात. कार्तिकी पौर्णिमेला तिथे त्रिपुर पाजळला, की तो प्रकाश सरळ धावणे करून परशुरामाच्या मुखमंडलावर विसावतो.

पण अजून या क्षेत्राला ऊर्जित दशा आली नव्हती. पुढे तीनशे वर्षांनी श्रीब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर या सत्पुरुषाच्या मनी रिगून परशुरामाने आपल्या क्षेत्राचे माहात्म्य वाढवून घेतले. स्वामी हे श्रीमंत शाहू महाराज आणि थोरले बाजीराव यांचे गुरू होते. हा सत्पुरुष राजकारण अन् अर्थकारण यात रस घेणारा होता.


जन्मगाव दुधेवाडी नावाचे विदर्भातले एक खेडे. हा पुरुष लहानपणापासूनच विरक्त. त्यांनी काशीत जाऊन एका यतीकडून रीतसर संन्यास घेतला. पुढे काही काळ ते कृष्णातीरी राहिले. नंतर कोकणात उतरले. पेढे गावच्या पश्चिमेस धामणीच्या रानातली एक गुंफा त्यांनी पसंत केली. त्या गुंफेत जवळ जवळ बारा वर्षे त्यानी तप आणि चिंतन केले. इ. स. १६९८ साली ते परशुरामाच्या डोंगरावर आले. ते स्थान त्यांना रम्य अन् पवित्र वाटले.

पण त्या वेळी त्या देवस्थानाची सर्वतोपरी दुर्दशा झाली होती. मंदिर जीव टाकण्याच्या बेतात आले होते. देवाचे पूजोपचार बंद पडले होते. देव महानैवेद्याविना शतकांचा उपाशी राहिला होता. गोवळकोटच्या सिद्दीसाताच्या गांजणुकीने सगळे पुजारी तिथून पळून गेले होते. त्या स्थानाला जिवंतपणाच उरला नव्हता.

ब्रह्मेंद्रस्वामींनी तत्काळ त्या मंदिराचा जीर्णोद्धार करायचे ठरवले. कोणतेही महत्कार्य उभारावे, तर ते एक लक्षापतीने किंवा भिक्षापतीने. स्वामी दुसऱ्या वर्गातले होते. त्यांनी तो संकल्प करून खाकेला झोळी लावली. कर्नाटक अन् महाराष्ट्र या दोन्ही प्रांतांत दौरे काढून ॐ भवती केली. इकडे काम सुरू तिकडे भिक्षा सुरू. कार्यापुरते धन गोळा झाले.

प्रथम त्यांनी परशुरामाचे देऊळ सुधारून वाढवले. मग मागच्या अंगाला रेणुकेचे मंदिर उभारून सुपुत्राला वत्सल मातेची जोड करून दिली. तिथे आधीची होती ग्रामदेवता जाखाई. तिला त्यांनी सामोपचाराने बाजूला नेऊन बसवले. शेजारी गणपती आणि मारुती यांचीही मंदिरे उभारली.

पुढे एकेक करून त्यांनी देवाचे मूळचे सेवेकरी परत आणले. तिथे एक नवे गावच वसवले. पण देवाची नित्यपूजा, महानैवेद्य, यात्रा, उत्सव हे सर्व अव्याहत चालायचे तर देवस्थानाला कायम उत्पन्नाची जोड करून देणे भाग होते. त्यासाठी पेढे, आंबडस, देवाचे गोठण इत्यादी काही गावे त्यांनी देवस्थानाला इनाम मिळवून दिली. आपला संकल्प चिरस्थायी करून स्वामी कृतार्थ झाले.


रेणुकेचे मंदिर

जमवायला वर्षांचे श्रम लागतात; पण लुबाडायला एक घटका पुरते. त्या काळी सिद्दी सात नावाचा हबशाचा सुभेदार इथून जवळच्याच गोवळकोटावर राहात असे. तो वरून ब्रह्मेंद्र स्वामींचा चाहता म्हणवी; पण आतून त्यांच्या द्वेषाने पुटपाकासारखा जळे. आपल्या डोळ्यांदेखत अन् दृष्टीच्या टप्प्यात एक हिंदू देवस्थानाचा होत असलेला उत्कर्ष त्याला कसा खपावा! पण त्याला उघडपणे काही करता येत नव्हते. मराठी राज्यातले स्वामींचे

वजन तो ओळखून होता. एकदा स्वामी कर्नाटकात भिक्षेसाठी जात आहेत हे पाहून त्यांना एक गळ घातली.

" सावनूर-बंकापूर येथील पठाणाने आपणास बक्षीस दिलेला हत्ती आपण येताना आणण्याची कृपा करावी."

स्वामींना त्याची प्रार्थना मान्य झाली. हत्ती घाट उतरला अन् माखजन-पर्यंत आला. तिथे आंग्रे आणि हबशी यांच्या चौक्या जवळ जवळ होत्या. दोन्ही चौकीदारांत त्या हत्तीवरून तंटा निर्माण झाला. आंग्र्यांच्या लोकांनी तो हत्ती ताब्यात घेऊन जयगडास रवाना केला. स्वामी त्या ठिकाणी हजर असते, तर हे प्रकरण चिडले नसते. पण त्यांची मागच्या मुक्कामावर स्नानसंध्या चालली होती आणि लवाजमा तेवढा पुढे आला होता.

सिद्दीसाताने या गोष्टीचा अन्वयार्थ लावला तो असा. ' स्वामी हिंदू; तेव्हा जातीला मिळाले. आपला हत्ती मुद्दाम आंग्र्यांच्या घशात घातला. ' त्याला खवळून उठायला एवढे कारण पुरेसे होते. त्याने शिवरात्रीच्या दिवशी परशु-रामावर धाड घातली, पुजारी आणि कारकून यांना निर्दयपणे झोडपले. त्यांची घरेदारे लुटली. देवस्थानाची सारी चीजवस्त ओरबाडून नेली. हवा तसा तिथे हैदोस घातला.

स्वामींनी हे सर्व पाहिले. त्यांचा अंतर्यामी तडफडला. सर्वांग धगधगले. ते सरळ उठले अन् हबशाकडे दाद मागायला दंडाराजपुरीला गेले. हबश्याने सिद्दीसाताला चांगला दम भरला. लुटलेली सर्व संपदा स्वहस्ते परत करायला लावली. सिद्दीसाताची खोड मोडली खरी; पण त्या दिवसापासून तो स्वामीं-वर डूख धरून राहिला. या ना त्या प्रकारे त्यांना सतावू लागला. शेवटी स्वामी त्याच्या त्रासाला कंटाळले आणि परशुराम सोडून वर घाटी आले. आले ते परत गेले नाहीत.

अग्रशाळा, दीपमाळा, नगारखाना, भंडारघर, सभामंडप असा देवाचा सगळा सरंजाम झाला; पण मुख्य तेच अजून व्हायचे होते. इ. स. १७८९ पर्यंत देवाच्या गाभाऱ्यात मूर्तीच नव्हत्या. सगळे पूजोपचार चालत ते शिलासनाला. गुहागरचे कोणी परचुरे यांना ते गोड वाटले नाही. त्यांनी पुण्याहून बंकतराम नावाच्या शिल्पकाराकडून श्रीमूर्ती घडवून घेतल्या. समारंभाने त्या क्षेत्रात आणल्या. माघ शुद्ध षष्ठीस पंचकुंडी अर्चा होऊन त्यांची मंदिरात प्रतिष्ठा झाली.

त्या वर्षापासून वरील तिथीस इथे मूर्तींचा वर्धापनोत्सव होऊ लागला. या शिवाय मार्ग० वद्य एकादशी आणि महाशिवरात्र हे दोन इथले पर्वमहोत्सव इथे होत असले तरी इथला मुख्य उत्सव अक्षय्यतृतीयेचा. वैशाख शुद्ध प्रतिपदेपासून त्याला प्रारंभ होतो. प्राकारभर उभारलेल्या मंडपात मंत्रजागर दुमदुमतो. पुराण-कीर्तनांचा रंग भरतो. गायन-वादनांची झक्कड उडते. द्वितीयेस तिन्हीसांजा जन्मोत्सव होतो, रात्री छबिना निघतो. मग मानकऱ्यांना प्रसादाचे नारळ वाटले जातात. शेवटी लळित होऊन उत्सव समाप्त होतो. पूर्वी या उत्सवात मोठी समाराधना व्हायची. आल्यागेल्याला अन्नप्रसाद मिळायचा. पण आता कालाच्या प्रतिकूलतेमुळे सगळेच 'तूष्णीम्' झाले आहे.

एवढे सारे पाहतो, ऐकतो तो जवळच कुठेतरी 'गुडुऽऽम्म' झाले. मी म्हटले, 'तोफेचा आवाज कुठून आला?' आमच्या मार्गदर्शकाने मला उत्तर देण्यापूर्वी 'भार्गवराम' असा शब्द उच्चारला, मस्तक नम्र केले, आणि मला म्हटले 'ही देवाची तोफ. सकाळ, संध्याकाळ ही नित्य गरजते. चला तुम्हाला दाखवतो.' प्राकाराबाहेरच्या झाडीत ती 'कालिकामूर्ती' आकाशाकडे तोंड उघडून तिरकी बसली होती. ब्रह्मेंद्रस्वामींच्या काळापासून ही रोज अर्धा किलो दारू ठासून घेते आणि आग ओकते. दरसाल एकदा तिचे 'देणे' दिले, की मग तिची तक्रार नसते.

पुन्हा पाग चढून आम्ही तिच्या तोंडावर आलो. तिथून उजवी वाट धरली. झुळझुळत्या पाटाच्या कडेने दत्ताच्या देवळाकडे जाताना आम्हाला खूप हुरूप वाटत होता. दत्ताच्या देवळात पुढच्या अंगाला एक पुष्करिणी आहे ती या पाटाची मायमाउली. त्याच्याच वरच्या भागाला चिमुकल्या गुंफेच्या मुखातून जो एक झरा प्रकटतो, तो त्या पाटाचा मामा म्हणायला हरकत नसावी.

टेकडीच्या माथ्यावर उभे राहून आम्ही सगळा आसमंत पाहिला. काळ्या कातळांवर अन् हिरव्या झाडांवर उन्हे चमचमत होती. सूर्यनारायणाने उन्हाची तिरीप आमच्या कानशिलांवर टाकून आम्हाला सुचवले. 'पळा आता; मुक्काम गाठा.'

तिथून मधल्या वाटेने चिपळूण अवघे अडीच मैल असले, तरी ते अंतर आम्हाला पायांनीच तोडावे लागणार होते. वाट उताराची खरी; पण उतारावरच देहाचा तोल संभाळावा लागतो, हे विसरण्याजोगे नव्हते. पण आम्ही धीर केला अन् उतरणीला लागलो.

अर्ध्या डोंगरात आल्यावर डाव्या हाताला काळ्या कड्यावरून उडी घेणारा एक क्षीण जलप्रपात आमच्या नजरेस पडला. तो प्रपात हे त्या डोंगराचे वैभव होते. ज्या दरीत तो प्रपात कोसळत होता, ती दरी भयावह वाटत होती. तिचे नाव होते सवतसडा. त्याला एक दंतकथाही होती –

एका पुरुषाच्या दोघी बायका. अर्थात थोरली नावडती अन धाकटी आवडती हे ठरलेलेच. दोघी वरून गोड बोलत; पण आतून एकमेकींना पाण्यात पाहात. एक दिवस कशाकरिता तरी त्या दोघी या सड्यावर आल्या. थोरली धाकटीला म्हणाली, 'ये, तुझी वेणी घालते.' धाकटी तिच्यापुढे पाठ करून बसली. पण थोरलीचा केस विंचरणारा हात थरथरू लागला. धाकटीच्या मनात अंदेशा आला. 'काही तरी काळेबेरे आहे.' धाकटी तरी किती विलक्षण पाहा. तिने झटकन बाजूला व्हायचे की नाही! पण तिने वेगळेच केले. हळूच आपल्या ढळत्या पदराची अन् थोरलीच्या ओचाची गाठ मारून ठेवली. थोरलीला ते उमगले नाही. तिने केसांचे पेड वळता वळता धाकटीला खाली ढकलून दिले. पण झाले भलतेच. 'इंद्राय तक्षकाय स्वाहा!' पडता पडता दोघींची हृदयभेदक किंकाळी उठली आणि तो जलप्रपात त्यांच्या त्या आत्मघातकी मत्सराबद्दल खदखदून हसला!

# २. तुळजा भवानी

रावणाने सीतेचे अपहरण केल्यानंतर रामरायाची अवस्था अत्यंत दयनीय झाली. ' हा सीते, हा सीते, ' असा विलाप करीत तो दंडकारण्यात सैरावैरा भटकू लागला. कैलासावरून आदिमाया पार्वतीने हे दृश्य पाहिले. तिला रामाचे हे दैन्य रुचले नाही. ती शंकराला म्हणाली, ' पूर्ण परब्रह्म म्हणून तुम्ही ज्याचे ध्यान करता, तो पुरुष किती सामान्य मानव आहे ते पाहून घ्या एकदा. बायको हरवली म्हणून पुरुषाने इतके दीनवाणे बनावे ? ' सदाशिव गंभीर होऊन पार्वतीला बोलला ' देवी, असे बोलू नको. माझ्या रामाचे तत्त्व तुला आकलन होणार नाही. रडला, कढला, तरी तो आनंदकंद परमात्मा आहे. मानवदेह धारण केल्यामुळे तो मानवी भावनांचे खेळ दाखवतो. इतकेच ! ' त्यावर पार्वती पुन्हा म्हणाली, ' ठीक आहे. मग मीही त्याला माझा खेळ दाखवते. या खेळात तो फसेल अन् मग तुमचाही भ्रम दूर होईल. '

आणि पार्वती लगेच सीतारूप नटली. दंडकारण्यातल्या यमुनागिरीवर रघुवीर बसला होता तिथे प्रकट झाली. ' सीते ऽऽऽ ' या रामाच्या आर्त हाकेला तिने ' ओ ' दिली. शेजारी उभा असलेला लक्ष्मण उचंबळून बोलला, ' दादा ! वहिनी आली ! ' पण राम उचंबळला नाही. ती मायावी सीता जिकडून येत होती, तिकडे त्याने पाठ फिरवली. त्याने उमेचे हे कौटिल्य तेव्हाच जाणले होते. ती जेव्हा त्याच्यासमोर उभी ठाकली, तेव्हा तो एवढेच म्हणाला. ' आई, कशाला हे श्रम घेतलेस ?'

ते शब्द पार्वतीच्या हृदयमर्माला झोंबले. भ्रमनिरास शिवाचा नव्हे; तर तिचाच झाला होता. मग तिने निजरूप घेऊन रामाचे सांत्वन केले. त्याला वरही दिले. जी रामाची छळणा करायला आली होती, तीच रामवरदायिनी

ठरली. आणि विशेष म्हणजे लंकेहून विजयी होऊन राम परत येईपर्यंत त्याची वाट पाहात त्याच पर्वतावर राहिली.

तीच ही तुळजापूरची भवानी. पुराणात तिला तुरजा म्हटले आहे. प्राकृतात रचा ळ होऊन ती तुळजा झाली. एकनाथ महाराजांनी तिला तुकाई म्हणून संबोधले आहे.

तुळजा भवानी ही महाराष्ट्राची कुलस्वामिनी आहे. ती महाराष्ट्राची प्राणशक्ती आहे. महाराष्ट्र महोदयाची स्वयंस्फूर्ती आहे. महाराष्ट्राच्या सुपुत्रांची ती अंबा आहे. आततायी असुरांची ती चामुंडा आहे. भक्तजनांची ती माउली आहे. आणि श्रांत अनाथांची ती साउली आहे. ज्याला महाराष्ट्रात जन्म घेतल्याचा अभिमान आहे, त्याने एकवार तरी तिच्या पायांशी गेलेच पाहिजे. तिचे आश्वासक दर्शन घेतलेच पाहिजे.

मकरसंक्रमणाचे पुण्य पर्व साधून आम्ही तिच्या दर्शनासाठी सोलापुराहून निघालो. सुदैवाने सकाळची पहिलीच गाडी आम्हाला मिळाली. सूर्य त्याच दिवशी उत्तरायणाचे प्रस्थान ठेवीत होता. आमची गाडी पण उत्तरेच्याच रोखाने निघाली होती. सूर्याच्या विरह दुःखाने निघणारे दक्षिणेचे निःश्वास गाडीत शिरून आमच्या अंगावर काटा आणीत होते. सोनेरी सूर्यकिरण शेतांच्या अंगावरची धुक्याची दुलई हलकेच वर करून त्या रोपट्यांना ‘ उठा उठा हो सकळिक ’ म्हणत होते. दवाने न्हालेली कणसे वाऱ्यावर डुलत होती आणि त्यांच्यावरची पाखरेही. गाडीच्या धडधडाटाने रस्त्याच्या कडेचे एक थिरे भुर्रदिशी उडाले खरे; पण ते रिकाम्या चोचीने खास नव्हे. त्यांना आपल्या बरोबरच घरट्यातल्या पंख न फुटल्या पिलांचीही काळजी होतीच.

थोड्या अंतरावर डाव्या हाताला एक जलाशय दिसला. चौकशी करता कळले, की सोलापूर शहराला जीवन देणारा हिप्परग्याचा तलाव तो हाच. कासव खुषीत आला की जसे पाय पसरतो, तसे त्याला काही फाटे फुटलेले आहेत. ते सगळे जमेस धरून हिशेब केला, तर त्याचा दहा मैलांचा घेर होईल.

सोलापुराहून तुळजापूर पंचवीस मैलांवर आहे. मराठवाड्यातल्या उस्मानाबाद किंवा पूर्वीच्या धाराशिव जिल्ह्यातले ते एक तालुक्याचे ठिकाण आहे. आमची गाडी दीड तासात तो मार्ग क्रमून बालाघाटाच्या चढणीला लागली. घाटमाथ्यावरच्या पठारावर तुळजापूर वसले आहे.

एका धर्मशाळेपुढे गाडी उभी राहताच क्षेत्रोपाध्यांनी आम्हाला घेरले. त्यांच्यापैकी आमच्या नशिबाला आला, तो उपाध्या आम्ही पत्करला. दोन हजार फूट उंचीवरचे ते अर्धचंद्राकार गाव पाहात पाहात आम्ही त्याच्यामागून निघालो. गाव लहान असले तरी इथे सिमेंटचे रस्ते आहेत, वीज खेळवलेली आहे आणि नळही आणलेले आहेत. थोडे खाली गेल्यावर मंदिरप्राकाराचा पहिला अर्धवट उभारलेला दरवाजा दिसला. त्या पलीकडे देवीचे शिखरही डोळ्यांत भरू लागले. एकेक पायरी उतरत आम्ही देवीचे आवार जवळ करू लागलो.

उजव्या हाताला एका दगडी मंडपाखाली एक भस्मभूषित भटजी बसून गिऱ्हाइकांना स्नानाचा संकल्प सांगत होता. त्याने संकल्प थांबवून आम्हाला हटकले. 'या, इकडे या. इथे गोमुख तीर्थ आहे.' आम्ही सोलापुराहून स्नान उरकून आलो होतो. आता त्याच आन्हिकाची पुनरावृत्ती करायला आमची तयारी नव्हती. 'जे फल स्नानाला, तेच मार्जनाला' हा अपवाद नियम आम्हाला तोंडपाठ होता. यात्रेकरूला एवढे तारतम्य ठेवावेच लागते. ते न ठेवता तो जर प्रत्येक तीर्थात आणि कुंडात बुचकळ्या मारू लागला तर त्याला दुसऱ्या क्षेत्रात जाण्याआधी रुग्णालयातच जावे लागेल.

त्या ओल्या पायऱ्या जपून उतरत आम्ही कुंडात प्रविष्ट झालो. पोटरी-एवढी जलधारा एका गायमुखातून दीड पुरुष उंचीवरून तिथे ओतत होती. त्या धारेखाली उभे राहण्यासाठी बऱ्याच मंडळींचे 'मी आधी का तू आधी' चालले होते. आम्हाला पाहून त्या सर्वांनीच बाजूला होण्याचे दाक्षिण्य दाखवले. आम्ही 'अपवित्रः पवित्रो वा' या मंत्राने मस्तकी मार्जन करून तिथून दूर झालो. आमचा उपाध्या सांगू लागला, 'हा साक्षात गंगेचा प्रवाह आहे.' आम्ही जिज्ञासा दर्शविताच त्याने आम्हाला एक परंपरागत दंतकथा ऐकवली.

'गरीबनाथ नावाचा एक साधू इथे देवीची उपासना करून राहात होता. भक्तीला भाळून देवी त्याच्याशी साक्षात् बोले. संसारात काय किंवा परमार्थात काय, माणसाला हातचे सोडून पळत्याच्या पाठी लागण्याची खोड फार. गरीब-नाथाला वाटले, की आपण काशी यात्रा करावी. पण देवी त्याला म्हणाली, 'कशाला एवढी पायपीट करतोस ? इथल्या गोमुखातून वाहते, ती खुद्द गंगाच आहे.' पण त्याला ते कसे पटावे ! माणूस 'देव देव' करतो; पण देवाच्या

इच्छेची मात्र कदर करीत नाही. गरीबनाथ तरी त्याला कुठून अपवाद असणार ! त्याने यात्रेसाठी पडशी खांद्यावर टाकलीच. तेव्हा देवीने त्याला जवळ बोलावून त्याच्या हाती एक लिंबू अन् एक काठी दिली. ती म्हणाली, ' या दोन वस्तू तू गंगेत टाक. ' त्याने त्या वस्तू घेतल्या अन् देवीचा निरोपही घेतला. काशीत गेल्यावर त्या वस्तू त्याने गंगेत टाकल्या. यात्रेहून परत आल्यावर गोमुख तीर्थाखाली ओंजळ धरतो, तर तेच लिंबू अन् तीच काठी गरीबनाथाच्या हातात – '

लोककथा मोठी मार्मिक आहे, यात शंका नाही. सांगणारे ती यात्रेकरूंना पटावी, इतक्या भाविकपणे सांगतात. पण सांगणाऱ्यांना हे पक्के ठाऊक असते, की या तीर्थांचा उगम वरच्या महंकावतीच्या तळ्यात आहे. आणि तळे आटले तर ही धारही खुंटते. समोरचे दुसरे लंबचौकोन कुंड तर म्हणे खुद्द सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवाने आपल्या चारी हातांनी खोदले. त्याला ' कल्लोळ तीर्थ ' नाव का, तर ब्रह्मदेवाने पाचारण केल्यावर विश्वातल्या समस्त तीर्थांनी तिथे कल्लोळ केला म्हणून.

दोन्ही तीर्थांच्यामधून जाणाऱ्या वाटेने आम्ही मंदिराच्या प्राकारात उतरलो. दिवस चढत असला तरी तिथे वाढल्या वृक्षांनी गारवा राखला होता. न तापताच आम्ही त्या तरुछायेचे ' निर्वाण ' उपभोगले. पुढचा ठेंगणा दगडी सभामंडप ओलांडून आम्ही मध्यमंडपात प्रविष्ट झालो. आम्ही तिथे काळ्या फरशीवरून चालत नव्हतो, तर चांदीच्या चकचकीत रुपयांवरून अंबिकेच्या घरी लक्ष्मी भक्त-भाविकांच्या पायातळी लोळत होती. धनिकांनी अधिक धनसंपदा मिळवण्याच्या आकांक्षेने देवीच्या वाटेवर त्या रौप्यमुद्रा खिळवल्या होत्या.


तुळजा भवानीचे मंदिर

तिथल्या संगमरवरी सिंहाच्या मागे उभा राहून मी समोर पाहतो, तर गाभाऱ्यातले सिंहासन रिकामे ! मनात म्हटले, देवी मला पाहून एकदम अदृश्य झाली की काय ! मी कृपाकटाक्षाला पात्र नाही असे जगदंबेला वाटले, की काय ? ...पण एवढ्यात उपाध्याने मला उजव्या हाताला वळवले. भवानी तिथल्या शयनमंदिरात पर्यंकावर पहुडून निद्रासुख अनुभवीत होती.दर्शन घेणारे लोक त्याच बाजूला जमत होते. आम्हीही त्यातच घुसलो. त्या पर्यंकापुढे नतमस्तक होऊन मी नमस्काराचा श्लोक म्हटला –

**यमुनाद्रिकृतावासां योगिनीवृंदसेविताम् ।**
**भक्ताल्हादकरीं शक्तिमंबादेवीं नमाम्यहम् ।।**

देवीचे मुख तेवढे उघडे होते आणि बाकीचे सर्वांग दुलईच्या खाली झाकलेले. निजलेल्याची झोपमोड करणे हे आपल्या नीतिशास्त्रात पाप गणले गेले आहे. त्यातून ही तर चंडिकेची निद्रा ! भीतभीतच आम्ही तिच्या पांघरुणाला कुंकू, फुले वाहिली, नैवेद्य-दक्षिणा ठेवली, पुजाऱ्याने दिलेला प्रसाद घेतला आणि तिथून दूर झालो.

वर्षातून तीन वेळा इथे देवीची निद्रा असते. चार प्रहराची नव्हे, तर चांगली पाच ते आठ दिवसांची. भाद्रपद वद्य अष्टमी ते अमावास्या हा पहिला शयनकाल. आश्विन शुद्ध एकादशी ते पौर्णिमा हा दुसरा. आणि पौष शुद्ध प्रतिपदा ते अष्टमी हा तिसरा. इतर सर्व काळी ती अष्टौप्रहर जागृत असते. अहोरात्र भक्तांची गाऱ्हाणी ऐकत राहते. निद्रेच्या आधी आणि जागृती आल्यावर तिला अजापुत्राचा एकेक बळी लागतो. इथली नवलपरी अशी, की स्थापित मूर्तीच उचलून निजवतात. आणि तीच पुन्हा सिंहासनावर चढवतात. इतर ठिकाणी असले राजोपचार उत्सवमूर्तीला करण्याची वहिवाट असते.

जगदंबेची श्रीमूर्त गंडकी शिळेची आहे. ती सुमारे तीन फूट उंच आहे. भोवती प्रभावळ आहे. मस्तकीच्या मुकुटावर सयोनिलिंग असून मुकुटाखालून केसांच्या बटा बाहेर आलेल्या आहेत. देवी अष्टभुजा आहे. बिचवा, शंख, चक्र, धनुष्य, बाण, पानपात्र आणि असुराची शेंडी या वस्तू तिच्या हातात आहेत. पाठीवर बाणांचा भाता आहे. मुखाच्या उजव्या डाव्या अंगांना चंद्रसूर्य आहेत. उजवा पाय महिषासुरावर असून त्याच्या उजवीकडे सिंह अन् त्याखाली मार्कंडेय ऋषी आहे. डावा पाय पीठिकेवर असून दोन पायांमध्ये

तुटलेले महिषमस्तक आहे. या मूर्तीचे सौष्ठव पाहता ती सतराव्या किंवा अठराव्या शतकातली असावी असे श्री. ग. ह. खरे म्हणतात.

देवीच्या चरणांजवळ आणखी एक मूर्ती आहे, तिचे नाव अनुभूती. हिची कथा अवश्य सांगितली पाहिजे –

अनुभूती ही कर्दम ब्राह्मणाची भार्या. ती महा साध्वी होती. पतिपरायण होती. तिने आपल्या संसारात स्वर्ग उतरवला होता. पण अचानक एके दिवशी काळाने तिचे सौभाग्यमाणिक गिळले. तिने सतीचे वाण उचलले. जिभोळचा चाटणाऱ्या चिताग्नीला ती आपली कोवळी काया समर्पण करणार; एवढचात आकाशवाणी झाली. ' तान्ह्या बाळाच्या मातेला सती जाणे वर्ज्य आहे ! ' निरुपायाने तिला माघार घ्यावी लागली. पुढे याच यमुनाचलावर तिने जगदंबेची आराधना सुरू केली. प्रहरन् प्रहर ती ध्यानमग्न असे. रोज तिचा बाळ तिचे ध्यान मोडायचा; पण एके दिवशी ते कुक्कुर दैत्याने मोडले. तो अनुभूतीच्या रूपावर पतंग झाला होता. तिचे नाजूक हात त्या दैत्याला दूर लोटायला असमर्थ होते. म्हणून तिने देवीला टाहो फोडला. साध्वीचे मरण देवीने जाणले. ती सायुध, सशक्तिक अशा स्वरूपात तिथे प्रकटली. तिने कुक्कुर दैत्याला प्राणांनी प्रायश्चित करायला लावले.

भारतात महिषमर्दिनी अष्टभुजेची उपासना प्राचीन असली, तरी तुळजाभवानी या नावाने महाराष्ट्रात तिची उपासना नेमकी केव्हा सुरू झाली, ते निश्चयाने सांगता येत नाही. इ. स. च्या अकराव्या शतकात परमार उपनावाचे एक राजघराणे कर्नाटकातून मिथिलेत गेले. त्या घराण्यातल्या हरिसिंह देवाने इ. स. १३२४ साली आपली कुलदेवता म्हणून तुळजाभवानीची काही मंदिरे उभारली, अशी माहिती मिळते. यावरून तुळजाभवानीची प्राचीनता इ. स. च्या ११ व्या शतकाच्याही मागे जाते. महाराष्ट्राप्रमाणे कर्नाटकातही तिची उपासना प्रचलित होती, हेही कळून येते.

देवीची नित्यपूजा दिवसातून चार वेळा होते. पहाटेस पुजारी येऊन देवीचे श्रीमुख आणि करचरण पुसतो. तेच वस्त्र नंतर भक्तांच्या हातावर पिळतो, जे चार थेंब हातावर पडतील ते देवीचे चरणतीर्थ म्हणून भक्त प्राशन करतात. लगेच देवीला भाजीभाकरीची न्याहारी होते. दुपारी महापूजा. इथले पुजारी मराठे आहेत. ते पंचामृताच्या वेळी दह्या-दुधाची भांडी देवीच्या मस्तकावर

ओततात. नंतर शुद्धोदकाने स्नान घालतात. भाळी चंदनाचा मळवट भरतात. मस्तकी हळदकुंकू वाहतात, हृदयावर बुक्का उधळतात. नंतर आरती, महानैवेद्य होतो. सायंकाळी धूपारती आणि रात्री प्रक्षाळण.

इथे एक गमतीची चाल आहे. महापूजेच्या वेळी पूजा साहित्य घेऊन पुजारी देवळात आले की जामदार देवळाच्या पश्चिमद्वारात उभा राहून मोठ्यांदा ललकारतो –

**" पुजारी आले होऽऽ! लवकर याऽऽ! "**

ही खड्ड जगदंबेला साद असते. खालच्या डोंगरघळीत ती दीर्घ साद घुमत घुमत जाते. तिथे उभे राहिले, की पुढे डोंगरांची लांबच्या लांब ओळ दिसते. तिथून वर येण्यासाठी पायऱ्या बांधलेल्या आहेत. थकलेल्या माणसाला दमछाट करायला मधे मधे विसावेही आहेत. याच बाजूला एकाकाळी रणछोडभारती या सत्पुरुषाचा मठ होता. मौजेची गोष्ट ही, की भवानी देवी सारीपाट खेळण्यासाठी नित्य त्याच्या आश्रमात जात असे. एकदा खेळायला बसली, की तिला वेळेचे भान राहात नसे. तिने हार जीत खेळून केव्हा तरी अकाली मंदिरात यावे, तो महानैवेद्य आटोपलेला. पुन्हा दुसऱ्या दिवशीही तसेच. खेळाचा छंद सुटेना आणि अन्नाची गाठ पडेना. तिला भरल्या मंदिरात उपास पडू लागले. तिने पुजाऱ्याला दृष्टान्त देऊन आपली स्थिती कळवली. पुजारी म्हणाला, ' माझ्याकडून कसूर नाही. मी अगदी डोळे मिटून नैवेद्य दाखवतो. ' देवीने मग तोड सुचवली. ' आजवर झाले ते झाले. उद्यापासून पूजेच्या आधी मला दीर्घ साद घालीत चला. म्हणजे मी लगोलग धावत येईन.'



**मंदिराची पश्चिम बाजू**

आणि त्या दिवसापासून ही चाल पडली. अजून चालू आहे. हजारो वर्षांच्या परंपरा राखण्यात भारताचे वैशिष्टय असले, तरी याच वृत्तीतून गतानुगतिकत्वही पैदा झाले आहे, हे विसरता कामा नये.

तुळजा भवानीच्या सेवेसंबंधी ज्यांना नित्य नैमित्तिक अधिकार आहेत, त्यांची हुद्याची नावे वाङ्मयात आणण्यासारखी आहेत. पहिला बजाजीबुवा. याने मंदिराची कवाडे उघडायची अन् लावायची. येतील तेवढे नैवेद्य दाखवायचे आणि नंदादीप सांभाळायचा. चिलोजीबुवा म्हणजे शृंगाराध्यक्ष. देवीचे दागदागिने आणि वस्त्रप्रावरणे त्याने सांभाळायची. जगदंबा ही स्त्री असली, नगाधिराजाची कन्या असली, तरी ज्या दिवशी अंगाला भस्म फासणाऱ्या वीतराग शिवाला तिने वरले, त्या दिवसापासून तिने वस्त्रालंकाराचा हव्यास सोडला. ती अगदी साधीसुधी बनली. पण तिची हौस भागली असली तरी भक्तांची भागली नव्हती. त्यांनी तिला रुमझुमत्या नुपुरांपासून झळाळत्या किरीटकुंडलांपर्यंत सर्व प्रकारचे अलंकार समर्पिले आहेत. इथल्याच लिंगाप्पा नाइकाने दिलेल्या रत्नजडित मुकुटाचे मोल लाखांच्या भाषेत बोलावे लागेल. नथच नुसती पंचवीस हजारांची आहे . . . वाकोजीबुवा म्हणजे आमच्या कोकणच्या भाषेत 'पाणियाळा' पाणी पुरवणे हे त्याचे काम. देवळात दीपत्कारही त्यानेच करायचा. पलंगेबुवाकडे शेजघर अन् चवऱ्या, पोर्चले यांची व्यवस्था. आता उरला झाडपेडबुवा. याने झाडलोट करायची, तणकाडी काढायची अन् देवस्थान स्वच्छ ठेवायचे.

मंगळवारी रात्रौ देवीचा छबिना निघतो. देवीच्या डाव्या हाताच्या ओवरीत त्यासाठी सिंह, नंदी, गरूड, हंस, मोर इत्यादी लाकडी रंगीत वाहने तयार असतात. त्यांपैकी एखाद्या वाहनावर देवीची अंबारी चढते. प्रदक्षिणा सुरू झाली, की संबळ वगैरे वाद्य वाजू लागतात. भुत्ये पोत घेऊन नाचतात. एवढ्यात आराध्याच्या अंगात देवीचा संचार होतो. त्याचे घुमणे सुरू झाले, की भक्त, यात्रेकरू, प्रश्न विचारण्यासाठी पुढे सरसावतात. 'आई जगदंबे !' 'पाणकळा' 'कधी होईल ? ' तो घुमणाराही मग 'गळेल तेव्हा कळेल रेऽऽ' अशा थाटाची उत्तरे देऊ लागतो.

इथला सर्वात मोठा उत्सव नवरात्राचा. घटस्थापनेच्या दिवशी गावचा कुंभार तीन घडे आणून गोमुख तीर्थाजवळ ठेवतो. मग सगळे अधिकारी, सेवेकरी

जमून वाजत गाजत ते घडे खाली आणतात. पहिला घडा सभामंडपात ईशान्येला स्थापायचा. दुसरा देवीसमोर जे शिवमंदिर आहे, त्याच्या मागच्या त्रिशूळाच्या ओवरीत बसवायचा. आणि तिसरा त्याच आवारातल्या पातंगीच्या मंदिरात. नंतर सप्तशतीचे पाठ आणि हवन. त्यासाठी देवीच्या समोर एक मोठे होमकुंड बांधूनच ठेवले आहे. खड्‌गनवमीस पूर्णाहुती व्हायची. त्यावेळी बोकडाचे शिर धडावेगळे करून ते 'अग्नाये स्वाहा' करायचे.

दसऱ्याच्या दिवशी देवी रात्रौ शिलंगणाला निघते. त्या वेळी मूर्तीच्या अंगाभोवती कापडाची दिंडेच्या दिंडे गुंडाळतात आणि त्यावर वस्त्राचा पिळा करून तो आवळून बांधतात. लोटलेल्या जनसागराच्या लाटात मूर्तीला इजा पोचू नये म्हणून ही खबरदारी. पालखी निघाली, की शतसहस्र मुखातून 'उदो उदो'चा उच्चैर्घोष उठतो. नगारा, तास, संबळ ही रणतुरे झडू लागतात. 'नादे कोंदले अंबर' असे होते. गिरीशिखरे आणि दरीखोरी नादमय, घोषमय होतात. वन्य श्वापदांना चळकंप सुटतो. दिवे, दिवट्या, पोत, यांनी जणू त्या सगळ्या डोंगराचाच त्रिपूर पाजळतो. भक्तभाविकांकडून मुक्तहस्ताने पालखी-वर कुंकवाची उधळण सुरू होते. भूमीवर त्याचाच दाट थर जमतो. वाता-वरणात त्याचेच कण तरंगू लागतात. पालखीच्या जवळपासचे लोक आत्ताच एखाद्या कुरुक्षेत्रावर रक्ताची रंगपंचमी करून आले आहेत की काय, असे वाटू लागते. सर्वांच्या नाकात, तोंडात, पापण्यांवर एकच एक पदार्थ अन् तो म्हणजे कुंकू. बायका-पुरुष सगळे देहभान हरपवून त्या मिरवणुकीतला अद्‌भुत रस घोटतात. उत्तर रात्रीपर्यंत अशी ही धुमाळ चालते. आणि मग देवी परत मंदिरात येते.

भक्तमंडळी तुळजापुरी दर्शनाला येतात, त्यापैकी बऱ्याच लोकांचे नवस फेडायचे असतात. कोणत्या तरी आपत्प्रसंगी ते केलेले असतात. नवस म्हणजे आर्त अथवा अर्थार्थी भक्ताने देवाशी केलेला एक प्रकारचा सौदा. यात देवा-कडून आधी 'कोहळा' घ्यायचा असतो आणि तो मिळाला तरच त्याला आपला 'आवळा' द्यायचा असतो. नुसता नवस म्हटल्याने अलीकडच्या पिढीला त्यातला तपशील कळायचा नाही. मानवी मनाचे सौंदर्य, औचित्य, आचरटपण, अघोरीपण, या सर्वांचे निदर्शन या नवसांच्या प्रकारांवरून चांगले होऊ शकेल.

पंचामृत अन् ओटी भरणे, हा इथला सर्वसामान्य नवस. मग कोणाची लोटांगणे असतात. कोण्या महिलेला निंबाचे टाळे नेसून पूजा-प्रदक्षिणा करायची असते. कोणी नवसासायासाने पुत्रवती झालेली नारी देवीला पाळणा-खेळणा बांधते. एखादी सौभाग्य चिरंतन होण्यासाठी वाणवसा करते. कोणी बाक्या प्रसंगी बोलून जाते, ' अंबे भवानी, माझे कुंकू राख. मी तुझ्या दारी कुंकवाचा सडा घालीन. '

**आई अंबाबाई। खण नारळ ग तुला।**
**राख माझ्या कुंकवाला। जन्मवेरी।।**

तपस्येच्या बळावर अविनाशी सौभाग्य मिळवून बसलेल्या जगदंबेकडे स्त्रियांनी अक्षयचुडे मागायचे नाहीत, तर दुसऱ्या कोणाकडे मागायचे! कोणी देवीवरून कोंबडी उतरतात. आपले पोटचे मूल देवीला वाहण्याचीसुद्धा एका काळी प्रथा होती. असे नवसांचे अनेक प्रकार.

मंदिराच्या दक्षिणेस ' येमाई ' देवी आहे. गोंधळी हे तिचे उपासक. ते तिच्या ओवरीत बसलेले असतात. तुळजापूरचे ते प्रमुख वतनदार होत. पूजेच्या अन् छबिन्याच्या वेळी संबळ वाजवणे आणि यात्रेकरूंचा गोंधळ घालणे, हे यांचे काम. खरे तर गोंधळी हा शक्तीचा प्रस्तोता आहे. तो इतिहासकाळातला सूत किंवा मागध आहे. शिवाजीमहाराजांच्या काळी स्वातंत्र्यलक्ष्मीचा उदोकार यानेच गाजवला.

तुम्हाला गोंधळ पाहायचा असला, तर चला माझ्या संगे उपाध्याच्या घरी. तो पाहा त्याने गव्हाच्या पुंजीवर घट मांडला आहे. वर जोंधळ्याच्या धाटांचे त्रिकूट उभे केले आहे. तो आता महाराष्ट्र मंडळातल्या देवांना गोंधळासाठी ' आवतणे ' देईल. साथीदाराचे तुणतुणे ' तुंई तुंई ' बोलत त्याला अनुमोदन देईल. तिसऱ्याच्या गळ्यातला संबळ कडाडेल. चौथा नाइकांच्या भाषणाला शेव लावीत अधूनमधून विनोदाचे तुषार उडवील.

मुख्य नाइकाचा पोशाख पाहून घ्या. मलमलीचा अंगरखा. वर जाकीट. डोईवर पेचाचे बसके पागोटे. कल्लेदार मिशा. खांद्यावर चुणीदार उपरण. कीर्तनकारासारखा तो सगळ्यांच्या पुढे. जरा वेळ थांबलात तर त्याचा पूर्वरंग संपल्यावर तो तुम्हाला एखादी बहारदार कथा ऐकवील. बहुधा ती एखादी समर प्रसंगानी खच्चून भरलेली अन् अद्‌भुत रसात न्हालेली लोककथा असेल.

हरणावती, निळावंती, चंद्रगुजरी या आणि अशाच लचकत्या, लवलवत्या नायिका तुम्हाला पुराणवाङ्मयात भेटणार नाहीत. या लोककथा म्हणजे गोंधळ्यांच्या जिव्हाग्री पिढ्यान्‌पिढ्या नटनाच करणारे निरक्षरांचे अक्षर-वाङ्मय आहे. जो रसिक असेल, तोच त्याची चव चाखील.

तुळजा भवानी ही एकनाथ महाराजांच्या घराण्याची कुलदेवी आहे. नाथ हे जातिवंत कवी. जनता संपर्क ठेवणारे कवी. गोंधळ्यांचे पाहून त्यांनाही स्वतः गोंधळ घालण्याची स्फूर्ती झाली. त्यांनी आपल्या विठाई माउलीला अंबेशी एक-रूप करून गोंधळ मांडला. त्यासाठी त्यांनी त्रैलोक्याचा मंडप उभारला. वर चारी वेदांचा फुलवरा बांधला.शास्त्र-पुराणांना साथीला बोलावले.पुंडलिकाच्या हाती दिवटी, बुधली दिली. आणि मग एकदम पुढे होऊन त्यांनी अंबेला हाकारले-

**गोंधळा ये वे जगदंबे**
**विठाबाई तू मूळस्तंभे**

त्या भक्तराजाची साद काय नुसती वाऱ्यावर विरेल ? देवी तत्क्षणी प्रकटली. पण ती अशी रुद्र, उग्र का दिसते ? का म्हणजे ? तिला महिषासूर मर्दायचा आहे.

**मोहमहिषाचा करावया घात**
**अंबा कडकडोनि दांत खात**
**तो धाकेंचि निमाला निश्चित**
**पूर्णानंद प्रकटला ।।**

देवीने पुराणकाळी दैत्य निर्दाळले खरे; पण ते आता लिंगदेहाने माणसाच्या हृदयात शिरून बसले. जनात होते, ते मनात आले. तो मोहाचा महिषासूर. ते काम-क्रोधांचे शुंभ-निशुंभ. तो अहंकाराचा मुंजा. तो दंभाचा झोटिंग. त्यांचा पुरता निकाल लावायचा तर अंबा पुन्हा प्रकटली पाहिजे. तुळजापुरात नव्हे; प्रत्येकाच्या हृदयपुरात. पण त्यासाठी काही साधना करावी लागेल. मन चोखाळ निर्मळ करावे लागेल. भूतमात्री प्रेम, विश्वमंगलाची आकांक्षा, पापाने हात-तोंड काळे होऊ नये, याबद्दल दक्षता, आणि त्या दयामयीवर नितान्त श्रद्धा, या गोष्टी आत्मसात कराव्या लागतील. तरच देवी अवतरेल. तिच्या स्वागता-साठी तुम्ही सद्‌भावनांचे मखर बांधा आणि मग चमत्कार पाहा. तेवढ्यानेच तुमचे अंतःशत्रू आपले ठाणे उठवतील.

जगदंबा म्हणजे शिवाची आदिशक्ती. जेव्हा जेव्हा दैत्य उन्मत्त होऊन जगाचे काळ झाले, तेव्हा तेव्हा ती अनेक रूपांनी प्रकटली आहे. 'एकच माउली दहा अवतार खेळली.' असा नाथांचा निर्वाळा आहे. जगदंबेचा उगम शोधायचा तर आपल्याला वेदकालापर्यंत जावे लागेल. ऋग्वेदात ती अदितीच्या रूपाने दिसते. तिथे जे अदितीचे स्वरूप कल्पिले आहे ते अतिभव्य आणि महादिव्य आहे. अदिती द्युलोकात वास्तव्य करते. अंतरिक्षातही तिचा संचार आहेच. विश्वाची माउली तीच. ती भक्तांना पापपंकातून उद्धरते. ती आपल्या अपत्यांना सर्व काही देते. तिची प्रार्थना करताना तो वैदिक ऋषी म्हणतो –

अदितिने उरुष्यत्वदितिः शर्म यच्छतु।
अदितिः पात्वंहसः॥

'अदिती आम्हाला वृद्धिगत करो. ती आमचे कल्याण करो, ती आमचे दुरितापासून रक्षण करो.'

अदिती म्हणजेच परमात्मशक्ती. शक्ती आहे म्हणूनच शिवाला शिवपण आहे. इच्छा, ज्ञान आणि क्रिया या तीन स्वरूपांनी ती विश्वात अभिव्यक्त होते. शिव हे तिचे अधिष्ठान. शिवाहून ती अभिन्न आहे. पण शिव एकरूप तर शक्ती बहुरूपिणी. शिव अनंग आहे,'निकवडा' आहे आणि जुनाट जुगादीचा वृद्ध आहे. याच्या उलट शक्ती. ती सांग आहे. समर्थ आहे आणि नित्य तरुण आहे. खुद्द शिवानेच तशी कबुली दिल्याचे ज्ञानेश्वर सांगतात.

शिवातून शक्तीचा प्रादुर्भाव झाला की लगेच चौदा भुवनांची उभारणी होते. जीवसृष्टीचा पसारा मांडतो. चारी खाणीत नाण्यांची टांकसाळ सुरू होते. ती नामरूपे निर्माण करते. गुणांचा चाळढाळही तीच करते. शिव अकर्ता, अभोक्ता, उदास; पण ही पतिव्रता त्याला सर्व भोगवते. त्याचे कान, नाक, डोळे हीच बनते. त्याचे भाव, त्याचे अवयव, हीच निजांगे होते. हिचे हे अमर्याद कर्तृत्व जाणून सांख्यांनी हिला प्रकृती म्हटले. ती इंद्रजाल खेळते, अघटित घटना घडवते, म्हणून वेदान्ती हिलाच माया म्हणू लागले.

हिने प्रथम दक्षाच्या घरी जन्म घेतला. दक्षाने तिचे कन्यादान करून शिवाला जावई केले. पण सासऱ्या-जावयांचे बनले नाही. त्याने जो यज्ञ केला, त्यात शिवाला हविर्भाग मिळाला नाही. सतीला तो अपमान वाटला. तिने त्याच

यज्ञमंडपात स्वतःचा देह योगाग्नीत जाळून दक्षाशी असलेले बापाचे नाते तोडून टाकले . . .

तीच पुढे नगाधिराज हिमाचलाच्या पोटी आली. त्याही जन्मात तप करून तिने शिवाची जोड करून घेतली. त्या दोघांचे पारमार्थिक लग्न लागलेलेच होते. तेच तिने लौकिकात खरे करून दाखवले. तिला वरून शिव अर्धनारी नटेश्वर बनला. या दंपतीला मग भक्तजन जगाचे मायबाप म्हणून शरण गेले.


मग शिवाची पूजा होऊनही शक्तीची पूजा स्वतंत्रपणे होऊ लागली. हळू-हळू तिला प्राधान्य येऊ लागले. आपल्या पंचायतनात विष्णूची लक्ष्मी नाही; पण शिवाबरोबर देवीला मात्र स्वतंत्र स्थान आहे. पुढे तिची पुराणे, उपनिषदे, माहात्म्ये स्वतंत्रपणे निर्माण झाली. शक्तिसूत्रे, तंत्रग्रंथ आणि स्तोत्रकलाप, असे बहुविध वाङमय तिच्या सेवेला सादर झाले. श्रीयंत्रासारखी अनेक यंत्रे तिच्या उपासनेसाठी कल्पिली गेली. तिच्याकडून वेगवेगळचा सिद्धी मिळवण्या-साठी 'ऐं ऱ्ही क्लीं' अशासारखे बीजमंत्र पुढे आले. दुर्गा, चामुंडा, तारा, कामाख्या, त्रिपुरसुंदरी, अशा नाना रूपांनी तिचे अर्चन होऊ लागले. भारतात शाक्तपंथ हळूहळू वाढला, विस्तारला.

कित्येक शाक्तांना देवीच्या कृपेसाठी उजू उपचार अपुरे वाटले. त्यांनी मग वामाचार पत्करला. देवीची साधना या नावाखाली मदिरा, मदिराक्षी इत्यादी 'पंच मकारां' चा परिग्रह होऊ लागला. पुढे पुढे हे प्रकार इतक्या थराला पोचले, की लोकांना या वाममार्गीयाची घृणा वाटू लागली. छाकटा (शाक्त) ही नीतिभ्रष्ट माणसाला देण्याची शिवी बनली. या वाममार्गी शाक्तांनी उप-निषदातले आणि दर्शनातले शक्तीचे रूप मलिन करून टाकले. आजमितीस हा पंथ नामशेष झाला आहे, हे नशीब समजायचे.

बौद्ध आणि जैनही शक्तिपूजेला पराङमुख नाहीत. बौद्धांच्या महायान-पंथात वज्रधर आणि वज्रवाराही हे युग्म उपास्य आहे. तांत्रिक बौद्धात वामा-चाराकडे झुकणाऱ्या अशा कितीतरी गोष्टी आहेत. बौद्धांची दुसरी विशेष देवता म्हणजे तारा. ओंकाराला तार अशी संज्ञा आहे. त्याची भार्या ती तारा. तिचे रहस्य आहे, तिची विद्या आहे. तारेविषयी त्यांच्या पंथात विपुल साहित्य आहे.

जैन ईश्वर मानीत नाहीत. त्यांना तीर्थंकर मान्य आहेत. त्यांची पूजा अर्चा ते हिंदू पद्धतीप्रमाणेच करतात. त्यांच्या तीर्थस्थानातून देवीच्या मूर्ती पुष्कळ आढळतात. प्रत्येक तीर्थंकराची एकेक शासनदेवता असते. जशी शिवाची शक्ती, विष्णूची लक्ष्मी. चक्रेश्वरी, अजितबला, कालिका, अशी त्यांची नावे आहेत.

भक्ताने देवाचे गुण गावे, हे ठीक; कारण त्यात त्याची आवडीची धणी पुरते. पण जेव्हा एक देव दुसऱ्या दैवताचे माहात्म्य सांगू लागतो, तेव्हा 'सूर्यें सूर्यासी ओवाळिले। चंद्रें चंद्रम्या क्षेम दिधले' अशासारखे ते हृद्य वाटते. कुरुक्षेत्रावर भारतीय युद्धाचा रणखांब पुजण्याच्या पूर्वी योगेश्वर श्रीकृष्णाने अर्जुनाला देवीचे स्तोत्र करायला सांगितले. लगेच पार्थ अंजलिसंपुट जोडून तिला स्तवू लागला –




'हे कात्यायनि महामाये! तू सिद्धसमुदायाची नेत्री. तू कपालधारिणी. शूल हे तुझे तिखट शस्त्र. तुझे हास्य उग्र. तू विद्यांची महाविद्या. तू प्राण्यांची महानिद्रा. तुला माझा सादर प्रणाम.'

त्याच क्षणी अष्टभुजा आभाळाच्या निळावंतीवर झळकली. दशदिशांना धवल हास्य उधळीत तिने अर्जुनाला वरप्रसाद दिला. 'पार्था, तू नर आहेस. नारायण तुला साह्यकारी आहे. तू या महायुद्धात विजयश्रीचा नवरा होशील!' तीनशे वर्षांपूर्वी स्वराज्य-संस्थापक शिवरायालाही हेच दर्शन आणि हेच वरदान जगदंबेकडून मिळाले होते. तुळजा भवानी ही शिवाजी-

महाराजांची कुल स्वामिनी. त्यांची तिच्यावर अढळ निष्ठा होती. त्यांच्या हातातले खड्ग हा भवानीचाच वरप्रसाद होता.

कोणतेही महत्त्वाचे राजकारण उद्भवले, की महाराज प्रथम भवानी देवीचा कौल घेत. त्यांचे काया-वाचा-मन पवित्र होते, यज्ञमय होते. म्हणून ध्यान धरताच त्यांच्या अंगात भवानीचा संचार होत असे. देवी त्यांच्याच मुखाने भविष्यार्थ सांगे. देवीचे बोल बाळाजी आवजी शेजारी बसून लिहून घेई. शिवरायाला जिता धरून आणण्याचा विडा उचलून जेव्हा अफजुलखान विजापुराहून निघाला, तेव्हा महाराजांना ते मोठे अरिष्ट वाटले. खानाच्या बाबतीत काय धोरण ठेवावे, याविषयी संदिग्ध, सचित होऊन ते कुलस्वामिनीच्या चरणांशी आले. त्यावेळी देवी त्यांच्या अंगात येऊन कोणते शब्द बोलली, ते चित्रगुप्त सांगतो–

" अरे मुला ! चिंता का करतोस ? तुजला माझा वर आहे. अरिष्ट दूर करीन, तुजला ही शिकारच साधून देत्ये. '

अफजुलखान निघाला तो प्रथम तुळजापुरावर आदळला. त्याने मनात आणले, की शिवाजी जिच्या बळावर एवढा पुंडावा माजवतो, ती त्याची देवीच जाग्यावरून उठवावी. तिचीच शकले करावी. पण तिथले बजाजी, चिलोजी, वाकोजी सावध होते. त्यांनी देवीची मूर्ती उचलली आणि होमकुंडाजवळच्या ब्रह्मकूपात सोडून दिली. खानाला वाटले असेल, की देवी आपल्या प्रचंड प्रतापाला घाबरून अदृश्य झाली.

पुढे खानाचे धूड प्रतापगडी कायमचे निजल्यावर महाराजांना वाटले की आता देवीची मूर्ती ब्रह्मकूपातून वर काढावी अन् सरळ प्रतापगडावर आणून स्थापावी. पण समर्थांना तो विचार रुचला नाही. त्यांनी सांगितले ' प्रत्येक देवतेला तिच्या विशिष्ट सामर्थ्याप्रमाणेच स्थानमाहात्म्यही असते. जिथली देवता तिथेच शोभायची. ' हे समर्थवचन प्रमाण मानून महाराजांनी मग तो बेत रहित केला. आजमितीस तो ब्रह्मकूप गुप्त आहे. पण यात्रेकरू न चुकता तिथल्या पिंपळपाराला करस्पर्श करून तिथे माथा नमवतात.

इथल्या मंदिरात मुसलमानांना प्रवेश आहे, हे नवल नाही. कारण कित्येक वर्षांपूर्वीपर्यंत या प्रदेशाचे तेच कर्तुमकर्तुम् समर्थ असे शास्ते होते. पण नवल ते हे, की त्या जमातीतही भवानीचे भक्त आहेत. तिच्यावर श्रद्धा ठेवणारे,

तिला नवस करणारे अन् पुजाऱ्याच्या हातून तिची पूजा बांधणारे, आणि त्याहून नवलाची गोष्ट ही, की इथल्या मातंगी देवीचे पुजारी महार असूनही सवर्ण लोक तिची पूजा करतात आणि तिच्या पातंगकुंडात स्नानही करतात.

देवळाला प्रदक्षिणा करीत पुढे जात असता नैर्ऋत्येच्या ओवरीत प्रल्हादास्तव स्तंभी प्रगटणाऱ्या नृसिंहाचे दर्शन घडते. या देवाला ना वतन, ना वाडी. पण तरीही त्याला एक पुजारी लाभला आहे. त्याला नंदीबुवा म्हणतात. तो सकाळी देवाची पूजा करतो, दुपारी माधुकरी मागून देवाला महानैवेद्य करतो, आणि त्या ' यज्ञशिष्ट ' अन्नावर आपला निर्वाह चालवितो. पण सगळ्या गावाची भोजने उरकल्यावर मग त्याला उरले सुरले मिळायचे अन् मगच त्याच्या मुखी ग्रास जायचा. म्हणून त्याला नेहमीच उशीर. त्यावरून एखाद्या दिवशी कोणाच्या घरी जेवण अतिकाळले, की शेजारची माणसे विचारतात, ' काय, आज जेवायला नंदीबुवाची वेळ आणलीत ? ' स्थानपरत्वे जशा लोककथा तसेच अनेक विशिष्ट वाक्प्रचारही कानी येतात. मराठी भाषा संपन्न करायची तर ग्रंथच वाचून भागणार नाही. त्याबरोबरच कान उघडे ठेवून संचारही करायला हवा.

उत्तरेच्या बाजूला मुख्य मंदिराच्या अंगाला लागूनच खंडोबा आहे. कुठल्याही क्षेत्रात जा, मुख्य देवता म्हटली, की तिचा परिवारही अवती भोवती असायचाच. आपली एकंदर उपासनापद्धती सांग, सपरिवार असते. कोणत्याही यज्ञक्रियेतले देवतापीठ पाहिलेत तरी, मुख्य देवतेच्या भोवती निरनिराळ्या देवतांच्या सुपाऱ्या मांडलेल्या दिसतील. विष्णूचा परिवार अष्ट नायिका, अष्ट लोकपाल, शिवाय गरुडादी अनेक वैष्णव यांचा असतो. शिव-शक्तींच्या परिवारात भैरवगण खडे असतात.

तुळजापुरातही भैरव आहेतच. मधल्या दरवाजाच्या बाजूने थोडेसे चढून गेल्यावर तुम्हाला टोळभैरव भेटेल. त्याची गोष्ट ऐकलीत तर तो खट्टू का दिसतो, तेही कळेल. यमुनाद्रीवर आपल्यासाठी एखादे रमणीय स्थान पाहून ये, म्हणून देवीने त्याला धाडले. हा प्राणी आला तो इथेच रमला. त्याला आपल्या सेवाधर्माची शुद्धच राहिली नाही. भवानी वाट पाहून कंटाळली

आणि स्वतः वर आली. तिने येऊन त्याच्या टाळूवर जेव्हा एक थप्पड लगावली, तेव्हा कुठे स्वारी भानावर आली. तो त्याचा पश्चात्ताप अजून ओसरला नाही.

टोळभैरवाच्या दक्षिणेस उंच जागी काळभैरव आहे. एका लहानशा जलाशयाच्या काठी त्याने आपली चौकी उभारली आहे. तो तुम्ही पैसा आणला आहे की नाही, हे पाहायच्या आधी तुमच्या हातात गांजाची पुडी आहे का, ते पाहील. रोजच्या पूजेनंतर त्याला एक चिलीम भरून द्यावी लागतेच. त्या तारेत मग तो अष्टौप्रहर पहारा बजावतो.

अशा प्रकारे सगळ्या देवांचा आदर करून आम्ही पुन्हा एकदा जगदंबेच्या भेटीस गेलो. तिथून उपाध्याच्या घरी आलो. त्याच्याशी गप्पागोष्टी करीत उपाहार केला. त्याची यथाशक्ती संभावना केली. त्याने महाप्रसादासह दिलेले देवीचे छायाचित्रण घेतले. बसच्या अड्ड्यापर्यंत तो आम्हाला पोचवायला आला. नव्या यात्रिकांना तिथे उतरवून अन् जुन्यांना पोटात घेऊन गाडी घाट उतरू लागली.

येताना घाटशिळेकडे लक्ष गेले नव्हते. पण आता ते गेले. घाटशिळा ही घाटमाथ्यावरची मोठी शिळा आहे. अशा शिळा अनेक ठिकाणी बसकल घेऊन बसलेल्या असतात. पण हिचे माहात्म्य आगळे. राम-लक्ष्मणांना दक्षिणापथाचा मार्ग दाखवायला तुळजा माता स्वतः इथवर आली आणि त्यांची परतीची वाट पाहात इथेच थांबली. म्हणूनच घाटशिळेवर तिचे एक मंदिर बांधलेले आहे. मंदिराभोवती खड्डा आहे.

मंदिराच्या कळसाचा एक मोठा टवका उडालेला पाहून मी शेजारच्या गृहस्थांना पृच्छा केली. ते म्हणाले, 'पोलिस कारवाईच्या वेळी भारतीय सैन्यातल्या गोलंदाजांनी डागलेल्या तोफेचा तो प्रताप आहे. रझाकार मंदिराभोवतीच्या खड्ड्याचा खंदकासारखा उपयोग करून बसले होते. या धुमश्चक्रीत देवस्थानाला यत्किंचित धक्का लागू नये, अशी भारताच्या समरधुरंधरांची अपेक्षा होती. आणि हेच ओळखून गनीम तिथून मारा करीत होता. अशा स्थितीत देवीनेच जणू सेनापतीला प्रेरणा दिली. 'सुटू दे गोळा. कळस भंगला तरी भंगू दे. या आततायांचा संहार झाला, की मी तुम्हालाच माझ्या माथी कळस करीन.' आणि तोफेचा घनगर्ज उठला. त्याचा परिणाम जो व्हायला

हवा तोच झाला. अनेक रझाकार मेले. उरलेले जीव घेऊन पळाले. भारताच्या हृदयातले शल्य उपटले गेले. जो गाजी होता तो –

पण जाऊ दे. त्याचा विशेष विस्तार नको. इतिहासाने त्याची तपशीलवार नोंद ठेवलेली आहे. आपण समर्थांच्या शब्दात एवढेच म्हणू –

**बोळता भवानी माता महींद्र दास्य इच्छिती ।**
**बोलणें हे प्रचीतीचें अन्यथा वाउगें नव्हे ॥**

# ३. भीमाशंकर

मी कोणत्याही तीर्थक्षेत्रात यात्रेच्या गर्दीत सहसा जात नाही. यात्रा म्हटली की जनसंमर्द टाळणे अशक्य. जिकडे तिकडे माणसेच माणसे झाली, की दृष्टी बहिर्मुख होते. चोहीकडून शब्दब्रह्म उठत राहिल्यामुळे कान बधिर होतात. मन अंतर्नादाला मुकते. नाम, रूप आणि रंग यांच्या पसाऱ्यात नको असलेला संकोच जिवाला येऊन चिकटतो. संचाराला साहजिकच मर्यादा पडतात. मग निर्वेधपणे काही पाहताही येत नाही आणि कशाशी समरसही होता येत नाही. समुदायाचे सुख भोगायचे असेल तर यात्रेत जावे. पण त्याहून निराळे काही मिळवायचे असल्यास ' रमाकांत एकांतकाळी भजावा. '

निवांतपणात देव आपलासा होतो. ती ती स्थळेही मौनाच्या भाषेत आपला इतिहास सांगू लागतात. आपण मिळवलेले पूर्वज्ञान मग वस्तुस्थितीशी ताडून पाहता येते.

पण भीमाशंकर असा आडवळणाचा आहे, की मनात येईल तेव्हा तिथे जाणे दुर्घट. महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते म्हणून त्याच वेळी गाड्या, बसेस त्या मार्गाने धावतात. आधी दोन दिवस लोक वर चढतात आणि मग दोन दिवस खाली उतरतात.

आमची एस्. टी. गाडी सकाळी सात वाजता पुण्याच्या तळावरून सुटली आणि खेड-मंचरच्या रस्त्याला लागली. गाडीतले सगळे उतारू भीमाशंकराचेच ' कापडी ' होते. मंचरला थोडी विश्रांती करून तिथून तिने वाममार्ग पत्करला. गाडी हळूहळू उताराला घसरू लागली, तेव्हाच मला वाटले की, पुढे एखादी नदी भेटणार आणि त्यापुढे घाटही चढावा लागणार. आंबेगाव पेट्यातले घोडेगाव हे त्या मार्गावरचे मोठे ठिकाण. तिथून यात्रेचा पोलिसबंदोबस्त सुरू होतो.

शेकडो पादचारी माणसे थव्या थव्यांनी वर चढत होती. बहुतेकांच्या हातात शिदोऱ्या हालत होत्या. बायकांच्या कडेखांद्यावर 'जानी तानी' मधेच खुसमुसत होती, मधेच हसत होती. एका बुवाने ज्या एका अवगुंठनवतीला खांद्यावरून चालवले होते, ती चांगली घोडनवरी होती.मधेच कल्लेदार मिश्यांचे पाटील बैलगाड्या जुंपून चालले होते. त्यांच्या लेकीसुना टोपपदरी लुगडी नेसून आत ठाण मांडून बसल्या होत्या. क्षणाक्षणाला अधिकाधिक प्रखर होणाऱ्या दिनमणीला त्या ग्रामललनांची दयामाया नव्हती.

मधेच कोणी मावळचे शिलेदार तट्टावर स्वार होऊन घाट चढत होते. मात्र ते एकांडे नव्हते. त्यांच्या मागे किंवा पुढे एखादे मूल त्यांना बिलगलेले असायचे. सर्वांच्या चालीबोलीत उत्साहाचे उधाण दिसत होते. नेहमी लहानशा वर्तुळात फिरत राहणारे, ठरीव जीवन जगणारे ते लोक. त्यांच्या वाट्याला एखादेच असे आनंदाचे पर्व यायचे. सगळी कामे, सगळ्या विवंचना मागे सारून ते भीमाशंकराच्या दर्शनाला अन् तिथल्या वनविहाराला चालले होते.

माणूस एकदा वाहनात बसला, की तो त्याच्या आधीन होतो. वाहनही मार्ग परतंत्र असते. पादचारी मात्र खरा. आत्मतंत्र. ज्या पोखरी घाटाने आम्हाला आता वर चढायचे होते, त्याच्या प्रारंभालाच एक मोठे वाकण आहे. आमची गाडी तिथे पोचते तो काही माणसे रस्ता सोडून उजव्या बाजूने सरळ डोंगर चढताना दिसली. अर्धा-पाव मैलाचा फेरा वाचवून ती पुन्हा रस्त्यावर उमटणार होती. पुढेही सगळ्या घाटात त्यांचा हाच क्रम चालणार होता. पायी प्रवास करणाऱ्यांना अशा युक्त्या सहज सुचतात. त्यात साहसाचा, नवी वाट मळवल्याचा आनंदही मिळतो आणि तेवढीच चालही वाचते.

पोखरी घाट फार उंच नाही; पण लांबीला मात्र भरपूर आहे. तो आडवा आडवा चढावा लागतो. एकेका वळणाने गाडी जशी वर चढू लागते, तसतसे खालचे दृश्य लहान लहान होऊ लागते. पायथ्याजवळची चौकोनी भातखाचरे आक्रसतात. घरे मुलांच्या खेळण्यातल्या घरांसारखी वाटू लागतात. वृक्ष भुई-सरपट झुडपे बनतात. वर क्षितिजाचा परिघ वाढतो. निळे नभांगण अष्ट दिशांनी ओथंबून येते. मग वाटू लागते, की आपण धरतीमातेची लेकरे नसून आकाश माउलीची आहो. घाटातला रस्ता धड काळाही नव्हे, धड तांबडाही नव्हे, असा काहीसा मिश्र रंगाचा आहे. बऱ्याचशा पिंजरीत थोडासा बुक्का मिसळून एक-

जीव करावा तशी ती धूळ दिसत होती. पायदळी तुडवल्याचा अपमान सहन न होऊन ती मोटारीच्या माथ्यावर चढली, की उतारूंचा जीव कासावीस होतो.

'माघ-फाल्गुन शिशिर ऋतू' असे आपण समजतो. पण हे ऋतुमान आता जवळ जवळ एका महिन्याने मागे सरकले आहे. मी सर्वत्र दृष्टी फिरवली, तर शिशिर ऋतूने सरत्या माघातच आपली पानगळ पुरी करून वसंताला आमंत्रण दिलेले दिसले. वसंतमाधव आता उमा-महेश्वराच्या वनमहोत्सवाची 'आइती' करू लागला होता. झाडांच्या मुळामुळांतून साठलेली शिशिराची पानगळ लोटून काढण्याच्या कामावर त्याने वायुदेवाची योजना केली होती. ते काम चोख बजावल्यानंतर वसंत त्याला मकरंद-सुगंधाचे बक्षीस देणार होता. घाटातले आम्रवृक्ष आरक्त, लुसलुशीत पालवी पांघरून उभे होते. वसंताच्या सुरुवातीला आंबा पालवणे म्हणजे फळांची आशा पुढच्या वर्षावर. कुंदवेलींनी टाकलेला फुलांचा बहर शेजारच्या करवंदींनी उचलला होता. त्यांच्याच जवळ पण त्यांच्याहून उंच वाढून वाकलेली तोरणीची झाडे फलोन्मुख झाली होती. त्या तोरणी, करवंदी आंब्यांना जणू म्हणत होत्या, 'बापहो, तुम्ही बडे लोक. तुमच्या लहरी लोक चालवून घेतील. पण आम्हाला तुमचे अनुकरण करून चालायचे नाही.दरवर्षी फळांचे घड दाखवले, तरच लोक आमची दखल घेणार.'

घाटात त्रिधारी निवडुंगही काही कमी नव्हते. त्यांनाही वाटले, की सगळेच रान फुलले, तर आपण तरी का मागे राहावे ? फुलवर कोबीसारखी; पण विरळ अन् आमसुली रंगाची फुले त्यांनी आपल्या काडयांच्या टोकांवर उमटवून दिली होती.

घाटातल्या या नाना वृक्षजातींत जागोजाग डोळयांत भरत होते, ते पांगारे. शिशिराने त्यांचा पर्णरूप पोशाख हिरावून नेलेला पाहून वसंताने त्यांच्यावर फुलांचा साज चढवला होता. त्यांच्या बारक्या आडव्या डहाळयांना आमूलाग्र फुले फुलली होती. ती लालचुटुक अन् टोकदार होती. कालिदासाने त्यांच्या-बद्दल म्हटले आहे ते आठवले—'पांगाऱ्याच्या फुलाचा रंग गहिरा लाल असला तरी ते निर्गंध असल्यामुळे माझ्या हृदयाला दुःख देते. गुणांची सर्व सामग्री एकत्र आणण्याच्या कामी विधाता पराङ्मुखच म्हटला पाहिजे.'

सूर्य माथ्यावर यायच्या आतच आमची गाडी भीमाशंकराचा डोंगर चढली. पुण्याहून सुमारे पाउणशे मैल तिने मजल मारली होती. माणशी दोन आणे

यात्राकर दिल्यावरच आम्हाला क्षेत्राच्या सीमेत प्रवेश मिळाला. आम्ही उतरलो ते एक लांबरुंद पठार होते. तिथे बाजाराची मांडावळ चालू झाली होती. तो महाशिवरात्रीचा आदला दिवस होता तरी आजपासूनच माणसांची मूस फुटली होती. पठारापासून देऊळ हाकेच्या अंतरावर होते. तिकडे जाण्यासाठी डागडुजी केलेला रस्ता होता. सर्वांच्या आधी तिथे हजर झाले होते ते अधळे, पांगळे अन् बुवा बैरागी. त्यांनी रस्त्याच्या दुतर्फा सावली बघून आपापल्या जागा धरल्या होत्या. यात्रेकरूंचे मानसशास्त्र पुरते अवगत असणाऱ्या काही साधूंनी मधे मधे धुम्या पेटवून तिथे आपापली देवतार्चने मांडली होती. मस्तकी जटाजूट बांधून आणि कपाळी भस्माचे त्रिपुंड्र ओढून ते सावजे हेरू लागले होते.

मंदिराच्या परिसरात जी मोजकी पाच सात घरे आहेत, त्यांच्या मालकांनी आपापली अंगणे सारवून स्वच्छ केली होती. वर मांडव उभारले होते. सकुटुंब सपरिवार आलेल्या यात्रेकरूंनी त्या मांडवातून आपापल्या चुली मांडल्या होत्या. बायका भातपिठल्याच्या तयारीला लागल्या होत्या. पुरुष पाण्याचा पुरवठा करीत होते. कोणी पत्रावळींना काड्या टोचीत होते तर कोणी शेजारी बसून ' गोष्टी सांगेन युक्तिच्या चार ! ' सगळ्यांना हवे नको पाहताना घरधन्यांची घालमेल चालू होती. यात्रिकांना पुण्याची तर घरवाल्यांना अर्थप्राप्तीची ती पर्वणी होती. मीही अशाच एका घरी पडशी टाकली अन् हिंडायला मोकळा झालो. कारण माझे भोजन त्या पडशीत तयार होते.

त्यातल्या त्यात देवदर्शन आज सुकर होते. मंदिरात कोण्या यजमानाचा अभिषेक चालू होता. ब्राह्मण द्रुतलयीत रुद्राध्याय म्हणत होता. शंकराचा गाभारा खोल असायचा, ही ठरलेली गोष्ट. इथेही तो तसाच होता. आणि प्रशस्त पिंडिकेत एक ठेंगणे शिवलिंग विराजत होते. आता त्याच्या माथ्यावर अभिषेकाची जलधारा अविरतपणे पडत होती.

बारा ज्योतिर्लिंगांच्या नामावळीतले हे शिवलिंग आहे. ' भीमा उगमीं भीमाशंकर ' असा त्याचा प्राकृत निर्देश आढळतो. त्र्यंबकेश्वरी शिवशंकर ब्रह्मगिरीच्या पायथ्याला राहिला आहे तर इथे तो सह्याद्रीच्या शिखरावर आरूढ झाला आहे. त्र्यंबकेश्वरा इतकेच हे स्थानही पुराणप्रसिद्ध आहे.

इथे चार पाच कोळ्यांची घरे आहेत. ते लोक स्वतःला महादेव कोळी म्हणवतात. इथे पुजारी या नात्याने जे ब्राह्मण स्थायिक झाले आहेत, त्यांच्या

बऱ्याच आधीची ही कोळीवस्ती असली पाहिजे. कोळी हे इथले आदिवासी. भीमाशंकर हा प्रथम त्यांचा नि मग इतरांचा. ते त्याच्या कृपेच्या आधारावर या दुर्गम स्थळी पिढ्यान्‌पिढ्या वसले आहेत.

भीमाशंकराचे देऊळ अर्धे जुने आणि अर्धे नवे आहे. ज्या जागी नंदी बसला आहे, तो भुयारासारखा दिसणारा भाग भक्कम काळ्या दगडाचा असूनही आज मोडकळीस आलेला आहे. गाभारा तेवढा जीर्णोद्धार करून नवा बनवलेला दिसतो. नाना फडणिसांनी या जीर्णोद्धाराला प्रारंभ केला आणि ते निवर्तल्यावर त्यांच्या धर्मपत्नीने ते काम पुरे केले. जुन्या-नव्या देवळांच्यामध्ये आजमितीस एक मोठे खिंडार आहे आणि त्यामुळेच कुठेही शिवाच्या गाभाऱ्यात शिरून शकणारा सूर्यप्रकाश इथे 'घे घे' म्हणून आत घुसतो. जुने मंदिर आजच्यापेक्षा बरेच मोठे होते. नव्या देवळाचा घेर त्या मानाने लहान धरला गेला आहे. काळ्या ताशीव दगडांनी हेमाडपंती धर्तीवर या गाभाऱ्याची उभारणी केलेली आहे. पंचवटीतल्या काळ्या रामाचे शिखर ज्या पद्धतीचे आहे, त्याच पद्धतीचे हेही आहे. तिथल्या नारोशंकराच्या कटिबंधावर जशी मूर्तींची ओळ कोरलेली आहे, तशीच ती इथेही आहे. मंदिराला एक प्रदक्षिणा घातली, की चतुर्मुख ब्रह्मा, वामन, परशुराम, गणपती इत्यादी देवतामूर्तींची प्रमाणबद्ध अशी रांग पाहता येते. दर्शनी भागाचे कोरीव कामही प्रेक्षणीय आहे. या देवाला सरकारकडून वर्षासन आहे. काही जमीनही आहे. देवस्थानची सर्व व्यवस्था सहा वहिवाटदारांकडे वंशपरंपरेने चालते.



भीमाशंकराचे मंदिर

एका चमत्कारिक प्रसंगाने भीमाशंकर इथे प्रकट झाला. चौदाव्या शतकाच्या

मध्याची गोष्ट. एक माणूस इथे लाकडे तोडायला आला होता. त्याने अनेक झाडे तोडली असतील. पण एका झाडाच्या मुळात त्याच्या कुऱ्हाडीचा घाव बसताच तिथून रक्ताचा प्रवाह सुरू झाला. तो म्हणाला, ' हे काय अरिष्ट ! कोणत्या अदृश्य देवावर आपली कुऱ्हाड बसली ? आणि आता आपले काय होणार ? '

पण त्याला एक युक्ती सुचली. त्याने आपली तान्ही गाय तिथे आणली आणि त्या वृक्षमूलात तिला आपल्या चारी धारा बरसायला लावल्या. त्या दुग्ध-धारेने रक्तमाला शमली आणि थोड्याच वेळात तिथे एक शिवलिंग दिसू लागले. तोच हा बारा ज्योतिर्लिंगातला भीमाशंकर. त्या शिवलिंगावर त्याच लाकुडतोड्याने पहिले छोटे मंदिर उभारले. आणि मग हळू हळू त्याची सर्वत्र ख्याती झाली.

मी ते देऊळ आणि त्याचा परिसर न्याहाळीत उभा होतो. एवढ्यात एक महान् घंटानाद कानावर आदळला. इतर लहान सहान घंटांचे आवाज त्यापुढे कःपदार्थ ठरले. मला एकदम पंचवटीतल्या नारोशंकरी घंटेचे स्मरण झाले. नंदीला उजवी घालून मी जुन्या देवळाच्या प्रांगणात दाखल झालो. तिथे दोन जाडजूड खांबांच्या मधल्या लोखंडी दांडीला ती घंटा टांगलेली होती. तिचे वजन तीन चार मण सहज भरेल. दहाबारा वर्षांच्या मुलाचासुद्धा हात पुरेल इतक्या उंचीवर ती लोंबकळत आहे. मोठ्या आकाराची पूजा करणे हा मानवी मनाचा धर्मच आहे. इथले पुजारी आणि यात्रेकरू त्या घंटेला शेंदूर फासून आपला पूज्य भाव व्यक्त करतात.

मी जवळ जाऊन तिचे निरीक्षण केले. घंटेच्या तोंडावर जी मानवी आकृती आहे, ती काही भारतीय नाही. ती बहुधा ख्रिस्तमाता व्हर्जिन मेरीची असावी. मूर्तीच्या मस्तकावरच्या चिन्हाला अजाणते लोक स्वस्तिक म्हणत असले, तरी तो खराखुरा क्रॉस आहे. मूर्तीच्या पायाखालचा १७२९ हा आकडा ती घंटा केव्हा ओतली गेली, ते साल दाखवीत असावा. नारोशंकराची घंटा वसईच्या चर्चवरून आणली आहे, तशीच हीही १७३९ च्या सुमारास ठाणे जिल्ह्यातल्या वाशिंद या गावच्या एखाद्या पोर्तुगीज चर्चमधून आणली असावी असा अंदाज आहे. या दोन्ही घंटांचा घणघणाट हा विजयनाद आहे. मी त्या घंटेला म्हटले, अशीच निनादत राहा.

**आगमार्थं तू देवानां गमनार्थं तु रक्षसाम् ।**
**कुरु घंटे रवं तत्र देवताव्हानलक्षणम् ॥**

'देवांच्या आगमनासाठी आणि राक्षसांच्या निर्गमनासाठी हे घंटे, तू देवतांना आव्हान देणारा निनाद कर.'

मंदिर पाहून झाल्यावर पहिली आठवण कोणाची झाली असेल तर ती संतांच्या आवडत्या भिवरेची. मी पंढरपुरी तिच्या वाळवंटात विसावलो होतो. आणि गाणगापुरी अमरजेने तिच्याशी केलेल्या संगमावर स्नानही केले होते. 'आधी कळस मग पाया रे' म्हणतात ना, तसा मुखाकडून उगमाकडे असा हा माझा उफराटा प्रवास होता. 'नदीचे मूळ अन् ऋषीचे कुळ पाहू नये' म्हणतात. कारण उघड आहे. ऋषीचे कुळ पाहायला गेले, की तिथे अकल्पित अन् पूज्य भावाला धक्का देणारे काहीतरी आढळते. त्या दृष्टीने त्याच्या खोलात शिरू नये ठीक. पण नदीचे मूळ शक्य असेल तर का न पाहावे? नदी म्हटली की ती गिरिकन्याच असायची. कुठल्या तरी कडेकपारीत दुर्गम, दुर्लंघ्य अशा उंच जागी तिचा जन्म झालेला असतो. आणि ते स्थान गाठायला माणसाला बरेच कष्ट घ्यावे लागतात. पण म्हणून काही वरील म्हण निर्माण झाली नाही. खालच्या सपाटीला आल्यावर अनेक वहाळ वोहळ तिला येऊन मिळाल्यावर जे सौंदर्य अन् वैभव तिला प्राप्त होते, ते उगमापाशी न आढळल्यामुळे एखाद्या व्यवहारी माणसाने ती म्हण निषेधासाठी जन्माला घातली असावी. पण जे मुखाजवळ नसते, ते उगमाजवळ असते, हे जो तिथे पोचेल त्यालाच कळेल. त्या सौंदर्याची रुचीच वेगळी. जातच निराळी. प्रयागला गंगा-यमुनांच्या संगमावर स्नान केल्याने सरळ सरळ मोक्षपद लाभते. पण तरीही माणसे हिमालयाची शिखरे चढून, देह कष्टवून गंगोत्री-जम्नोत्रीची यात्रा करतात यातले रहस्य हेच आहे. रसिकता अन् धार्मिकता यांचा तिथे त्या शिखरांवर परम संतोष साधतो.

पुजाऱ्याचा एक चुणचुणीतसा मुलगा देवळाच्या दारात उभा होता. त्याला मी विचारले, 'भीमेचा उगम कुठेसा आहे ?' तो लगेच अंगुलिनिर्देश करून म्हणाला, 'त्या वरच्या झाडीत.' मी त्याचेच मार्गदर्शन पत्करून मंदिराच्या डाव्या अंगाची टेकडी चढू लागलो. तिकडे जायला रस्ता असा नव्हताच. होती ती प्रादेशमात्र अस्पष्टशी पायवाट. या चार दिवसांत ती मळणार होती, थोडी

मोठी होणार होती आणि पुन्हा पुढच्या पावसाळयात झाडीचे पांघरूण घेऊन झोपणार होती.

टेकडीच्या मध्य भागावर ठेंगण्या झुडपांच्या वर्तुळात एका कुंडाजवळ त्या मुलाने मला नेऊन उभे केले. पुरुषभर खोलीचे काळ्या दगडातले ते एक कुंड होते. आत डोकावून पाहिले तो पाण्याचा उगीच द्रवसा दिसला. विश्वास ठेवायला तक्रार करणाऱ्या मनाला मी बजावून सांगितले, की ' भीमेचा उगम तो हाच ! '

त्रिपुरासुराला दग्ध करून त्रिनेत्र शूलपाणी याच जागी विसावला. कळ फिरवताच इच्छेनुरूप आकाशात झेपावणारी लोहमय, रौप्यमय आणि सुवर्णमय अशी तीन पुरे त्या असुराच्या मालकीची होती, वरून बॉम्बगोळे टाकणाऱ्या आजच्या विमानांची ती पुराणातली प्राथमिक आवृत्ती असावी. त्या पुरातून तो देवा-मानवांवर अग्निवर्षाव करी. सर्व देव त्याच्या या अभिनव यंत्रसामर्थ्यापुढे हतबल झाले. त्यांनी महारुद्राला ' त्राहि भगवन् ' म्हटले. पशुपती त्या असुराच्या संहारासाठी निघाला.


भीमा उगमाचे कुंड

आता मी ज्या डोंगरावर उभा होतो, त्याच डोंगराचा त्याने रथ बनवला. काळाला महाकाळ भिडला. पण त्रिपुरासूर रथयुद्धात आवरेना. शेवटी रुद्राला तिसरा भालनेत्र उघडावा लागला. त्यातून प्रलयाग्नीचे स्रोत वर उफाळले आणि त्यांनी आकाशात घिरट्या घालणाऱ्या त्या तीन्ही पुरांची एका क्षणात तीन चिमट्या राख केली. ती राख वाऱ्यावर उधळली. त्यातच तो त्रिपुरासूरही निवटला. संत्रस्त जनतेने आणि सुरवृंदाने सुटकेचा निःश्वास टाकून शिवाचा जयघोष केला. शिवाचा तो उघडलेला डोळा पुनश्च मिटला.

पण बाहेरचे श्रम आणि आतली धग यांनी शिवाच्या हिमधवल अंगातून घामाच्या धारा सुटल्या. विश्वमंगलासाठी अन् जगाला जीवदान देण्यासाठी देह झिजवताना निघालेल्या त्या घर्मधारा. त्यांच्यासारखे पावनतीर्थ दुसरे कोणते असू शकेल !

भीमक नावाचा एक सूर्यवंशी राजा शिवप्रसादासाठी तिथे तप करीत होता. तो या प्रसंगी नेमका पुढे आला. त्रिपुरविजयामुळे भोळाशंकर हर्षाच्या भरात होता. त्याने ताबडतोब 'वरं ब्रूहि' म्हटले. 'वरही वरायास पाहिजे समज.' असे मोरोपंतांनी म्हणून ठेवले आहे. ती समज भीमकाला होती. त्याने वैयक्तिक क्षुद्र स्वार्थाला पुढे येऊ न देता मागणे मागितले.

"भगवन्, या घर्मधारांची लोकपावनी नदी होऊ दे !"

शंकराने 'तथास्तु' म्हटले. त्यासरशी डोंगराच्या अंगात जिरणारे ते घामाचे लोट फिरून झुळझुळत वर उठले. तीच ही भीमरथी नदी. इथून ती खाली देवळाच्या बाजूला असलेल्या मोक्षकुंडात शिरली आणि तिथून पुढच्या प्रवासाला लागली.

हे मोक्षकुंड म्हणजे इथे आश्रम उभारून जपतपसाधना करणाऱ्या कौशिक मुनीच्या सामर्थ्याची साक्ष आहे. ऋचीक नावाचा एक ऋषिकुमार होता. वंशाचा एकमेव अंकुर. त्याने वेदाध्ययन केले, गुरुदक्षिणा दिली; पण 'प्रजातंतुं मा व्यवच्छेत्सीः' ही गुरूची आज्ञा मात्र पाळली नाही.

गृहस्थाश्रम न स्वीकारता तो तीर्थक्षेत्रे हिंडत राहिला. प्रवासात एक दिवस पाण्याच्या आशेने तो एका विहिरीच्या काठावर वाकला. पण तिच्यात पाण्याचा खडखडाट होता.तो एक अंधकूप होता आणि त्यात काही अंगुष्ठ मात्र मनुष्याकृती एका दुर्बळ तंतूला धरून लोंबकळत होत्या. ऋचीकाला ते अद्‌भुत वाटले. त्याने त्या दुर्दैवी जीवांना विचारले, 'तुम्ही कोण अन् तुमची अशी अधोगती का ?' विचारता, पुसता भेटल्यावर त्यांच्या दुःखाला वाचा फुटली –

"ऋचीक हा ऋषिकुमार कदाचित् तुझ्या कानावर आला असेल. आम्ही त्याचे पूर्वज. त्याने गृहस्थाश्रम स्वीकारला नाही. वंशसातत्य राखले नाही. हव्यकव्य बुडवले. म्हणून देवांनी आम्हाला स्वर्गातून खाली लोटून दिले. आता आम्ही असेच खितपत राहणार. ज्या तंतूला तूर्त लोंबकळत आहो, तो तुटला की याहून खाली अंधतामिस्र नरकात पडणार. ऋचीक मेला, की

तोही आमच्याच जोडीला येणार आहे. ' अपुत्रस्य गतिर्नास्ति ' हे तो विसरला आहे.'

जे आश्चर्य म्हणून ऋचीकाला वाटले, ते त्याच्या!च अंगाशी येऊन भिडले. त्याला आपल्या पितरांची ती दुर्दशा पाहवली नाही. त्याला कन्या तर वरायची नव्हती, विवाहबंधनात तर अडकायचे नव्हते, पण पितरांचा उद्धार मात्र करायचा होता. इथे आल्यावर कौशिक मुनीने त्याला या विवंचनेतून सोडवले. त्याने आपल्या अंगणात एक कुंड निर्मून त्यात आपल्या कमंडलुतले पाणी ओतले. ते पाहताच लागलीच भीमा नदीही त्यात शिरली. ऋचीकाने त्या कुंबात स्नान आणि पितृतर्पण केले. त्याचा इष्ट तो परिणाम झाला. त्याचे ते अंधकूपात लोंबकळणारे पितर उतरले अन् मुक्त झाले.

त्या दिवसापासून या कुंडाचे नाव मोक्षकुंड पडले. वरून आलेला भीमेचा ओढा इथूनच पुढे जातो. मी पाहात असताना त्या प्रवाहातला रस सूर्याने पुसून टिपून घेतला होता. पण वर्षाकाळी तो दामदुपटीने परत मिळणार याची मला खात्री होती.

इथून खाली अर्ध्या कोसाच्या अंतरावर भीमेचा प्रवाह एका खडकावरून खालच्या घळीत कोसळला आहे आणि शंकराने गुप्तपणे खाली राहून तो मस्तकी झेलला आहे. हिमगिरीवरचे गंगावतरण तसेच सह्यगिरीवरचे हे भीमावतरण, त्या स्थानाला म्हणूनच ' गुप्त भीमाशंकर ' असे नाव पडले आहे. तिथेच एका वृक्षाच्या छायेत साक्षी विनायक आहे.

गुप्त भीमाशंकर पाहायला जायचे, तर ते एकट्याचे काम नव्हे. त्यासाठी चांगली खंबीर सोबत हवी. भीमेच्या कडेकडेने जाणाऱ्या उताराच्या रस्त्याने बरेचसे खाली गेल्यावर उजवीकडे वळावे लागते. तिथून पुढे घनदाट कारवीचे रान दोन्ही हातांनी बाजूला सारीत एकेक पाऊल टाकावे लागते. असली गर्द झाडी म्हणजे वाघोबाचा बालेकिल्लाच तो. या भागात कुठल्याही जागी त्याचे अस्तित्व शक्य आहे. इथे लोकवार्ताच आहे, की रोज मध्यरात्री वाघ शिवदर्शन घेऊन जातो. खरे म्हणजे हे वन्य पशूंचेच निवासस्थान. माणूस तिथे राहतो, तो त्यांच्या हक्कावर गदा आणून.

तीन हजार फूट उंचीवरून उडी घेणाऱ्या भीमेने तिथून पुढे पूर्वेकडे कल घेतला आहे. भीमनेरच्या खडकाळ प्रदेशातून छत्तीस मैल ती अवखळ कन्ये-


सारखी हुंदडत धावते. वाडेखेड या गावाजवळून पुढे पिंपळगावापर्यंत तिचा प्रवास झाला, की तिथे उजवीकडून तिला पहिली सखी येऊन भेटते, ती भामा. दोघी हितगुजे बोलत गळा मिठी घालून निघाल्या की तुळजापुराजवळ इंद्रायणी त्यांना विचारते, 'मी येऊ का तुमच्यात ?' मग दोघींच्याऐवजी तिघी जुळतात. तुळजापुरावरून ती दक्षिणेकडे वळते आणि हवेली तालुक्याला कव घालते. तळेगाव दाभाडेच्या दक्षिणेस पाच मैलांवर तिला वेल नदी मिळते. तिथून ती ईशान्यवाहिनी होऊन महाळुंगीकडे जाते. रांजणगावाजवळ मुळा-मुठा ही संयुक्त नदी तिच्या पोटात शिरते. तिथून वळणे, वाकणे घेत आग्नेयी-कडे चौदा मैल वाहिल्यावर घोडनदीशी तिचा संगम होतो आणि पुढे पुणे जिल्ह्याच्या आग्नेय टोकाजवळ ती नीरा नदीला आत्मसात करते.

भीमा ही सरिता असली, तरी 'तटिनी' नाही.

**यास्तति जलधरसमयस्तव च समृद्धि र्लघीयसी भविता ।**
**तटिनि तटद्रुमपातनपातकमेकं चिरस्थायि ।।**

'पाऊस काळ संपेल. तुझी जलसंपदा आटेल. हे सरिते, मग तुझ्या वाटचाला उरेल ते वर्षाकाली तटवृक्ष उन्मळून विध्वंसिल्याचे पातक.'

हे बोल जगन्नाथ पंडित भीमेला लावू शकणार नाही. कारण तिची उभय तीरे अति सखल आहेत. इंद्रायणी मिळाल्यावर तर पुराने वाहून आणलेल्या गाळाने ती भरून गेलेली आहेत.



देवीचे मंदिर

मी फिरत होतो, थांबत होतो, पाहात होतो आणि पुन्हा पावले उचलीत होतो. सूर्य डोक्यावर आला होता. तरी उन्हात विशेषसा चटका नव्हता. वाराही अकारण बंधू झाला होता. त्यामुळे पावले आपोआप पुढे पडत. माझा वाटाड्या मुलगा म्हणाला, 'या, तुम्हाला देवीचे देऊळ दाखवतो.' आम्ही तसेच आडवाटेने पुन्हा मोटारतळावर

आलो. तिथेच खालच्या बाजूला ते मंदिर आहे. त्यातली अधिष्ठात्री देवी पुराणप्रसिद्ध आहे. देवांनाही दुष्कर असे एक वीरकृत्य पार पाडून ती इथे विसावा घेत बसली आहे.

दुर्धर्ष दैत्याला तिने एका मुष्टिप्रहाराने यमदूतांच्या हवाली केले. ब्रह्मदेवाने कृतज्ञ होऊन कमळांनी तिची पूजा केली. म्हणून लोक तिला कमळजा म्हणतात. आम्ही तिथे पोचलो तेव्हा बरेचसे ग्रामीण तरुण तिच्या अंगणात घोळका करून उभे होते. आणि आळीपाळीने तिथली वाटोळी धोंड उचलून आपल्या बळाची परीक्षा देत होते.

देवीच्या देवळापासून थोड्याच अंतरावर 'कोकणकडा' आहे. तो जर पाहिला नाही, तर इथे येण्याचे श्रम व्यर्थ. तीन हजार फूट उंचीवरून पाहिलेले ते कोकणचे विशाल, विहंगम दृश्य मी तरी जन्मात कधी विसरणार नाही. आम्ही जिथे उभे होतो, ती जागा दोन डोंगरांच्या हातमिळवणीची होती. त्यामुळे आमच्या खालच्या भागात साहजिकच एक अर्धवर्तुळ निर्माण झाले होते. उजव्या हाताचा तो उभा कडा मधल्या काळ्या कातळामुळे कालयवना-सारखा भासत होता. खालच्या कोकणभूमीवर धुक्याचा एक विरळसा थर मांडून राहिला होता. त्यामुळे त्या प्रदेशाला गूढरम्यता आली होती. मध्यान्हीच्या सूर्याला वाकुल्या दाखवीत ते बाष्प तिथे पसरून राहिले होते. मला त्याची शहामत वाटली. त्या सरपोसाखाली समुद्र कुठे आहे, जमीन कुठे आहे, आणि झाडी कुठे आहे, कशाचाच पत्ता लागत नव्हता. चिपळूणच्या परशुरामाजवळ मी पाहिलेले धुके तापस होते, प्रमत्त होते, तर हे सात्त्विक होते, शांत होते.

उजव्या बाजूला सर्वत्र प्रकाशच प्रकाश खेळत होता, तर डाव्या हाताला छायेने आपले राज्य थाटले होते. दोघांनाही आपल्या घरी आसरा देऊन सह्यराजाने आपला समभाव दाखवला होता. वरची हिरवी वनराजी, मधले काळे कडे, खालची निळी 'माया,' सगळे रंग कसे मित्र बनून इतरांना भूषवीत होते. ती लांबवर पसरलेली पर्वतांची रांग आणि खालचा पार क्षितिजाला भिडलेला तो अनंत अपार असा समतळ प्रदेश ! मी सहस्राक्ष असतो तरच मला ती विशालता दृष्टीत साठवून घेता आली असती.

सहज डाव्या बाजूला लक्ष गेले तर बरीच माणसे कणीच्या वाटेने वर चढताना आढळली. ठाणे-कल्याणच्या बाजूने ती आली होती. भीमाशंकराची


यात्रा हा एक संस्कृतिसंगम आहे. कोकण आणि देश इथे एकत्र सरमिसळ होतात. मी तिथला बाजार हिंडायला लागलो, तर मावळातल्या बायकांपेक्षा कातकरी अन् ठाकूर बायकाच अधिक दिसल्या आणि उठूनही दिसल्या. जणू आपल्या घराचाच समारंभ अशा थाटात त्या स्वच्छंद विहरत होत्या. सोळा हात लुगडे असले तरी कातकरणी ते अंगाबरोबर अगदी टांचगे नेसतात. डोंगरातल्या काटचाकुटचातून आणि आडव्याखाडव्यातून वावरायचे, तर लुगडचाचे फलकारे काय कामाचे ! ठाकुरणींना तर पदरही नसतो अन् चोळीही नसते. दोन्ही जातींना दागिन्यांची हौस मात्र अनिवार. रानच्या वेली जर पानाफुलांनी तुरभुरून राहतात, तर आपणही तसेच असावे अशी त्यांची धारणा. गळचात रंगीबेरंगी मण्यांच्या एकीवर एक चढवलेल्या माळा, दंडात चांदीच्या वाक्या, बोटात चांदीची नाणी बसवलेल्या अंगठचा, चांदीचेच दुहेरी गोठ; आणि त्याखाली हातभर काकणे. एकेका बाईला लंकेची पार्वती केले तर त्या अलंकारांचे वजन किलो दीड किलो सहज भरेल. त्यांच्या साळंकृतपणाची तुलनाच करायची तर तिथल्या रामेठचाच्या झुडपांशीच करावी लागली असती. जुन्या काळी बायका बुगडयांखाली सुपारी एवढे मोतीजडित घोस लोंबवीत. तशाच प्रकारचे गेंदेबाज, केसरयुक्त फुलांनी ती रामेठचाची झुडपे अक्षरशः लवली होती.

महाशिवरात्रीला इथे सर्व प्रकारचा बाजार मोठचा प्रमाणावर भरतो. इथली माणसे वर्षाचा पुरवठा याच वेळी करून घेतात. कडधान्ये आणि मसाल्याचे जिन्नस यांचा पुष्कळसा व्यवहार वस्तुविनिमयावरच चालतो. नाचणी, वऱ्या आपल्याकडच्या द्यायच्या अन् त्या मोबदल्यात इतर धान्ये अन् हिंगजिरे वगैरे संसारोपयोगी वस्तू घ्यायच्या. प्राचीन काळी सर्रास सुरू असलेली ही प्रथा भीमाशंकराने अद्ययावत् आणून ठेवली आहे.

पूर्वी असेच असे. मेंढचा द्यायच्या अन् गाय घ्यायची. गाय द्यायची अन् यज्ञासाठी सोमवल्ली खरीदायची. पुढे समाज हळू हळू प्रगत होऊ लागताच ही विनिमयपद्धती गैरसोयीची ठरू लागली आणि त्या जागी कवडचा मिठाचे खडे इत्यादी वस्तू मध्यस्थ म्हणून पुढे आल्या. त्यानंतर नाणे निर्माण झाले आणि व्यवहार अधिक सुलभपणे होऊ लागला. आणि ज्या दिवशी नाणे निर्माण झाले, त्या दिवसापासून माणसाच्या मनात संग्रहाची, राखून ठेवण्याची वासना

निर्माण झाली. जे साधन होते, ते साध्य बनले. 'लोभमूलानि पापानि' म्हणतात, तसा तिथूनच सगळ्या पापांचा उगम झाला. व्यवहाराच्या सुलभतेसाठी माणसाने पैसा निर्माण केला; पण हा भस्मासूर माणसाच्याच टाळूवर हात फिरवून विकट हास्य करतो आहे.

इथल्या हनुमान तळ्याजवळच्या मारुतीचे दर्शन घ्यायचे असेल, तर भीमाशंकराच्या उजव्या अंगाची एक टेकडी चढायला हवी, एक उतरते पठार आक्रमायला हवे आणि पुन्हा दुसऱ्या एका टेकडीच्या मुळाशी यायला हवे. अर्ध्या कोसाची ती वाट आहे. तिथे एक गोसावी मठ उभारून राहतो. उत्तर भारतातून कुठून तरी येऊन आज दोन तपे तो इथे जगाचा संबंध तोडून राहिला आहे. 'एकाकी न रमते' या सिद्धान्ताचा तो अपवाद आहे. तो एकला असला तरी विटलेला नाही. नाना जातींची फुलझाडे त्याने अंगणात लावली आहेत आणि समोरच्या तळ्याचे पाणी पाजून वाढवली आहेत. बागेला लागूनच उजव्या अंगाला त्याची अग्निशाळा आहे. अष्टौप्रहर प्रज्वलित असलेला तो कुंडातला अग्नी त्याचा अतिथी आहे आणि संरक्षकही आहे. लांडगे, वाघ वगैरे हिंस्र पशू त्याच्या जागेत पाय टाकायला धजत नाहीत, ते त्या अग्नीच्या भयानेच. तळ्याच्या वरच्या बाजूला लहानशा खोपटात मारुती आहे. त्यालाही हा गोसावीच शेंदूर माखतो. त्याच्या एकांतात आणि साधनेत जनसंमर्दाचा व्यत्यय कधी येत असेल, तर तो या महाशिवरात्रीच्या प्रसंगीच.



हनुमान तळे

सगळे फिरून आम्ही मूळपदावर येतो तो सूर्यास्त झाला होता. माणसांची आवक मोठ्या प्रमाणावर वाढली होती. पठार आणि मंदिर या दरम्यान

अव्याहत रहदारी सुरू झाली होती. घंटानाद अविरत उठू लागले होते. लोकांची आमोद-प्रमोदाची रात्र उगवली होती. दुकानदारांनी दिव्यांचा लखलखाट केला होता. वरती तारामंडळ चमचमत होते. एवढा समाज आमच्या गोव्यात एकत्र जमला असता, तर तिथल्या देवस्थानसमितीने त्या समाजाच्या समाराधनेसाठी एखादा नि:शुल्क नाट्यप्रयोग योजला असता.

आमच्या हरवळे गावी अशीच मोठी महाशिवरात्र भरते. तिथे रात्रभर प्रेक्षकगण नाटक पाहतो आणि झुंजूमुंजू होताच भरतवाक्य झाले की तिथल्याच एका उंच कड्यावरून कोसळणाऱ्या प्रपाताखाली भीमकुंडात स्नान करतो. हरवळ्याला पाच गुंफा असून त्या पाच पांडवांनी खोदल्या, अशी समजूत आहे. तिथे याविषयी लोककथा प्रचलित आहे ती अशी–

पांडव वनवासकाळात इथे आले होते. त्यांना ते स्थान सुंदर वाटले. एका रात्रीत पाच भावांसाठी पाच गुंफा निर्माण करून तिथे देवाचा महानैवेद्य करता आला, तर तिथेच वनवासाचा पुढील काळ घालवायचा असे त्यांनी ठरवले. पाचांनीही कंबरा कसल्या. गुंफा खोदून तयार झाल्या. द्रौपदीने घाईघाईने स्वयंपाक केला. धर्मराजाने वैश्वदेव केला. काकबळी टाकण्यासाठी तो बाहेर येतो, तोच कावळ्याने ' काँ ' केले. भोजन होण्यापूर्वी तो ओरडला. एवढा घातलेला घाट असा कोलमडला, हे पाहून भीमाला संताप आला. त्याने त्या भरात आपली गदा भूमीवर आदळली. त्या सरशी तिथेच एक महाकुंड निर्माण झाले. वरून पडणाऱ्या धबधब्याने ते लागलीच भरून काढले. पांडव तिथून निघून गेले; पण ते भीमकुंड कायम राहिले. हरवळ्याच्या या भीमकुंडाशी भीमाशंकराच्या मोक्षकुंडाची तुलनाच होऊ शकणार नाही.

० ० ०

२०८९५

# ४ वेरुळचा घृष्णेश्वर

वेरुळ हे भारतातले एक नावाजते कलाक्षेत्र आहे. घृष्णेश्वर हा बारा ज्योतिर्लिंगातला शिवशंकर तिथेच वसल्यामुळे ते एक पुण्यक्षेत्रही आहे. वेरुळला जायचे तर प्रथम औरंगाबाद गाठायला हवे. तिथून देवगिरी अन् त्यापुढे वेरुळ असा तो प्रवास आहे. तिथल्या लेण्यांची ख्याती जगभर पसरली आहे. परदेशी पाहुण्यांची वर्षभर तिथे वर्दळ असते.

आम्ही एक स्वतंत्र मोटार ठरवली अन् रामपारी औरंगाबाद सोडलं. दिवस सरत्या उन्हाळ्याचे होते. रस्ता फुललेल्या गुलमोहोर वृक्षांच्या मधून जात होता. लाल, शेंदरी रंगाच्या फुलांनी ते वृक्ष नुसते गच्च भरले होते. फुलांच्या भाऊगर्दीत पानांना जागाच उरली नव्हती. खालीही सगळा खच पडला होता तो फुलांचाच. ते वृक्ष जणू यादवराजांचे अतिरथी महारथी असून नुकतेच अलाउद्दिन खिलजीच्या सैन्याशी मुकाबला करून, घायाळ होऊन आले होते.

पुढच्या मार्गावर वडाच्या फांद्यांनी हिरव्या दाट कमानी उभारल्या होत्या. उजव्या हाताला ओसाड डोंगरांची रांग उंटाच्या काफिल्यासारखी उभी होती. ती कुठून सुरू झाली होती अन् कुठे जाऊन थांबणार होती देव जाणे ! पण वेरुळच्या लेण्यांपर्यंत ती जाणार होती, एवढे नक्की !

औरंगाबादपासून सुमारे दहा मैलांवर डाव्या हाताला दौलताबादचा काळा कभिन्न किल्ला दिसला. त्याचा अनादर करून पुढे जाणेच शक्य नव्हते. भरल्या कुटुंबातून, नांदत्या गोकुळातून फुटून निघून एखाद्या आपमतलबी पुरुषाने आपला वेगळा संसार उभारावा तसा त्या डोंगरओळीतून बाजूला झालेल्या एका डोंगराने आपल्या अंगावर तो किल्ला उभारला होता.

त्या किल्ल्याच्या भोवती कितीतरी तट आहेत आणि आता ते ठायी ठायी ढासळले आहेत. आज ज्या ठिकाणी झाडी वाढली आहेत आणि जिच्या आश्रयाने कोल्हे, लांडगे अन् जीवजिवाणू निश्चितपणे राहिले आहेत, तिथेच एका काळी भिल्लम यादवाने स्थापलेली देवगिरी ही राजधानी वैभवाने झगमगत होती. तेराव्या शतकाच्या अखेरीस रामदेव राजाच्या कारकीर्दीपर्यंत तिथे धनाचे पूर लोटत होते. नवलाख दिव्यांच्या द्वारकेप्रमाणे तिथे रत्नांच्या ज्योती अन् माणकांच्या वाती पाजळत होत्या.

हा किल्ला त्या वेळी डोंगराच्याच नव्हे; तर सद्दीच्याही शिखरावर होता. त्याच्याकडे कोणी वाकड्या नजरेने पाहू शकत नव्हता. पण चक्रनेमिक्रम कोणाला चुकला आहे ! प्रथम नाशाला टपलेली काळाची अन् नंतर धनाला वखवखलेली अल्लाउद्दिन खिलजीची नजर या राजधानीकडे वळली. रामदेवरावाचे नवग्रह पालथे पडले आणि यादव साम्राज्याचा सूर्यास्त झाला. हा किल्ला यादवांचे बारसे जेवला तसेच त्याला त्यांचे ‘ बारावे ’ ही जेवावे लागले.

केवढा तो त्याचा खोलखोल खंदक ! कुठून तरी जलप्रवाह आणून तो भरून ठेवलेला असे. आणि त्याला लागून एकशे पन्नास फूट उंचीचा तो काळवथर कडा ! त्याच्यावरून वर चढायचा प्रयत्न करणे म्हणजे थेट स्वर्गद्वार गाठणे. तो जसा अनुल्लंघ्य तसाच अभेद्य. पण जगात फितुरीला अभेद्य असे काही नाही. किल्ल्यात दाणागोटा भरपूर आहे या खात्रीवर रामदेवरावाने अल्लाउद्दिनाच्या वेढ्याला टक्कर दिली; पण ऐनवेळी कोणत्या तरी अघटित घटनेने कोठारातली धान्यपोती मिठाची पोती झाली आणि दैवाला निखंदीत रामदेवरावाला दाती तृण धरावे लागले.

किल्ला चढून आणि उतरून आम्ही पुढे निघालो, तर रस्त्यावरच्या कमानींतून बाहेर पडता पडता आम्हाला सरस्वतीचे वाहन भेटले. पण आमची चाहूल लागताच त्याने पाठ फिरवली. पिसाऱ्याचा संकोच करून खालच्या जाळीत ते तुरतुरले. मी एक शारदेच्या दरबारातला लहानसा ‘ छडीदार ! ’ त्याचे माझे उपास्य एकच. असे असता त्याने मला डावलावे, माझ्यापासून दूर जावे, हे मला रुचले नाही. पण ही खिन्नता पुढच्याच क्षणाला पळून गेली. पहिल्या मोराच्या पुढे आणखी चार पाच मोर होते. त्यांनी उजवीकडून डावीकडे लंघण मारताना आमच्या गाडीवर रंगीत पिसाऱ्याची कमान केली आणि मला धन्य

धन्य वाटले.हिमालयातल्या वसिष्ठाश्रमाकडे जाणाऱ्या दिलीप–सुदक्षिणेपेक्षाही आम्ही भाग्यवान होतो. त्यांच्या रथावर बिनखांबांचे तोरण उभारले होते ते नदीकाठच्या सारसपक्ष्यांनी. पण सारसांपेक्षा मोरांचा दिमाख न्यारा हे काय सांगायला हवे !

औरंगजेब म्हणजे साम्राज्यतृष्णेचा ओतीव पुतळा. तो जिथे अस्मानातल्या चांदण्या मोजीत निळ्या घुमटाखाली कायमचा पहुडला आहे, त्या गावाचे नाव खुलताबाद. आमची मोटार ते ओलांडून घाट चढू लागली. दुसऱ्या बाजूने खाली उतरल्यावर आमच्या सारथ्याने एका वळणावर गाडी उभी केली. तो खाली उतरून म्हणाला. 'हे आले वेरुळ. ही उजव्या हाताला लेण्यांची रांग पहिल्या क्रमांकापासून पाहणे सुरू करा. तोवर मी तुमच्यासाठी गावातून एखादा मार्गदर्शक घेऊन येतो.'

बाहेर धरणी तापली होती. डोंगर रसरसत होते. अंगाची उकडहंडी झाली होती. पण पहिल्याच गुंफेत म्हणजे त्या डोंगराच्या पोखरलेल्या पोटात जेव्हा आम्ही शिरलो, तेव्हा हायसे वाटले. त्रिविध तापांनी पोळलेल्या जीवाला एकाएकी निर्वाणाची शांती लाभावी तसे. यंत्राच्या साह्याने हवामान समाधान राखणाऱ्या एखाद्या प्रेक्षागृहातच जणू आम्ही प्रवेशलो होतो. मन हळूच कुजबुजले.' आता हिंडूंबिडू नकोस. इथेच आडवा हो. कसे गपकन डोळे मिटतील.

इथे क्रमाने बौद्धांच्या बारा गुहा आहेत. पुढे सभामंडप म्हणजे विहार, बाजूंना भिक्षूंच्या ध्यानधारणेसाठी बारक्या बारक्या खोल्या, समोर गाभारा, दोही अंगी वज्रपाणी अन् पद्मपाणी हे भले उंच द्वारपाल, आणि गाभाऱ्यात बुद्धमूर्ती हे अन् असेच सर्वत्र एकाच साचाचे शिल्प. आत तेच, बाहेर तेच अन् भिंतींवरही जागजागी तेच. 'सर्वं बुद्धमयं जगत् !' फरक कुठे असलाच तर तो गाभाऱ्यातल्या बुद्धमूर्तीच्या आसनबंधात. कुठे तो बुद्ध दोन्ही पाय खालच्या कमळावर सोडून बसलेला दिसतो, तर कुठे तो पद्मासनात दिसतो.

बुद्धाची ध्यानमुद्राच त्यांनी सर्वत्र कोरली आहे. नेत्र मुकुलित अन् डाव्या हाताची करांगळी उजव्या हाताच्या चिमटीत धरलेली. जणू तो मानवजातीला करपल्लवी भाषेत सांगतो आहे,

"जगातल्या पर्वताएवढ्या दुःखावर या करांगळीच्या टोकाएवढे लहानसे पण रामबाण रसायन आहे. वासना सोडा. तृष्णा त्यागा. तीच सर्व दुःखांचे मूळ आहे."

बुद्ध भगवान तुम्ही कुठेही पाहा. त्याच्या कानांची पाळी खांद्याला टेकलेली दिसतात. त्या काळचे ते सौंदर्यलक्षण होते. दगडाचे वजनदार मणी कानात लोंबवून ते असे दीर्घ केले जात. एका मण्याने पाळे जरा खाली आले, की त्याच्या जोडीला तेवढ्याच वजनाचा दुसरा मणी तिथे चढायचा. कान आणखी खाली यायचा. अशा प्रकारे पाळे ताणत, ताणत खांद्यापर्यंत आणायचे. चिनी लोकांत मुलीचे पाय बारीक व्हावे, म्हणून ते जन्मापासून आवळून टाकतात. तशाच प्रकारची ही सौंदर्यसाधना होती.

या बारा बौद्ध लेण्यांत मधेच एक चैत्यगृह आहे. त्याला विश्वकर्मा लेणे म्हणतात.

ज्या दालनात स्तूप असतो, त्याला चैत्यगृह म्हणतात. बौद्धातल्या हीनयान-पंथाच्या लोकांनी सनपूर्व दुसऱ्या शतकापासून पहाड खोदून विहार अन् चैत्य-गृहे निर्माण करण्यास प्रारंभ केला. स्तंभांच्या मेहेरपीत बुद्धस्तूप उभा करणे हे चैत्याचे लक्षण. स्तंभांच्या दोन रांगांमुळे अशा चैत्यगृहांचे तीन विभाग होतात. मागील भाग गर्भगृहासारखा लहान अन् अर्धघुमटाकृती असतो. त्याच्या मधल्या भागात स्तूप असतो. त्या स्तूपात बुद्धाची रक्षा असते. वरचे छत कमानदार असते. या चैत्यगृहांची रचना इतकी सुरेख अन् सुबद्ध असते, की त्यांचे निर्माते किती कुशल शिल्पकार असले पाहिजेत, याची त्यावरून कल्पना येते.


चैत्यगृहाच्या दर्शनी भागात ज्या भव्य कमानी दिसतात, त्यांची मूळ कल्पना बराबर टेकडीवरील लोमश ऋषीच्या गुहेच्या प्रवेशद्वारावरून सुचलेली असावी. अशा प्रकारची कमान बहुतेक सर्व बौद्ध लेण्यात आढळते. या कमानीला सूर्यगवाक्ष असेही म्हणतात. कारण तिची रचना अशा कौशल्याने केलेली असते, की तिच्यातून आत प्रवेश करणाऱ्या सूर्यकिरणांनी संपूर्ण चैत्यगृह उजळून निघावे.

इथल्या चैत्यगृहातल्या स्तूपातही एक बुद्धमूर्ती घडवलेली आहे. शिल्प-काराने तिच्यात एक विशेष कौशल्य दाखवले आहे. हा बुद्ध समोरून ध्यानस्थ दिसतो. उजव्या अंगाने सचित दिसतो आणि डाव्या अंगाने सुप्त दिसतो. केवळ ओठाच्या पाकळीत अन् डोळ्यांच्या ठेवणीत ‘ होय; नव्हे ’ असा फरक ठेवून शिल्पकाराने वरील तीन्ही भाव साधले आहेत.

बारावे लेणे तर तीन मजली भव्योत्तुंग आहे. जी खोदाई खालच्या मजल्या-वर ती आणि तशीच वरच्या दोन्ही मजल्यांवर. इथल्या गुहांची खोली,

रचनेची प्रमाणबद्धता, मूर्तींची भव्यता, स्तिमित करणारी आहे. इसवी सनाच्या पाच ते सात अशा तीन शतकांचा हा विराट प्रयत्न आहे. तो पाहून 'अहो आश्चर्यम्' असा उद्गार सहजपणे तोंडून निघतो. मात्र प्रत्येक गुंफेतल्या शिल्पकामाचा तो एकसुरीपणा, तो ठरीव साचा पाहून पुढेपुढे मन कंटाळते, हेही तितकेच खरे.

पण प्रेक्षकांच्या मनाला लागलेली विविधतेची तहान पुढच्या ब्राह्मणी लेण्यात पूर्णतया शमते. विशेषतः कैलास लेण्यात तर डोक्यावरून पाणी जाते. कैलास लेणे म्हणजे अद्‌भुततेला पडलेले पहाटेचे स्वप्नच ! प्रवेशद्वारातून आत शिरताच पहिला पडदा म्हणून उभ्या केलेल्या शिळेवर गजलक्ष्मीचे जे चित्र आहे, तिथूनच त्या कलाकारांचा कल्पनाविलास दिसू लागतो. राष्ट्रकूट राजांच्या आमदानीतले हे शिल्परत्न आहे. त्यांनी आपल्या गजान्त वैभवाचे द्योतक म्हणून ते तिथे कोरले असावे. खाली क्षीरसागराच्या लाटा उचंबळत आहेत, त्यातूनच एक सहस्र पाकळ्यांचे कमळ वर आले आहे. त्याच्या नाजूक पाकळ्यांना एवढीशीही इजा न पोचेल इतक्या हळुवारपणे कमलजा लक्ष्मी त्यावर विराजित झाली आहे. जलपृष्ठावरचे दोन आणि वर अधांतरीचे दोन असे चार गजराज तिला दुधाने न्हाणीत आहेत. खालचे दोन हत्ती कलश भरून वर देतात आणि वरचे दोघे सोंडेच्या विळख्यात त्यांना पकडून लक्ष्मीच्या मुकुटमंडित मस्तकावर ते एकत्र जुळवून पालथे करतात. केवढा प्रसन्न, दृष्ट लागण्याजोगा अभिषेक !



कैलास लेणे

तिथून आत जावे आणि समोर उभे राहून सर्वत्र नजर फिरवावी. कोणताही मनुष्य त्या क्षणी स्तंभित होईल आणि थोड्या वेळाने भारावून हृदयातून निःश्वास सोडील. बौद्ध लेण्यात न भेटलेली विविधता इथे आपल्याला

चोहोबाजूंनी घेरते. महाद्वारातच उजव्या हाताला उभा असलेला तो काळा भव्य हत्ती. समोरचा आपला सख्खा भाऊ छिन्न भिन्न झालेला पाहून तो दुःखी कष्टी दिसत आहे.

कैलासलेणे म्हणजे उत्तुंग अशा तीन ताळांचे शिवमंदिर. यालाच रंगमहाल असे दुसरे नाव आहे. भारतात जी विशेष प्रेक्षणीय लेणी आहेत, त्यात यालाच अग्रपूजेचा मान लाभेल. इतर लेण्यांपेक्षा त्याची रचना सर्वस्वी भिन्न आहे. इथे कलाकारांच्या प्रतिभेचे दिव्यत्व दिसते. हे लेणे सभोवतीच्या खडकापासून अलग केलेले आहे. काळचा एकसंध पत्थराचा तेवढाच म्हणजे १५४ फूट रुंद आणि २७६ फूट लांब एवढा भाग प्रथम त्यांनी अलग करून घेतला. आणि मग ते वरून खाली खोदीत अन् कोरीत आले. 'आधी कळस मग पाया रे '

त्या कलाकारांच्या डोळ्यांपुढे विजापूर जिल्ह्यातल्या पट्टदकल गावच्या विरूपाक्षाचे मंदिर उभे होते. त्यांनी त्याप्रमाणे इथे त्याची प्रतिकृती उठवून दिली. कैलास लेण्याची शैली द्राविड आहे. कांचीच्या कैलासनाथाच्या मंदिराची शैली आणि कैलास लेण्याची शैली एक आहे.

कैलासाच्या खालच्या चौथाऱ्याला सगळीकडून हत्ती आणि सिंह यांच्या मस्तकांची रांग उभी केलेली आहे. त्यावर सोळखांबी सभामंडप खोदलेला आहे. प्रत्येक खांब नक्षी आणि आकृती यांनी आपादमस्तक कोरून काढलेला आहे. गाभाऱ्यात भव्य शिवलिंग स्थापले आहे. गाभाऱ्याच्या बाहेरच्या बाजूला वरच्या मजल्यावर पंचायतनाची पाच मंदिरे आहेत. मुख्य मंदिराच्या डाव्या अंगाला प्रवेशद्वाराच्या बाजूने पुढे आलेला एक खडक आहे. त्यावर उभे राहून पाहावे. वाटते, की हे मंदिर नसून हा भारतीय युद्धातला अर्जुनाचा रथ आहे. शिवलिंगाचे स्थानही अर्जुनाची बसण्याची जागा आणि सभा मंडपाच्या पुढे आलेला सज्जा हे पार्थसारथी भगवंताचे स्थान.

हे लेणे मुख्यत्वे शिवाचे असले तरी इथे इतर अनेक मूर्तींची विपुलता पाहायला मिळते. मुख्य मंदिरातच नव्हे; तर सभोवतीचा काळा कातळ फोडून जो प्रमाणबद्ध प्रदक्षिणामार्ग तयार केलेला आहे, त्यातही अनेक देवदेवता आणि नानाविध पौराणिक प्रसंग साकार झाले आहेत. ते पाहताना वाटते, की विधात्याने आपल्याला दोनच डोळे देऊन फार कंजूषपणा केला आहे.

इथे लंकाधिपती रावणाला बरेच प्राधान्य मिळाले आहे. रावण हा अग्रगण्य शिवभक्त. शिवकृपा मिळविण्यासाठी त्याने लंकेहून कैलासाला येणे केले आणि तिथे उग्र तप आरंभले. पण दीर्घ काल लोटला तरी शिव काही प्रसन्न होईना. लंकेतले चौदा चौकड्यांचे राज्य सांभाळायचे, तर वर्षानुवर्षे बाहेर राहून चालण्याजोगे नव्हते. म्हणून त्याने आपल्या बलदर्पाला साजेसाच विचार केला. तो म्हणाला, आपण हा कैलासच उपटून लंकेत न्यावा. तिथे सावकाशपणे तपही होईल अन् राज्यावरही देखरेख राहील. लगेच त्याने कैलास उपटण्यासाठी माथे दिले. कैलास लंकेत गेला नाही; पण त्या प्रसंगाचे चित्र मात्र कैलासलेण्यात अमर होऊन राहिले आहे. प्रदक्षिणा करताना तुम्हाला ते नक्की दिसेल.

रावणाने गुडघे टेकून आपली दशशिरे आणि वीस हात कैलासाखाली दिले आहेत. तो सारी शक्ती पणाला लावून कैलास उचलतो आहे. सखी, पार्वती आणि शंकर या शिखराधिष्ठित मंडळीला या उत्पाताचा पत्ता नाही. एकाएकी कैलास गदगदू लागलेला पाहून उमेची सखी घाबरली आहे आणि ती सुरक्षित आसरा शोधण्यासाठी ओणवी ओणवी पळत आहे. पार्वती भयचकित होऊन शिवस्कंधाचा आधार घेत आहे.शिवाच्या मुद्रेवर भीती नाही; पण आश्चर्य आहे. हालता डोलता कैलास स्थिर करण्यासाठी तो वरून आपल्या पायाचा दाब देत आहे. तो दाब रावणाला असह्य होत आहे.त्याची दहाही शिरे पिळवटून पाठीकडे वळत आहेत. शिवधनुभंगाच्या वेळी रावणाची जी फजिती झाली, ती पहिली आणि ही दुसरी.

दुसऱ्या एका ठिकाणी रावणाने आपली नऊ शिरकमले स्वहस्ते उतरून शिवलिंगाभोवती प्रभावळ रचली आहे. त्या पुढच्या चित्रात पार्वती शिवाला विचारते, 'तुम्ही रावणाच्या भक्तीला केव्हा प्रसन्न होणार ? ' या ठिकाणी तिच्या मुद्रेवर जिज्ञासा स्पष्ट दिसते. तिच्या प्रश्नाचे उत्तर त्या पुढच्या चित्रात दिलेले आहे. शिव म्हणतो. ' रावण माझे आत्मलिंग मागतो आहे. मी ते त्याला देणार ! ' या चित्रात पार्वतीची मुद्रा म्लान आहे.

दुसऱ्या एका ठिकाणी शिव-पार्वती विवाहाचा समारंभ उभा केलेला आहे. तिथे सर्वांच्याच ओठावर सूक्ष्म स्मित उमलून राहिले आहे.दुसऱ्या एका ठिकाणी एक भयानक दृश्य आहे. पशुपतीने एका राक्षसाच्या पोटात त्रिशूळ खुपसून तो उंच धरला आहे. त्या राक्षसाचे नाव रक्तबिंदू. त्याला असा वर होता, की

त्याच्या रक्ताचा एक थेंब खाली पडताच त्यातून तसलेच शंभर राक्षस उत्पन्न व्हावे. शिवाने तसे न व्हावे अशी दक्षता घेतली आहे. त्याने रक्तबिंदूच्या खाली दुसऱ्या हाताने नरकपाळ धरले आहे. राक्षसाचे रक्त त्या कपालात ठिबकते अन् त्यातून एखाद दुसरा थेंब खाली पडल्यास मुख पसरून उताणी पडलेली काली देवी तो वरच्यावर चाटून टाकते.

आदिवराहाच्याही अनेक उंच उंच मूर्ती इथे पाहायला मिळतात. आदि-वराह हे राष्ट्रकूटांचे राजचिन्ह होते. त्यांनी लिहवलेल्या ताम्रपटांच्या प्रशस्ती-तही वराहाचा उल्लेख आढळतो. या वराहाने रसातळातून वर काढलेली पृथ्वी ही निरवयव वाटोळी नसून ती तन्वी, श्यामा अशी नाजूक नार आहे. ती वराहाच्या सुळ्यावर निश्चितपणे विसावली आहे. केवळ दगडातून या ठिकाणी भय, विस्मय, चिंता, ईर्ष्या, आनंद इत्यादी भाव प्रकट केले गेले आहेत. धन्य त्या कलाकारांची !

आणखी पुढे जाताना एका वळणावर शिवशंकर तांडवनृत्याच्या अभिनि-वेशात उभा दिसतो. त्याचा एक पाय पुढच्या चवड्यावर टेकवलेला आहे अन् दुसरा अधांतरी. किती विलक्षण पीळ आहे त्याच्या शरीराला ! उंच पण रेखीव अशी ती आकृती आहे. त्याच्या सौष्ठवयुक्त पाठीच्या कण्यावरून तर दृष्टी निघता निघत नाही. संस्कृत वाङ्मयातल्या नटराजविषयक सर्व कल्पना त्या मूर्तीत एकवटल्या आहेत. तांडवाचे स्फुरण त्याच्या नेत्रात आणि मुखावरच नव्हे; तर प्रत्येक अवयवात भरून उरले आहे. त्याचे भुजदंडच उठावलेले नाहीत. तर अंगावरचे फणाधारी नागही. शिवगण बेहोषीने त्याच्या त्या नृत्याला वाद्यांची साथ देत आहेत. शिवाच्या पाठीमागे एक मानवी अस्थि-पंजर उभा आहे अन् तोही शिवतांडवाचा हर्षोल्लास पाहताना खदखदून हसतो आहे हे दिव्य चित्र माझ्या स्मृतिपटलावरून कधीही पुसले जाणार नाही. ते पाहता पाहता मला मालतीमाधवातल्या त्या तांडव वर्णनाची आठवण झाली —

आता ते पाठीवरचे गजचर्म फडफडेल. त्याचे टोक अंगी घुसून जटाजूटातली ती चंद्रकला पाझरू लागेल. त्या अमृतद्रवाने शिवाच्या गळ्यातली नररुंडे सजीव होऊन अट्टहास मांडतील. बाजूबंदाचे काळे भुजंग घुसळले गेल्यामुळे फूत्कार सोडतील. हातातले खड्वांग अलातचक्रासारखे हवेत भिरभिरेल.

त्याच्या भ्रमणाने आकाशातल्या नक्षत्रांना तडाखे बसतील. कटपूतना, वेताळ वगैरे भूतगण टाळचा पिटीत पुढे येतील. सर्व प्रकारे असा हा भयानक रस पुंजाळलेला पाहून गौरी घाबऱ्याघुबऱ्या धावत येऊन धवळ्या भोळ्या शिवाच्या गळ्याला मिठी घालील. म्हणेल, ' नाथ, आता पुरे करा हे तांडव. विश्वाचा प्रलयकाल ओढवेल ! '

हे सगळे कैलासलेणे पुरे करायला तीन लाख घनफूट दगड खोदावा लागला आहे. दिव्यलोकीचे भूतलावर उतरलेले हे शिल्प पुरे व्हायला शंभर वर्षे खर्ची पडली आहेत. छन्नी अन् हातोडा या दोनच साध्या आयुधांनी इथले दगड फुटले अन् घडले आहेत. त्यासाठी विज्ञानयुगातल्या कोणत्याही हत्याराचा उपयोग झालेला नाही. कारण विज्ञानयुग अजून अवतरायचे होते. म्हणूनच त्याला आश्चर्य म्हणायचे.

पण या दैवी अश्मसृष्टीचा विधाता कोण म्हणून जर पुसाल, तर इतिहास कानांवर हात ठेवील. अडीच हजार वर्षांपूर्वी ग्रीस देशातल्या अथेन्स शहरात सर्वत्र पुतळेच पुतळे उभारणारा, ओपिलिआचे भव्य शिल्प निर्मिणारा टेकडी-वर अॅथनी देवतेची उत्तुंग मूर्ती उभी करणारा, दगडाधोंड्यातून रंगीबेरंगी कळ्या-फुले उमलवणारा आणि अथेन्सला दुज्या अमरपुरीची कळा चढवणारा तो शिल्प सम्राट फिडिअस – त्याचे नाव जगाला ठाऊक आहे. आपल्यालाही माहीत आहे. पण बाराशे वर्षांपूर्वी आपल्याच महाराष्ट्रात स्वर्गातली दैवत-सृष्टी खाली आणणारा हा प्रतिस्रष्टा विश्वामित्र मात्र कोण अन् कुठला ते आपल्याला माहीत नाही. बरे, तोही महाभाग असा निःस्पृह, की एखाद्या कोपऱ्यातल्या लहानशा दगडावरसुद्धा आपल्या नावाची चार अक्षरे उमट-वायाला त्याने छन्नी उचलली नाही. जणू तो आपल्याला म्हणतो, ' माझे नाव काय पुसता ? या लेण्याचे जे नाव तेच माझे. या मूर्तींची जी नामरूपे, तीच माझी. मी यांच्या वेगळा नाही. मला समजून घेणे असेल, तर माजी ही अफाट कलासृष्टी समजून घ्या ! '

कलादर्शनाचा आनंद हृदयात तुडुंब भरून घेऊन मी तिथून बाहेर पडलो. मनात म्हटले, याचे वर्णन काय करू अन् कसे करू ? उगाच शब्दांचे बुडबुडे उठवण्यात काय अर्थ ! सच्चिदानंद परमात्मा प्रमाणेच हा कलेचा खजिनाही वाणीला अगोचर आहे. हा शब्दाचा विषय नसून प्रत्यक्षाचा आहे. मुक्या

माणसाने साखर खावी, त्याला त्याची गोडी कळावी; पण सांगता मात्र येऊ नये, अशी इथे अवस्था होते. या दगडांची भाषा समजायला निराळेच डोळे, निराळेच अंतःकरण घेऊन जायला पाहिजे.


राष्ट्रकूटाच्या यश–कीर्ति–प्रतापाचा तो काळ होता. हिंदुधर्माच्या पुनः प्रतिष्ठेचा तो काळ होता.भारतभर फैलावलेला बौद्धधर्म अव्यवहार्य म्हणून जनांच्या मनातून उतरला होता. भगवान आद्य शंकराचार्यांनी तर्काच्या धारेवर धरून त्याच्या तत्त्वज्ञानाचे ठिसूळपण सिद्ध केले होते. आसेतुहिमाचल दिग्विजय करून शंकराचार्यांनी अगस्तीप्रमाणे बौद्ध धर्माच्या सागराचे आचमन केले होते. भारतीयांचा सनातन धर्म त्यामुळे पुनश्च उजळून निघाला होता. आणि हे सगळे राष्ट्रकूटांच्या आमदानीत झाले होते. हे घराणे इ. स. ७५० च्या सुमारास सरसावले आणि पुढे दोन सव्वा दोन शतके त्याने आपली सत्ता गाजवली. दंतिदुर्ग नावाचा एक शक्ति–युक्तींचा पुरुष त्या घराण्यात निपजला. त्याने चालुक्यांची मांडलिकी झुगारून दिली. समरांगणात सम्राट कीर्तिवर्म्याचा पराभव केला आणि एक बलाढ्य साम्राज्य स्थापले. हिंदुस्थानच्या इतिहासात ज्या स्वाऱ्या झाल्या आहेत, त्या प्रायः उत्तरेकडून दक्षिणेवर पण राष्ट्रकूटांच्या कारकीर्दीत याच्या उलट झाले. मराठी आणि कानडी सैनिकांनी एक होऊन उत्तरदिग्विजय केले आणि हिंदुस्थानभर आपला दरारा निर्माण केला. राष्ट्रकूटांच्या नंतर दाक्षिणात्यांचा असा उत्तरेवर वचक पहिल्या बाजीरावाच्या कारकीर्दीपर्यंत पुन्हा बसला नाही.

दंतिदुर्गाच्या अर्धवट राहिलेल्या महत्त्वाकांक्षा त्याचा चुलता कृष्णराज याने पुऱ्या केल्या. 'अकाल वर्षवल्लभ शुभतुंग' ही प्रदीर्घ बिरूदावली धारण करून तो गादीवर बसला. कैलासलेणे आणि घृष्णेश्वराचे मंदिर ही दोन्ही त्यानेच बनवली. असंख्य कलाकार कोण्या शिल्पगुरूच्या हाताखाली लेणी खोदण्यासाठी पुढे सरसावले. आश्चर्याची अन् तितकीच अभिमानाची गोष्ट ही, की त्यांनी एकाही बौद्ध गुंफेतल्या एकाही मूर्तीवर हातोडा उगारला नाही. बौद्ध धर्म जवळ जवळ नामशेष झाला होता. 'बुद्धं सरणं गच्छामि' ची घोषणा विरली होती. हिंदुधर्माचा नवोदय झाला होता. पण तशाही स्थितीत त्या राज्यकर्त्यांच्या आणि त्या कलाकारांच्या 'विवेकहरी' जागा राहिला. ते जणू म्हणाले. 'बौद्धांची खोदकला आपण आणखी पुढे नेऊ. तिच्यात अधिक

सूक्ष्मता, अधिक विविधता आणू. भावी पिढ्यांना दोन्ही प्रकार एकाच वेळी एकाच रांगेत पाहू देत. '

बौद्धांनी बुद्ध आणि त्याचा परिवार यांना खोदाईत प्राधान्य दिले, तर हिंदूंनी हरि-हरांना आपल्या कारागिरीत महत्त्व दिले. शैव-वैष्णव संप्रदाय याच कालात वाढीस लागले. ज्या चालुक्यांचा पाडाव करून राष्ट्रकूटांनी आपले साम्राज्य जोडले. त्याच चालुक्यांनी इ. स. ९७७ मध्ये ते पुनश्च मोडले. चालुक्य जैन होते. त्यांनाही याच कलेच्या द्वारे आपल्या धर्माचा उत्कर्ष दाखवावा असे वाटल्यास नवल नाही. त्यांनीही त्याच ओळीत पाच लेणी कोरली आणि त्यात महावीर पार्श्वनाथ इत्यादी आपले तीर्थंकर आकाराला आणले. इंद्रसभा, जगन्नाथसभा इत्यादी जैनांच्या लेण्यांची नावे आहेत. त्यातलीही कारागिरी अप्रतिम आहे. चालुक्यांनी राष्ट्रकूटांशी वैर केले; पण राष्ट्रकूटांनी निर्मिलेल्या कैलासाशी नाही. कैलासाचे अनुकरण तर त्यांनी केलेच; शिवाय आपल्याही काही अभिरुची त्यात प्रकट केल्या. जैनांचीही दीड दोनशे वर्षे या गुहानिर्मितीत खर्ची पडली आहेत.

तात्पर्य सांगायचे तर बिनझाडीच्या वर वर उपेक्षणीय वाटणाऱ्या या सामान्य गिरिमालेच्या पोटात कलासृष्टीची संपूर्ण एक हजार वर्षे साठवलेली आहेत. विस्मृतीच्या अंधारात विरून जाणारा भूतकाल इथे वज्रलेप केला गेला आहे. राजनैतिक आणि धार्मिक घडामोडींचे तीन टप्पे या गिरीकुहरात ठळकपणे दिसून येतात.



घृष्णेश्वर मंदिर

ही चौतीस विशाल गुहामंदिरे सुमारे पन्नास वर्षांपूर्वी केवळ बेवारशी गुरांचे गोठे, वन्य पशूंच्या लपण्याच्या जागा, दिवाभीतांच्या तमोमय ढोली, आणि भिकाऱ्या-टाकाऱ्यांची बिनभाड्याची घरे होती. कोणाला त्या गुंफांची कदर नव्हती. तत्कालीन निजामसरकारही

अंधळेच होते. पण कोण्यातरी जाणकार अन् वजनदार माणसाने या गुंफांचे महत्त्व पटवून निजाम सरकारचे कान आणि डोळे उघडले असावे. त्यानंतर त्यांच्या सुरक्षेची तरतूद झाली. आज मितीस या सर्व गुंफा अंतर्बाह्य स्वच्छ आहेत, जोपासलेल्या आहेत आणि जरूर त्या ठिकाणी डागडुजी केलेल्या आहेत. मुख्य रस्त्याला फाटे फोडून ते प्रत्येक टेकडीकडे नेलेले आहेत, तेही सुंदर आहेत. पोलिस कारवाईनंतर भारत सरकारने एक पर्यटनकेंद्र म्हणून त्याचा विकास केला आहे अन् पर्यटकांसाठी बऱ्याच सुखसोयीही केल्या आहेत.

त्यातल्याच एका रस्त्याने खाली उतरून आपल्याला घृष्णेश्वराच्या मंदिराकडे जाता येते. बारांपैकी हे शेवटचे ज्योतिर्लिंग समजतात. याच डोंगरावरून इलागंगा नावाची एक लहानशी नदी निघून ती पुढे गोदावरीला मिळते. तिच्या अरुंद अन् कोरड्या पात्राच्या काठी कोरड्याच भूमीवर घृष्णेश्वर मंदिर आहे. घृष्णेश्वर इथे कसा प्रकटला अन् त्याला घृष्णेश्वर हे नाव कसे पडले, याविषयी दोन कथा पुराणांतरी आहेत –

सुधर्मा नावाचा एक ब्राह्मण होता. त्याच्या पत्नीचे नाव सुदेहा. बराच काळ लोटला तरी तिची कूस उजवेना. म्हणून तिने आपल्या भावाच्या घृष्णानामक मुलीशी दुसरे लग्न करण्याबद्दल नवऱ्याला गळ घातली. तिच्या आग्रहास्तव सुधर्म्याने घृष्णेला पत्नी म्हणून घरात आणले. घृष्णा परम शिवभक्त होती. ती रोज १०१ पार्थिव लिंगांची पूजा करून ती तळ्यात विसर्जित करी. शिवकृपेने तिला पुत्र झाला; पण त्यामुळे सुदेहेला तिचा मत्सर वाटू लागला. घृष्णेच्या नावाने ती सतत जळू लागली. एके दिवशी तर ती पुरती अविवेकाच्या आहारी गेली आणि तिने घृष्णेच्या पुत्राला मारून त्याचे तुकडे तळ्यात फेकून दिले. घृष्णा शिवलिंगार्चन करीत असता तिला हा अनर्थ कळला. पण ती लवमात्र विचलित झाली नाही. तिने शांतपणे लिंगार्चन पुरे करून त्यांचे विसर्जन केले. तळ्यावरून ती परत फिरणार, एवढ्यात तिचा पुत्र जिवंत होऊन पाण्यातून वर आला. त्याच वेळी घृष्णेच्या भक्तीला भाळून शिवही प्रकट झाला. त्याने तिला इच्छित वर मागायला सांगितले. घृष्णा म्हणाली ' प्रभो, तू आजपासून या क्षेत्रात कायमचे वास्तव्य कर. ' शिव ' तथास्तु ' म्हणाला. घृष्णेश्वर नाव घेऊन तिथे राहिला.

वाराणसीत एके दिवशी शिव-पार्वती सारीपाट खेळत होती. त्या खेळात

शिव हरला, नंतर क्षोभला अन् काशीचा त्याग करून इथल्या काम्यवनात येऊन राहिला. पार्वती त्याचा शोध घेत घेत वने दांगे तुडवीत इथवर आली. निजरूपात शिवापुढे जाण्याची सोय नव्हती म्हणून भिल्लिणीचा वेष नटली. तिने शिवापुढे कलाकुसरीचे नृत्य आरंभिले. नृत्याबरोबरच मल्हार रागात गायनही सुरू केले. शिव लगेच विरघळला. तिला जवळ करायला निघाला. मग पार्वतीने निजरूप प्रकट केले. शंकराचा रागही मावळला. पार्वतीला हे काम्यवन फार आवडले. शिवाचे मन वळवून ती या वनात बराच काळ राहिली. एके दिवशी ती डाव्या हातावर उजव्या हाताच्या अंगुलीने कुंकू चोळीत असता त्यातून लहानसे शिवलिंग उत्पन्न झाले त्याचेच नाव पुढे घृष्णेश्वर पडले.

मी मंदिरापुढे जाऊन सभोवती पाहिले. चार बकुळीची झाडे आणि पिछाडीच्या डाव्या कोपऱ्यातली तृषिताची कधीही निराशा न करणारी विहीर, या गोष्टी जर तिथे नसत्या तर ते स्थान अगदी भकासच वाटले असते. मंदिर दक्षिणाभिमुख असून ते लालसर जांभ्या घोटीव दगडाचे आहे. गाभाऱ्यातले लिंग काळ्या पाषाणाचे आहे. शिखर फार सुंदर आहे. त्यावरचे मूर्तिकाम अन् नक्षीकाम प्रेक्षणीय आहे. मंदिराच्या छतावर आणि मंडपातील खांबांवर सुरेख चित्रे अन् नाजूक आकृती कोरलेल्या आहेत. त्यात पशु-पक्षी, वनस्पती, वादक, नर्तक, फुगड्या खेळणाऱ्या युवती, धनुर्धारी शिकारी, इत्यादी चित्रकारी कुशल हातांनी निर्माण केलेली आहे. मंदिराला दोन पक्षद्वारे आहेत. सभोवती प्रशस्त आकार असून त्याच्याभोवती उंच कोट बांधलेला आहे.

कैलास लेणे निर्माण करणाऱ्या राष्ट्रकूट कृष्णराजानेच हे मंदिरही बांधले. पुढे वेरूळ गावचे पाटील मालोजी भोसले यांनी त्या मंदिराचा जीर्णोद्धार केला. औरंगजेबाचा विध्वंसक हात याच्यावरही पडला. त्याने हे मंदिर पाडून कृतार्थता मिळवली. सध्याचे मंदिर मल्हारराव होळकरांची पत्नी गौतमाबाई हिने इ. स. १७३० साली बांधले, असे तिथल्या लेखावरून कळते.

देवाचे पुजारी गुरव; पण त्यांची वस्ती देवासन्निध नसून खालच्या गावात आहे. महादेवाला एकांतवासाची खंत नाही म्हणूनच ठीक. अन्यथा त्या ओसाड प्रदेशात कोणालाही राहावेसे वाटणार नाही.

देवळाच्या परिसरात कोणाच्या तरी दोन समाध्या आहेत. मी त्यांच्या-

विषयी पृच्छा केली. पण त्यांची माहिती मिळवण्याऐवजी क्षेत्रस्थ लोकांचे 'अगाध' ज्ञान तेवढे कळले. मग मी अनुमानधपका बसवला, की भोसल्यांचे पूर्वज इथे राहात असत, त्यांच्यापैकीच कोण्या भाग्यवंतांच्या दहनभूमीवर या मठचा उभारलेल्या असाव्या.

त्या दिवशी सोमवार असल्यामुळे जवळच्याच कुठल्यातरी गावातून काही ब्राह्मणमंडळी सकुटुंब सपरिवार घृष्णेश्वराला लघुरुद्र करण्यासाठी तिथे आली होती. ते कार्य उरकल्यावर जवळच्या धर्मशाळेत त्यांचा महाप्रसाद चालला होता. आम्हालाही त्यातला अंशभाग मिळाला.

तिथून आम्ही शिवालयतीर्थ पाहायला गेलो. हा तलाव दृष्टी लुब्ध होईल इतका सुंदर आहे. चोहोबाजूंनी तो खोलवर बांधून काढलेला आहे. मधे चार घुमटचा असून त्यात शिवलिंगे बसविलेली आहेत. शिवरात्रीच्या दिवशी घृष्णेश्वराची उत्सवमूर्ती पालखीत बसून वाजत गाजत इथे स्नानाला येते. यात्रेसाठी जमलेले हजारो लोक शिवाचा स्नानोत्सव भावभक्तीने पाहतात. या सुंदर तलावातले पाणीही जर स्वच्छ, सुंदर असते, तर त्याची शोभा द्विगुणित झाली असती; पण विधात्याच्या सृष्टीत सगळे एकस्थ सौंदर्य पाहायला मिळणेच दुर्लभ.



शिवालय तलाव

हा तलाव अहिल्याबाईनं बांधून काढला आहे. हिरव्या बाबुळीच्या थराखाली झाकलेले त्याचे पाणी स्वर्गंगेशी स्पर्धा करणाऱ्या पाताळीच्या भोगावतीचे आहे आणि तेही सदाशिवाने आपल्या अर्धांगीची तृषा हरण करण्यासाठी भूमीत त्रिशूल खुपसून वर आणलेले आहे.

## ५. रामटेक

रामटेक विड्याच्या पानांसाठी प्रसिद्ध आहे. पण तेवढेच काही त्याचे महात्म्य नाही. ते एक पुण्यतीर्थ आहे अन् काव्यतीर्थही आहे. माझे नागपूरला जायचे ठरले, तेव्हाच मी मनाशी निश्चय केला, की रामटेक पाहिल्यावाचून परत यायचे नाही. माझ्या या निश्चयाला तिथल्या स्नेहीमंडळींनी साथ दिली आणि दुसऱ्या दिवशी पंचपंच उष:काली निघणाऱ्या गाडीत बसून आम्ही रामटेक स्टेशनवर उतरलो. नागपूरपासून आम्ही पंचवीस मैलांवर आलो होतो. पण डोंगरचढणीला लागण्याच्या पूर्वी मला रामसागर हा तलाव पाहायचा होता.

रामटेक हाच त्या तलावाचा एक स्वयंभू तट झाला आहे. वरून सूर नदी उतरली, ती नकळत या पर्वतांच्या चक्रव्यूहात सापडली. तिने बिचारीने पुढे समुद्रमार्गाला लागण्याचा प्रयत्न केला; पण 'अवघ्या वाटा झाल्या क्षीण!' हा रामसागर म्हणजे ब्रह्मांडकटाहाची लहानशी प्रतिकृतीच म्हटली पाहिजे. पैलतीरावरची झाडेमाडे तिथून केवळ प्रादेशमात्र दिसतात. त्यावरून त्याच्या घराची कल्पना करावी. त्याला प्रदक्षिणा करायची, तर काशीविश्वेश्वराच्या पंचक्रोशीचे पुण्य सहज पदरात पडेल.

'सरोविगतवारिजम्' म्हणून भर्तृहरी बिनकमळांच्या तळ्याबद्दल हळहळला आहे. पण मला तर इथे कमळांच्या 'आई' बद्दलच शल्य लावून घ्यावे लागले. या अतिविस्तीर्ण सरोवरात फक्त डाक बंगल्याच्या बाजूनेच थोडेसे पाणी होते आणि शिशिर ऋतू त्यालाही आटवून, सुकवून पंकशेष करण्याच्या तयारीत होता. अगस्तीने एकाच आचमनात समुद्र कोरडा पाडला, आतला चिखल वर

आला, गतप्राण जलचरांचे सांगाडे इतस्ततः पसरले आणि धरित्रीचे ते अनंतपार विवर दृष्टीला भय, उद्वेग, जुगुप्सा निर्माण करणारे ठरले असे पुराणांतरी वर्णन आहे. रामसागराच्या तळवटी मात्र तसले काही न दिसता भाजीपाल्याचे मळे अन् शेताचे कुणगे दिसले. तिथे सगळे हिरवेगार होते. तसे ते नसते, रामसागरात ' राम 'च वाटला नसता. ती भाजीपाल्याची रोपे खालच्या भूमीचा ओल्हासा शोषून घेत निर्भय आत्मविश्वासाने वाढत होती, लवलवत होती.

तिथून आम्ही नागार्जुनाच्या पायथ्याशी आलो. तिथली उभी सोपानपरंपरा चढून वर जाईपर्यंत चांगलाच दम लागला. तिथल्या चिंचोळ्या तिकोनी गुहेत शेंदूर माखलेली एक ओबडधोबड आकृती आहे. तीच नागार्जुनाची प्रतिमा समजायची.सुमारे चौदाशे वर्षांपूर्वी नागार्जुनाने या ठिकाणी तपःसाधना केल्याचे सांगतात.

नागार्जुन ही त्या काळची एक बडी असामी होती. विदर्भात जन्म घेतलेला हा ब्राह्मण प्रकांडपंडित तर होताच; शिवाय वैज्ञानिकही होता. आयुर्वेदाच्या रसायनक्रियेत त्याने पुष्कळच संशोधन केले होते. माणसाला हजारो वर्षे तारुण्याच्या जोमाने जगता येईल असे अमृतरसायन शोधून काढण्यासाठी त्याची पराकाष्ठा चालली होती. त्याचे जपतपसाधन त्याचसाठी होते.

या नागार्जुनाला एका तपस्व्याने रसायनविद्या आणि किमया शिकविली अशी आख्यायिका आहे. याला भारतीय रसायनशास्त्राचा प्रवर्तकच मानतात. उपलब्ध खनिजांपासून विविध प्रकारची रसायने अन् शुद्ध धातू मिळवण्याच्या पद्धती याने शोधून काढल्या. पारा अन् इतर धातू यांचे संरस म्हणजेच संयुक्त धातू यानेच प्रथम तयार केले. याने रसरत्नाकर नावाचा एक ग्रंथ लिहिला आहे. त्यात अनेक रासायनिक प्रक्रिया अन् उपकरणे यांची माहिती दिलेली आहे.

वैदिक धर्म सोडून तो प्रथम जैन झाला. पुढे त्याही धर्माचा त्याग करून बौद्ध बनला अन् तिथेच स्थिरावला. बौद्धांच्या महायान पंथात माध्यमिक नावाचा एक संप्रदाय आहे. नागार्जुनाने तो स्वीकारला अन् त्याचे तत्वज्ञान निर्माण केले. नागार्जुनाचे तद्विषयक ग्रंथ बरेच आहेत. अशा गुणप्रकर्षांमुळे आणि विज्ञानसाधनेमुळे त्याला सिद्ध नागार्जुन अशी पदवी लाभली. पुढे त्याने नालंदा विद्यापीठाचे कुलगुरुपदही भूषविले, असे सांगतात.

गुहेचे दर्शन आणि मूर्तीला प्रणाम करून आम्ही तिच्या माथ्यावर चढलो. तिथे एक मेघडंबरी आहे अन् तिची मागची बाजू डोंगराला लागून आहे. तिला प्रदक्षिणा करायची तर दोन शिळांमधल्या निरुंद सापटीतून पार व्हावे लागते. आमचे सहप्रवासी त्या दिव्यातून अंगाला ओरखडा उठू न देता सहज पसार झाले. कारण आमच्यात कोणी ' सुखाचे पेलले दोंद ' अशापैकी नव्हता. अडकलो तो मी मात्र. पण तोही ' प्रस्थ ' म्हणून नव्हे; तर शिळेचा कोन लक्षात घेऊन तदनुसार शरीराला बाक देण्याची युक्ती चटकन साधली नाही म्हणून. वस्तुतः इथे प्रदक्षिणा घालण्याचे काहीच प्रयोजन नाही. पण माणसांच्या अनेक आनंदात साहसाचा, अडचणीतून निसटण्याचा म्हणून एक आनंद असतो. त्याच्या पूर्तीसाठीच असल्या अनेक गोष्टी होतात.

तिथून डोंगराच्या कणीने मैल दीड मैल चालून आम्ही अंबाळे तलावावर उतरणार होतो. त्यावेळी दुसरा प्रहर संपायला आला होता. उन्हाचा ताप वाढू लागला होता. सूर्यकिरण गारेच्या स्वच्छ दगडांवर चमचमत होते. फुटलेल्या शिळांवर कसल्यातरी धातुरेखा चकाकत होत्या. डोंगरमाथ्यावरचे रान शिशिराने झाडून टाकले होते आणि वाऱ्याचा रस्ता मोकळा करून दिला होता. पर्णहीन अर्जुनवृक्षांच्या शाखा कशा वेडयावाकडया दिसत होत्या. महाकवी भारवीच्या भाषेत बोलायचे, तर ते शतबाहू अर्जुनवृक्ष भुजा उभारून आणि करांगुळी वक्र करून तांडवाला उभे झाले होते.

पण त्या नृत्याचे प्रेक्षक कोण ? मान डोलवणारे कोण ? वेलीतर केव्हाच सुकून गेल्या होत्या. जवळ होती ती काटेरी झुडपे. पण त्या अरसिकांना त्या नृत्यप्रयोगाचे काय होय ? नाही म्हणायला पारिजातकाची झाडे मात्र ठायी ठायी आपल्या वसाहती थाटून बसली होती. मला वाटले, हे सगळे प्राजक्त श्रावणात फुलून लवले, की उभा डोंगर कसा सुगंधाने धुंद होत असेल. मग स्वर्गातल्या देवेंद्राचे ' फुलारी ' यक्ष-गंधर्व रात्रीच्या निवान्त वेळी आपली विमाने फुले वेचण्यासाठी इथे उतरीत असतील.

रामसागर आणि अंबाळा यांमध्ये फक्त डोंगराची एक भित उभी आहे. पण रामसागर कोरडा तर अंबाळा भरलेला. एकेकाचे नशीब हेच खरे. मला एक शंका आली. रामसागराचा रस भूगर्भातून या अंबाळ्याने आपल्या पोटात

ओढून तर घेतला नसेल ? ही अंबाळ्याची चोरी का रामसागराचे दान ? पुष्कळदा असे होते, की यज्ञकर्त्या ऋत्विजांच्या घरात सुवर्णमुद्रा अन् रघुराजाच्या हाती मातीचा थाळा. एखाद्याने औदार्याचा पुतळा बनून दोन्ही हातांनी वैरीत सुटावे, अंती कफल्लक व्हावे आणि त्याच वेळी त्याच्या दानावर आश्रितांनी गबर होऊन बसावे, असाही प्रकार पुष्कळदा दिसतो. चारुदत्ताचे असेच झाले नाही का ? शेवटी त्याला कायमची गरिबी पत्करावी लागली.

अंबाळ्याचे पाणी नाचत नाचत आम्हाला सामोरे येत होते. आम्ही एकेका पावलाने त्याला जवळ करीत होतो. ' निर्वाणाय तरुच्छाया तप्तस्य हि विशेषतः ' हे सावलीच्या बाबतीत जितके खरे; तितकेच ते जळाच्या बाबतीतही खरे आहे. तळ्याची एका बाजूची कड सावलीत सापडल्यामुळे काळी अन् गंभीर दिसत होती. बाकी सगळ्या जलपृष्ठावर मध्यान्हाचे काव्य बरसत होते. समोरच्या तीरावर शिव-मंदिराची रांग उभी होती. सगळी कशी छोटेखानी, विविध शिल्परचनेची आणि नखशिखान्त चुन्याने सारवलेली ही देवळे दुपारी उन्हात न्हातात, आणि तळ्याचे पाणी ' निवान्त निष्कंप ' झाले, की त्यात आपले प्रतिबिंब पाहून स्वतःच्या सौंदर्याचा गर्व मिरवतात. मला वाटले,

**पयसा कमलं कमलेन पयः**
**पयसा कमलेन विभाति सरः ।**

' पाण्याने कमल शोभते, कमलाने पाणी शोभते आणि पाणी अन् कमल यांनी सरोवर शोभते. ' या धर्तीवर एखाद्या कवीला दुसरे एक सुभाषित तयार करायला सांगावे – तळ्यामुळे देवळे शोभतात, देवळांमुळे तळे शोभते आणि देवळे नि तळे यांमुळे ते दोही अंगींचे डोंगर शोभतात.

मंदिराच्या मागचा तो निरुंद रस्ता, ती तुरळक रहदारी, मागचा तो नागपूर भोसल्यांचा पडका वाडा, डाव्या हाताची रस्त्यावर उभारलेली गौरकाय कमान, उजव्या हाताचा तो रामगिरीचा सोपान मार्ग. हे सगळे चित्र, त्याचे रस-रंग, हे सर्व काही दिव्य, आकर्षक दिसत होते. जणू एखाद्या यक्षभूमीतून आम्ही चालत होतो.

पण कोणत्याही आनंदाला विषादाची सूक्ष्म किनार असायलाच हवी, असा जणू विधिसंकेतच आहे. तुम्ही आम्ही त्याला काय करणार ! अंबाळ्याच्या तीरावर इथे तिथे चाललेले ते अशौचातले क्षौर कर्म, ती और्ध्वदेहिकाची मांडावळ, ते अंगठा वाकडा करून फरसबंदीवर ठेवले जाणारे पिष्टपिंड, त्या माणसांच्या मुद्रेवरचे ते शून्य, उदास भाव, हे सगळे अकल्पितपणे पाहावे लागल्यामुळे माझा हर्ष एकदम विरजला. पण वास्तव सत्य नाकारता येणार नव्हते.

सीतामाईने या तळ्यात स्नान केले होते अन् अंबराजाचे गलत्कुष्ठ याच जलाने नाहीसे झाले होते, या पौराणिक आधारावर अंबाळा हे मोक्षदानी क्षेत्र ठरले आहे. या प्रांतातले श्रद्धाळू लोक प्रयागक्षेत्री न जाता मृताचे अस्थि-विसर्जन इथेच करून त्यांना स्वर्गमार्ग मोकळा करतात.

तिथून आम्ही रामटेकच्या गढीचा रस्ता चढू लागलो. हा रस्ता रुंद असा बांधून काढलेला आहे. वाटेत सावली नसली, तरी करमणूक भरपूर मिळाली. शेपट्या उंचावीत वर खाली हिंडणारी वानरांची टोळकी आशेने आमच्या जवळ येऊ लागली. एका वानरीने तर स्त्रीसुलभ लाजलज्या गुंडाळून ठेवून माझे मनगट पकडले आणि फुटाण्यांनी भरलेली माझी मूठ रिकामी करून घेतली. थेट देवद्वारापर्यंत या रामदूतांनी आमचा पाठलाग केला आणि सर्वांकडून खंडणी वसूल केली. त्यांच्या देखत खिशात हात घालायची सोयच नव्हती. तसे केले असते, तर खिसा आणि अंगरखा यांची वजाबाकी ठरलेली.

इथल्या राममंदिराला विस्तीर्ण प्राकार आहे. चारी दिशांना दरवाजे आहेत. पाचशे फूट उंचीच्या या डोंगराला जरूर तिथे भक्कम तटबंदीही आहे. हे मंदिर वाकाटक राजांच्या कारकीर्दीतले आहे. त्याच्या रचनेवर बौद्ध शिल्पाची छाप स्पष्टपणे दिसून येते. इथे लक्ष्मण रामाच्या शेजारी नसून त्याच्यापुढे आहे. असे दर्शन अन्यत्र नाही. मला ही गोष्ट सयुक्तिकच वाटली. कारण वनवासाच्या त्या चौदा वर्षांत लक्ष्मण नेहमी एक पाऊल रामाच्या पुढेच राहिला आहे.

**राम चाले वाटे । लक्ष्मण झाडी काटे ।**
**असे बंधू नाही कोठे । संसारात ॥**

असे म्हणून भारतीय नारींनी लक्ष्मणाला परोपरीने गौरवले आहे.

याच लक्ष्मणमंदिरात रामदेवराव यादवाच्या काळचा एक शिलालेख गाभाऱ्याच्या बाह्य भागावर भिंतीत बसवलेला आहे. मंदिर सारवणाऱ्या सेवेकऱ्याच्या हातचा चुन्याचा कुंचा भिंतीबरोबरच त्याच्यावरूनही फिरला आहे. त्या गिचमिड शिलालेखाची किंमत त्या सेवेकऱ्याच्या लेखी शून्य. त्यासाठी जीव थोडा थोडा होतो तो इतिहास संशोधकांचा.

लक्ष्मणाची भेट घेऊन आम्ही रामदर्शनाला गेलो. पुढे वसंत अवतरणार म्हणून आतापासूनच पिवळा पोशाख करून रामराय सीतामाईसह चांदीच्या नक्षीदार प्रभावळीत उभा होता. पुजाऱ्याच्या हाती आमचा पुष्पहार त्याच्या गळ्यात रुळवून आम्ही तीर्थप्रसाद घेतला. या देवस्थानाला सालिना हजारो रुपयांचे उत्पन्न आहे. त्याच्या अंगाखांद्यावर प्रसंगविशेषी हिऱ्यामाणकांचे जे अलंकार चढवतात, त्यांचे मोल दोन लाखांहून अधिक भरेल.

रामटेकला काशीयात्रेचे महाद्वार म्हणतात. जुन्या काळी म्हणजे सुमारे दीडशे वर्षांपूर्वी नव्हती आगगाडी की नव्हती मोटारबस. तरीही दक्षिणापथातल्या लोकांनी काशीयात्रा करायचे सोडले नव्हते. भाविक लोक जिवाच्या करारावर यात्रेसाठी निघत आणि पायी प्रवास करून काशीक्षेत्र गाठीत. दक्षिणेच्या लोकांचा काशीला जाण्याचा मार्ग रामटेकवरूनच जात असे. इथे मुक्काम करायचा, रामदर्शन घ्यायचे, यात्रा निर्विघ्न पार पाडण्याबद्दल त्याला प्रार्थायचे आणि पुढे विंध्य पर्वताच्या मोहरेस लागायचे.

इथे त्रिपुरी पौर्णिमेस मोठी यात्रा भरते. पूर्वी एक नवा कोरा पितांबर तुपात बुडवून त्याचा त्रिपूर पाजळीत आणि तो उजेड नागपुरातून पाहता येत असे, अशी आख्यायिका सांगतात. आम्ही ती त्रिपुराची जागा पाहिली आणि तिथल्या रामझरोक्यांतून विशाल आसमंतही पाहून घेतला.

इथे आणखी दोन वेगळ्या नावाचे राम आहेत. एक कपटराम अन् दुसरा भोगराम. कपटरामाचा अर्थ समजू शकला नाही. तो गावाच्या बाजूने डोंगरकपारीत लपून बसला आहे. भोगराम प्राकारद्वाराच्या आत डाव्या अंगाला आहे. भोगराम ही चतुर्भुज विष्णूमूर्ती असून ते महानुभावांचे एक उपास्य आहे. त्या दिवशी बरेच महानुभाव स्त्री-पुरुष त्याच्या दर्शनाला आले होते. पंथाचे

संस्थापक चक्रधरस्वामी इथे काही काळ राहिले होते. त्यामुळे रामटेक हे महानुभावांचे पुण्यक्षेत्र बनले आहे. मंदिराच्या मागच्या बाजूला दोन तीन ओटे आहेत. ते एका भाविक महानुभावाने पुढे होऊन आम्हाला दाखवले.

प्राकाराच्या आत उजव्या बाजूला वराहाचा चौपाळा आहे. आणि त्यात आदिवराहाची सुमारे चार फूट उंचीची सर्वांगपुष्ट अशी मूर्ती आहे. तिच्या पदतळी हिरण्याक्ष दडपलेला आहे. वराह हे राष्ट्रकूटांचे राजचिन्ह होते. वेरूळची लेणी त्यांच्याच हातची असून त्यातही वराहमूर्तीचे अस्तित्व दिसते. राष्ट्रकूटांच्या ताम्रपटांच्या प्रशस्तीतही वराहाचे नामग्रहण असते. आठव्या शतकापासून राष्ट्रकूटांचा अंमल सुरू होतो. रामटेकवरची ही वराहमूर्तीही त्याच कालातली असावी. म्हणजे तिचे वय आता तेराशेच्या जवळपास आहे.

अवतारकल्पनेत वराहाला तिसरे स्थान आहे.त्याची बीजे वैदिक वाङ्मयातच आढळतात. तैत्तिरीय संहितेत म्हटले आहे – प्रथम हे विश्व जलरूप होते. प्रजापती हा वायू बनून त्या जलावरून तरंगला. त्याला त्या जळात पृथ्वी दिसली. आता तिला वर कशी काढायची ? प्रजापतीला कल्पना सुचली. त्याने लगेच वराहरूप घेतले अन् आपल्या सुळयावर घेऊन पृथ्वीला वर काढले.

इथे यात्रेकरूने या वराहाच्या पोटाखालून जायची प्रथा आहे. मीही त्या प्रथेला अनुसरलो. सरपटत सरपटत दुसऱ्या अंगाला गेलो.

वराहाच्या पुढे नरसिंह. सेंदूरबावलीच्या दक्षिणेस त्याची दोन मंदिरे आहेत. एक आहे छोटा नरसिंह अन् दुसरा मोठा नरसिंह. धाकटचा नरसिंहानेच माझ्या छातीवर दडपण आणले; मग थोरल्याबद्दल काय बोलावे ! थोरला बसलेला असूनही दीड पुरुष उंच आहे. शेंदुराचा चार आंगळे जाडीचा थर त्याच्यावर दाटलेला आहे. पाठमोरा पाहिल्यावर त्याच्या आयाळीची खरी कल्पना येते. एखाद्या कमकुवत मनाच्या माणसाने त्याला पाहिले, तर तो स्वप्नात येऊन त्याला निजल्या जागी घामाघूम करील.नरसिंहाने हिरण्यकशिपूचे पोट फाडले. ते या ठिकाणी. त्याच्या रक्ताचे जे पाट वाहिले, त्यामुळे हा रामगिरी लालीलाल झाला. म्हणून त्याचे दुसरे नाव पडले सिंदूरगिरी. पद्मपुराणात ही हकीगत आहे.

त्याच्या पुढचा अवतार म्हणजे ‘ उरुगाय ’ वामन. तोही रामटेकवर आहेच.

आज त्याचा निवारा ढासळून पडला आहे. त्याच्या मस्तकावर अभ्रे काय छाया करतील तेवढीच. मग आरती – धुपारती तरी कुठून असणार !

याहून दुर्दैवाची गोष्ट म्हणजे त्याची मूर्तीही भग्न झाली आहे. अप्रतिम पुरुष लावण्याच्या त्या मूर्तीवर ज्या कोणाचा विध्वंसक हात पडला असेल, त्याचे देव भले करो! पण ही मोडतोड एवढ्यावरच थांबलेली नाही. इतर लोकही अधून मधून त्या मूर्तीचे कपचे पळवतात. कशासाठी ठाऊक आहे? त्या तांबड्या दगडाच्या चूर्णाने म्हणे सोन्याचांदीची भांडी लख्ख उजळतात. या दुर्दैवी वृत्तीला कोणत्या शब्दांनी बोल लावायचा ! कला आणि संस्कृती यांच्या या आणि अशाच विध्वंसाविषयी कविमन कसे पिळवटून निघते, ते पाहायचे असेल तर कवी अनिल यांचे 'भग्नमूर्ती' हे काव्य वाचावे. आज अवशिष्ट असलेल्या मूर्तीचे ते आपल्या मुक्त छंदात वर्णन करतात, ते असे –



वामनाची भग्नमूर्ती

शिखेपासून नखापर्यंत
लिहिले जणू पाषाणातच
ओजस्वी काव्य वीर रसाचे
भरीव, सुंदर आणि रेखीव
उरुमाळ रुळे मांडीवरती
अद्‌भुत तीवर भावमिश्रण
शांत-विक्रांताचें
आकृष्ट भिवया विशाल भाल
विस्फारित तेजे दिव्य लोचन

स्फुरित नासिका कंपित ओष्ठ
ऐसे हे दर्शन त्रैलोक्यव्यापी —

वामनांच्या या शिल्पातच खालच्या बाजूला बळिराजा खोदलेला आहे. पण त्याच्या मस्तकावर ठेवला जाणारा त्रिविक्रमाचा उजवा पाय गुडघ्यातूनच भंगला आहे.

या दृश्यावरून जनपदातल्या लोकांनी त्या शिल्पाचा एक नवाच अर्थ लावला आहे. ते त्या शिल्पाची बळी-वामन ही ओळख विसरले आहेत. ते त्या शिल्पाला 'बहीण-भाऊ' म्हणून ओळखतात. बळीच्या मूर्तीकडे निरखून न पाहिल्यामुळे त्यांनी तिला बहीण बनवले. आणि वामन झाला भाऊ. मग भावाचा पाय असा गुडघ्याखाली शून्य का? तर त्याने बहिणीच्या माथी लाथ मारली. त्या पापामुळे तो किडला अन् झडला. बहीण बिचारी प्रेममूर्ती. ती भावाचा अपराध पोटात घालून त्याच्या गळलेल्या पायातले कृमी उपशीत राहिली आहे. लोककथा कशा बनतात, त्याचा हा एक नमुना लक्षात ठेवण्याजोगा आहे.



वामनाच्या मूर्तीचे पूर्णस्वरूप दर्शन

रामटेकबद्दल प्राचीन काळाची माहिती जशी मिळते, तशी ती ऐतिहासिक काळाची मिळत नाही. ती जमवण्यासाठी महामहोपाध्याय वा. वि. मिराशी यांना बरेच संशोधन करावे लागले आहे. त्यांच्या संशोधनाचा निष्कर्ष असा—

रामटेक हे रामगिरी या नावाने निदान पंधराशे वर्षे तरी प्रसिद्ध आहे. प्राचीन काळी या पर्वतावर रामाच्या पादुकांची पूजा होई. 'वंद्यैः पुसां रघुपतिपदैः रंकितं मेखलासु' ( रामप्रभूच्या पूज्य पावलांनी अंकित झालेला हा रामगिरी ) या कालिदासाच्या मेघदूतातील उल्लेखावरून या गोष्टीची कल्पना येते.

इतिहासकाळात कधीतरी तिथे पादुकांऐवजी राम-सीता अन् लक्ष्मण यांच्या मूर्ती स्थापल्या जाऊन त्यांची पूजाअर्चा सुरू झाली असावी.

वाकाटक राजे हे रामाचे उपासक होते. त्यांनी इथल्या देवस्थानांच्या व्यवस्थेसाठी काही कायमची तरतूद केली होती, असे त्यांच्या ताम्रपटावरून दिसते. नंदिवर्धन म्हणजे हल्लीचे नगरधन ही वाकाटकांची राजधानी होती आणि ती रामटेकच्या अगदी नजीक होती. या कुलातला प्रवरसेन (दुसरा) हा राज्य करीत असता याच्या दरबारात कविकुलगुरू कालिदास हा सम्राट चंद्रगुप्ताचा प्रतिनिधी म्हणून काही काळ राहिला होता. राजधानीतल्या राज-मंडळींबरोबर तोही रामटेकला वारंवार येत असे. इथला मनोहर निसर्ग पाहून त्याला आपले मेघदूत हे खंडकाव्य लिहिण्याची स्फूर्ती झाली. (कालिदासाचा यक्ष विरही होता आणि थोड्याच काळात त्याचा विरह संपणार होता. कालिदासही इथे विरहीच होता. कारण त्याची प्रियतमा मगधात आपल्या घरीच राहिली होती. थोड्या कालाने तोही स्वगृही परतणार होता आणि या विरहयात्रेचे पारणे करणार होता. मग आपण लवकरच परत येऊ, हा निरोप पाठवून प्रिय पत्नीला आश्वासन द्यायला नको होते का ? ते त्याने मेघाच्या मार्फत पार पाडले.) कालिदासाचे मेघदूत इथेच सुरू झाले आणि इथेच ते पूर्ण झाले. सांप्रत या घटनेचे स्मारक म्हणून रामटेकवर कालिदासाचे एक भव्य सुंदर स्मारक बांधले जात असून ते पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. त्या कवि-कुलगुरूला उचित अशी ती श्रद्धांजली ठरणार आहे.

औरंगजेबाची कारकीर्द म्हणजे हिंदूंच्या मनात धाक आणि भय. इथल्या पुजाऱ्यांना वाटले, की औरंगजेबाची वक्रदृष्टी रामटेकवर पडली, तर इथल्या मूर्ती सुरक्षित राहणार नाहीत. म्हणून त्यांनी त्या उचलल्या अन् दुधाळे नावाच्या तलावात बुडवून ठेवल्या. पुढे नागपूरचे अधिपती रघूजी भोसले यांनी त्या मूर्ती तलावातून काढून इ. स. १७५३ साली त्यांची त्या त्या मंदिरात पुन्हा प्रतिष्ठा केली. त्यांच्या पूजेअर्चेची कायम व्यवस्था व्हावी म्हणून त्यांनी खूप द्रव्य दिले आणि एक विश्वस्त निधीही उभारला.

# ६. नाथांचे पैठण

आज आपण औरंगाबादला बसमध्ये चढतो आणि तीस मैलांचा रस्ता दोन तासांत कापून पैठणला उतरतो. यंत्रयुगाचे हे आपल्यावर उपकार आहेत. पण या प्रवासात एकदा मनात असा विचार येऊन गेला, की सातशे वर्षांपूर्वी किशोरवयातले ज्ञानेश्वर-मंडळ जेव्हा आळंदीहून पैठणच्या यात्रेला निघाले, तेव्हा त्याला किती हालताप भोगावे लागले असतील ! निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान हे एकामागचे एक तिघे बंधू. पण या प्रवासात ते काय सडे होते ? मुक्तेचा बालजीव आलटून पालटून त्यांच्या पाठुंगळीस असायचाच.

जुन्या काळी प्रवास कष्टदायक होता, ही गोष्ट खरी. पण त्या कष्टांचे परिमार्जन व्हावे, एवढा आनंदही त्यात गवसे. जुने प्रवासी निसर्गाच्या जण पोटात शिरत. ते त्यातलेच एक बनत. निसर्गाचे नवे नवे रंग, कलाकुसरी, लीलालहरी, त्यांचे कधी रुद्र तर कधी शिव असे सौंदर्य, हे सगळे त्या प्रवाश्यांना डोळ्यांच्या अंजुळीने घोटता येत असे. आज आपण निसर्गाच्या अंगावरून भर्रकन निघून जातो. संकीर्ण असे पाहतो पुष्कळ; पण अनुभवीत मात्र काहीच नाही. नुसती पाने फडफडवून ग्रंथ वाचल्याचे जेवढे श्रेय, तेवढेच अशा धावत्या प्रवासाचे.

सकाळी नऊ वाजता आम्ही मंडईपुढच्या बसस्टँडवर उतरलो. त्या दोन दिवसांत तिकडच्या भागाला वळवाच्या सरी पडून गेल्या होत्या. आजही सकाळ-पासून दुर्दिनच होते. काळसर पांढरे ढग सूर्याला उघडण्या झाकण्याचा पोर-खेळ करीत होते. त्यामुळे हवेत उकाडा बराच जाणवत होता. मी म्हटले, 'उकडू दे किती उकडते ते. गोदावरी आता जवळच आहे.'

धूळभरल्या निरुंद रस्त्यावरून आम्हाला प्रथम थोडासा चढ चढावा लागला आणि मग थेट नदीपर्यंत गेलेल्या रस्त्याच्या मध्यभागी श्री. नरहरिबुवा

जहागिरदार यांचे घर भेटले. बारा वर्षांनी प्रेमाचा बंधू घरी यावा तसे त्यांनी आमचे स्वागत केले. बुवा म्हणजे तथाकथित संत-महंत नव्हेत. ते पैठणचे नामांकित वकील आहेत. प्रसंगविशेषी ते सांप्रदायिक निरूपण करतात म्हणून लोक त्यांना बुवा म्हणतात. विशेष म्हणजे एकनाथमहाराजांचे ते बारावे वंशज आहेत. वाणी लाघवी, वृत्ती निरहंकार आणि मन मोकळे. मी स्वतःशीच म्हणालो, ' नाथांच्या वंशात शोभतो खरा. '

उन्हाळ्यात नदी आटते; पण तरीही ती लोकांना प्रिय असते. त्यातून ही नदी म्हणजे ब्रह्मगिरीवरून निघालेली दुसरी गंगाच ! तब्बल एका वर्षाने पुनश्च ती मला भेटणार होती, जवळीक करताच कुरवाळणार होती. मोठ्या उत्साहाने मी चंबूगवाळे खाकेला मारले. तिथवर गेलो अन् तीरावरच्या वृक्षच्छायेत उभा राहिलो. तिथून ऐल–पैल तीर न्याहाळले. ' गोदावर्याः दक्षिणे तीरे शालिवाहन शके –' असा संकल्प माझ्या नित्य पठणात होता. त्या नेमक्या जागी मी आता आलो होतो. गोदावरीचे पात्र ' चक्षुर्वै सत्यम् ' होते अन् शककर्ता शालिवाहन इथे जन्मला, हे इतिहास सांगत होता.

केवढे विस्तीर्ण ते वाळवंट ! चंद्रभागेचे याच्यापुढे अगदीच तोकडे. दूरवर दिसणाऱ्या नागघाटाखाली काय डोह असेल तेवढाच. बाकी सर्व पात्र उथळ. आटून कृश झालेला प्रवाह पैलतीराला चिटकून वाहात होता. मी सपशेल आडवा पडलो, तेव्हा कुठे डोक्यावरून पाणी गेले.

कालच रामनवमी झाली होती. पुढच्या पौर्णिमेला हनुमान जयंती येणार होती. या दोहोंच्या मधली एकादशी साधून गावोगावच्या कावडी तिथे येऊ लागल्या होत्या. आम्ही नदीवर होतो तेवढ्यातच कावडीवाल्यांचे दोन तीन मेळ डफ-दिमड्या वाजवीत तिथे पोचले. गाय दिसताच वासराने जशी धाव घ्यावी, तितक्या घाईने ते लोक धावत धडपडत पात्रात उतरले. अंगभर पाणी उडेल, इतक्या घाईगर्दीने ते ऐलतीराला आले आणि ' आणि गाठला एकदाचा मुक्काम ', अशा समाधानाने वाळवंटात ऐसपैस पसरले. त्यांच्या आधीही दुसऱ्या गावच्या कावडी तिथे येऊन थडकल्या होत्याच. ती मंडळी आता फराळ-पाण्याच्या तयारीला लागली होती.

या सर्व कावडी रात्रौ वाळवंटातच मुक्काम करणार होत्या. ते कावडी-वाहक आभाळाच्या रत्नजडित चांदव्याखाली झोपणार होते. दुसऱ्या दिवशी

एकादशीचे पर्वस्नान करून नाथांची भेट घेणार होते. आणि मग आपापल्या गावच्या मारुतिरायाच्या स्नानासाठी गोदाजलाने कावडी भरून घेऊन पैठण सोडणार होते. चैत्रवारीला अशी हजारो कावड तिथे येते आणि त्या कावडी-वाल्यांच्या संगे गोदामाई गावोगाव जाते. आसपासचे दहाबारा कोसातले मारुती आपल्या जयंतीच्या पुनवेस गोदाजलाने न्हाऊन निघतात.

पैठणगाव गोदातीरावर आहे हे म्हणणे अल्पोक्त ठरेल.खरे तर ते गोदावरीने वेढलेले आहे. त्याच्या तीन बाजू भरतखंडाप्रमाणे सजल आहेत. गोदावरी प्रथम पूर्व-पश्चिम वाहते. नंतर दक्षिणोत्तर वळते. आणि पुनश्च मूळपदाला येते.

नद्यांच्या तीरावर ज्ञान आणि संस्कृती यांची विशेष प्रकारे वाढ होते, असा सामान्य नियम आहे. पैठणही त्याला अपवाद नाही. इतिहासकाळी ते विद्यापीठ आणि धर्मपीठ होते. इथला धर्मनिर्णय महाराष्ट्रमंडळात अखेरचा मानला जाई. पैठणच्या पुढे धर्माच्या बाबतीत बोलणे नाही. उत्तरेला काशी ज्या तोलाची त्याच तोलाचे दक्षिणेत प्रतिष्ठान म्हणजे पैठण. लखलखीत विद्वत्तेचे वैदिक अन् शास्त्री-पंडित इथे अखंड परंपरेने निर्माण होत होते, धर्मसभांतून शास्त्रार्थ गाजत होते. रामेश्वरभट्टांसारखे महान आचार्य इथे विद्येचे सदावर्त घालून बसले होते. कोण्याही विद्यार्थ्याने यावे अन् हवे ते शास्त्र अभ्यासावे. निर्णय-सिंधूचा कर्ता कमलाकरभट्ट आणि शिवछत्रपतींच्या मस्तकावर राज्याभिषेक करणारा गागाभट्ट हे मूळचे पैठणचेच. या भट्ट घराण्याला काशीत अद्यापि अग्रपूजेचा मान आहे.

हेच पैठण पुढे एकनाथांच्या काळात भक्तिपीठ बनले. ज्ञान आणि वैराग्य या दोन पुत्रांसह भगवद्भक्ती आपल्या पोषणासाठी इथे वास्तव्याला आली. मराठी रसवंती तर म्हणाली की, ‘गोदातीर हेच आता माझे माहेर! आता मी ओवी छंदाचा पूर लोटीन. अभंगरूपाने निरूपणे, कीर्तने रंगवीन. भारूडांच्या रूपाने लोकसमाजाच्या जिव्हाग्री लीलानृत्य करीन. गोदावरी जनांचे देह क्षाळिते. मी त्यांची मने क्षाळीन.’

गेली अडीच हजार वर्षे या ना त्या कारणासाठी पैठणचा कीर्तिपरिमल दिगंधी धावत आहे. पैठणचा सर्वांत जुना उल्लेख बौद्धांच्या ‘सुत्तनिपाता’त आढळतो. अशोकाच्या शिलालेखातून इथल्या रहिवाशांना ‘पेत्तनिक’ म्हटले

आहे. ख्रिस्त शकाच्या पूर्वीपासून पैठणचे श्रेष्ठी अन् महाजन देशातच नव्हे; तर परदेशातही जाऊन व्यापारधंदा करीत. इ. स.च्या पहिल्या शतकात पेरिप्लस नावाच्या एका इजिप्शियन लेखकाने भारताचे ग्रीस, रोम इत्यादी परदेशांशी व्यापारी दळणवळण कसे चालते, याविषयी आपल्या पुस्तकात पुढील मजकूर लिहून ठेवला आहे –

'दक्षिण देशात फक्त दोनच शहरे व्यापारी दृष्टीने महत्त्वाची आहेत. एक पैठण अन् दुसरे नगर. पैठणला पोचण्यास भडोचहून दोन दिवसांचा प्रवास करावा लागतो. पैठणहून भडोचला गोमेद नावाची रत्नांची फार मोठी निर्यात होते. हा सर्व माल मोठ्या गाड्यांमधून आणि चांगले रस्ते नसलेल्या परदेशातून आणावा लागतो. पैठणलाच नानाप्रकारचे कापड तयार होते. जरीचे काम सर्वांत चांगले कुठे तयार होत असेल, तर ते पैठणला. रेशमी जरी बुट्ट्यांच्या लुगड्याला पैठणी म्हणतात, त्याचे कारण तसला नग पैठणच्याच पेठेत बनतो म्हणून.'

सम्राट अशोकाच्या निधनानंतर थोड्याच कालात महाराष्ट्रात सातवाहन नावाचे एक राजकुल उदयाला आले आणि त्याने महाराष्ट्रात विस्तृत अन् बलाढ्य असे साम्राज्य निर्माण केले. त्याच्या या साम्राज्याची राजधानी पैठण हीच होती. 'पइठ्ठाणे नगरे सालिवाहणोराया' असे सातवाहनांचे गौरवोल्लेख जैन वाङ्मयात सापडतात. सातवाहनांचा राज्यकाल ख्रिस्तपूर्व चारशे अन् ख्रिस्तोत्तर चारशे असा आठशे वर्षांचा आहे.

सातवाहनांच्या कारकीर्दीत पैठणचा सर्व अंगांनी उत्कर्ष झाला. भाषांची अभिवृद्धीही झाली. बृहत्कथेचा कर्ता गुणाढ्य हा सातवाहनांचाच आश्रित होता. गुणाढ्याचे पैठणातले वास्तव्य हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातला महत्त्वाचा काळ समजला जातो. पैशाची, महाराष्ट्री, वगैरे प्राकृत भाषांना गुणाढ्याने राजाश्रय मिळवून दिला. सातवाहनांना आंध्र असे दुसरे नाव होते. आंध्रानंतर चालुक्य आले, राष्ट्रकूट आले. पण त्यांनी आपल्या राजधान्या पैठणहून दुसरीकडे नेल्या आणि त्यामुळे आंध्रोत्तर काळात पैठणचे महात्म्य कमी कमी होऊ लागले. आजमितीस ते औरंगाबाद जिल्ह्यातले एक तालुक्याचे ठिकाण होऊन राहिले आहे. चौदाव्या शतकात राजशेखराने पैठण पाहून जे उद्गार काढले, ते आजही खरे आहेत.

**‘ अधुना तु दक्षिणदेशस्थितं प्रतिष्ठानपुरं क्षुल्लकग्रामतुल्यं वर्तते । ’**

शालिवाहन हा सातवाहनकुळातला शककर्ता राजा संकल्पात त्याचा उल्लेख होतो. आज आपल्या स्वतंत्र भारताने त्याचाच शक स्वीकारला आहे. पैठणला त्याचा टोलेजंग वाडा होता. आज मात्र तो राजवाडा राहिला नाही. मुसलमानांनी त्याचे मशिदीत रूपांतर केले आहे. निजामाच्या राज्यात असे न होते तरच नवल ! पोलिसकारवाईच्या पूर्वी या वाड्याच्या आवारात प्रवेश करणे हे एक दिव्यच होते असे मला कळले.

केवढे प्रशस्त आवार आहे त्याचे ! त्या पटांगणात एक कबर आहे आणि दोन बाजू बांधलेल्या आहेत. बाजूला उन्हा-पावसात झिजलेले, तुटलेले काही दगडी खांब आहेत. त्यावरची कोरीव कुसर पाहिली, की वाड्याच्या प्राचीनत्वाची कल्पना येते. आत एक विहिर आहे, तिला शालिवाहनाची विहीर म्हणतात. वाटोळ्या, लहान तोंडाच्या त्या विहिरीत तळापर्यंत नजर बुडवली म्हणून तो भूतकाळ हाताला लागणार आहे थोडाच ! ऐकायला मिळाली ती एक दंतकथा —

कुठूनतरी एक ब्राह्मणकन्या पैठणच्या एका कुंभाराकडे येऊन राहिली. त्याने तिचा प्रतिपाळ केला. तिथे शेष नावाच्या नागाचे तिच्यावर मन जडले. त्याच्यापासून तिला जो पुत्र झाला, त्याचे नाव शालिवाहन. तोही त्याच कुंभाराच्या घरी वाढला. कुंभार गाडगी मडकी घडवू लागला, की शालिवाहन त्याच गाऱ्यातली थोडी माती घेऊन तिचे हत्ती, घोडे अन् शिपाई बनवी. त्या मातीच्या चित्रांनी त्याने घरदार भरून टाकले. जणू भवितव्यतेनेच त्याला हा चाळा लावला होता.

अनेक सवंगडी जमवून तो जळीस्थळी खेळे. त्याच्याच कालात तिकडे नर्मदेच्या पलीकडे विक्रमाने आपला शक (संवत) सुरू केला होता. भरतखंडभर तो चालू व्हावा अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती. पण एका ज्योतिषाने त्याला सांगितले—

“ तुझा एक प्रतिस्पर्धी वाढतो आहे. तो दक्षिणेत आपला शक चालू करील. तू एका हत्तीच्या मस्तकावर सुवर्णपत्रिका बसवून तो हत्ती सोड. ‘ या हत्तीचे वजन करून द्या, नाहीतर युद्धाला सिद्ध व्हा ’ अशी राज्याराज्यातून द्वाही फिरव. जो हत्तीला तुळील तो तुझा प्रतिस्पर्धी समज. ”

विक्रमादित्याने तसे केले. हत्ती संरक्षणदलासह पैठणपर्यंत आला. मार्गातली राज्ये विक्रमादित्याच्या मालकीची झाली. तोवर हत्तीचे वजन करणारा कोणी महाभाग त्याला भेटला नाही. शालिवाहनाने मात्र ते आव्हान स्वीकारले. त्याने हत्तीला एका नावेत चढवले. नाव जिथवर पाण्यात बुडली, तिथे एक रेघ ओढली. मग हत्तीला उतरवून त्या रेघेपर्यंत बुडेल, इतकी वाळू त्या नावेत भरली. वाळूचे वजन ते हत्तीचे असे जाहीर केले.

सर्वांना शालिवाहनाच्या कल्पकतेचे नवल वाटले. विक्रमादित्याने त्याच्याशी युद्ध पुकारले. शालिवाहनाने कशाच्या बळावर त्याला तोंड द्यायचे ! पण शेष नागाने त्याला आयत्या वेळी अमृत आणून दिले. ते त्याने मातीच्या हत्ती-घोड्यांवर अन् शिपायांवर शिंपले. ते सगळे जिवंत झाले, प्राणवान् झाले, शालिवाहनाने तो दळभार विक्रमावर लोटला. त्याला रेटीत रेटीत नर्मदेच्या पलीकडे पोचते केले. विजय मिळवला अन् लगेच आपला शकही जाहीर केला. हा शालिवाहन म्हणजे पुलुमायी आंध्र अन् विक्रमादित्य म्हणजे जयदामन शक असावा, असा इतिहासतज्ज्ञांचा तर्क आहे.

आम्ही ग्रामरचना पाहात पाहात दक्षिणेकडे चाललो होतो. वाटेत शिवदीन-केसरीचा मठ लागला. मठ म्हणजे तो मोठा वाडाच आहे. काही पायऱ्या चढून आम्ही वर गेलो. अंधाराने आमचे स्वागत केले. धुळीने आम्हाला पाय-घड्या घातल्या. मठाच्या देवघरातही सगळा ‘ उत्साह ’च दिसला. एखादी जीर्ण वास्तू पाहायची या भावनेने मी तिथे गेलो असतो, तर ही सगळी लक्षणे ठीक होती. पण मी गेलो होतो मठ पाहायला. मठात आरास नको; पण स्वच्छ झाडलोट तरी ?

हा मठ ‘ दीना ’चा असला तरी तो दीन-अनाथ नाही. त्याला जहागीर आहे अन पैठणात मोठा मानही आहे. एकनाथमहाराजांची पालखी निघाली, की शिवदीनाचा झेंडा आघाडीवर असतो.

शिव दीननाथ हे अठराव्या शतकातील महंत आणि ग्रंथकार. ‘ दीन ’ ही एका मुसलमान साधूने त्याला दिलेली पदवी आहे. उजव्या हातांच्या दालनात त्याची पर्यंकारूढ तसबीर आहे. राजविलासी पोशाखातली अन् नीलकमला-सारख्या डोळ्यांची ती आकृती पाहिली, की हा कोणीतरी राजयोगी असावा, हे कळून येते.

असाच इथला दुसरा मठ कृष्णदयार्णव स्वामींचा. तो गोदावरीच्या काठी वृक्षांच्या छायेत आहे. या माध्यंदिन यजुर्वेदी ब्राह्मणाचे मूळ नाव नरहरी. पण भिक्षा मागताना तो 'कृष्णदयार्णव समर्थ' असा पुकार करी; म्हणून लोकांनी तेच त्याचे नाव रूढ केले. पुढे त्याच्या अंगी कोड उजळले. नाथांच्या सेवेने ते बरे होईल या उद्देशाने तो पैठणला आला. नाथांनी त्याला स्वप्न दृष्टान्त दिला. 'मी भागवताच्या एकादश स्कंधावर टीका केली तशी तू दशमावर कर. त्या निमित्ताने कृष्णचरित्र गा. तुझा रोग दूर होईल. हाच नव्हे; तर भवरोगसुद्धा!'

कृष्णदयार्णवाने हा आदेश मस्तकी धरला. ओवी छंदात ग्रंथरचनेला प्रारंभ केला. भावभक्तीच्या अमृतरसात न्हाऊन त्याची प्रतिभा भगवत्पूजेसाठी नित्य नवी कल्पनारत्ने आणि शब्दसुमने वेचून आणू लागली. 'हरिवरदा' ग्रंथ अध्याया अध्यायाने वाढू लागला. ग्रंथरचनेच्या आनंदात निर्भर, निमग्न असता अंगावरचे कुष्ठ केव्हा मावळले, त्याचा त्याला पत्ताही लागला नाही. वाग्देवतेने महारोगातून मुक्त केल्याचे हे अठराव्या शतकातले दुसरे उदाहरण. पहिले उदाहरण सातव्या शतकातल्या मयूर कवीचे आहे.

मयूर हा बाणभट्टाचा समकालीन आणि त्याचा मेव्हणा होता. एके दिवशी सुप्रभाती तो बाणाच्या घरी जातो; तर त्याची भार्या संतापली आहे अन् हे 'कादंबरी'कार कविश्रेष्ठ करुण शब्दांनी तिची मनधरणी करीत आहेत. आतल्या दालनात हा सांत्वनविधी चालला होता आणि मयूर बाहेर उभा राहून ते सारे ऐकत होता. गद्याने तिचा क्रोध शमेना, म्हणून शेवटी बाणाने ललितमधुर पद्याचा आश्रय घेतला. 'तू सर्वांगी कोमल आहेस. मृदु मवाळ आहेस' असे सांगताना श्लोकाचे तीन चरण खर्ची पडले. चौथा चरण रचायच्या आत त्याचा कंठ एकदम दाटून आला. पुढे शब्द फुटेना अन् श्लोक पुरा होईना. मयूर कवीला वाटले, की आता आपण आत प्रवेश करावा. 'कुचप्रत्यासत्या हृदयमपि ते चंडि कठिनम्।' (घट्ट टणक स्तनांच्या संगतीत असल्यामुळे हे चंडि, तुझे कुसुमकोमल हृदयमात्र कठोर झाले आहे.) असा तो श्लोकाचा चौथा चरण पुरा करीतच मयूर आत घुसला.

आपल्या एकांतात हा प्राणी अचानक उपटलेला पाहून त्या चंडीला अधिकच क्रोध आला. तिला वाक्सिद्धी होती. तिच्या बळावर तिने मयूराला तडक शाप

दिला. 'तुझ्या अंगी महारोग जडेल!' मयूराला तो लागलीच बाधला. आता हा ओढवून घेतलेला महारोग कसा दूर व्हायचा याचा विचार मयूर करू लागला. तो सूर्योपासक होता आणि म्हणून त्याने सूर्यदेवालाच शरण जायचे ठरवले. तो लगेच सूर्याचे स्तोत्र करायला बसला आणि शंभर श्लोकांचे 'सूर्यशतक' त्याने जन्माला घातले आणि काय आश्चर्य! त्या स्तोत्राने मयूर रोगमुक्त झाला.

कृष्ण दयार्णवाच्या कुष्ठरोगावरून ही गोष्ट आठवली. त्या ग्रंथरचनेने तो तर रोगमुक्त झालाच; शिवाय मराठी रसिकतेला एक अमृतरसायन मिळाले. असा हा दुहेरी फायदा झाला आहे. हरिवरदा हा ग्रंथ आजमितीस छापील स्वरूपात कोणालाही उपलब्ध आहे. पण खुद्द कवीच्या हातची हस्तलिखित प्रत पाहताना जो आनंद मिळतो, काही आगळाच. कारण त्या लिखित ग्रंथाच्या रूपाने आपण जणू त्या गतकालीन कवीलाच हस्तस्पर्श करतो. त्याचे स्वत्व आपल्या हृदयात संक्रांत करून घेतो.

मी हलक्या हाताने त्या पोथीचे वेष्टन सोडले आणि वरची फळी उलटून ठेवली. आता वाचू तरी किती अन् काय? थोडा वेळ घोटाळलो आणि प्राचीन पंडितांच्या शलाकापरीक्षेचा अवलंब केला. दोन्ही हातांनी उचलता आली तेवढी पाने एकदम उचलली. उघडलेल्या पृष्ठावर दृष्टी टाकतो, तो तिथे यशोदेचे घुसळण मांडलेले. त्या प्रसंगावर कवीचे प्रसन्न, सुढाळ वर्णन चाललेले—

जिचे कटिभार रम्य पृथुळ।
वरी अमोल्य परिधान पट्टकुळ।
सूत्रबद्ध कांची सोज्वळ।
रत्न झळाळ जडिताचे ॥
पदर खोविला परवंटीं।
कंचुकी बिरडा सुटली गाठी।
कृष्णस्नेह दाटला पोटी।
तेणे दृष्टी उन्मीळित ॥
दोन्ही हस्ती करिता मंथन।
तेणें सर्वांग कंपायमान।
पुत्रस्नेहे द्रवले मन।
दुग्धे स्तन पाझरती ॥

हरिवरदेवरून दुसऱ्या दोन ग्रंथांचे स्मरण झाले. पहिला एकनाथांनी संशोधिलेली ज्ञानेश्वरी आणि दुसरा नाथांच्या हातचे भागवत. हे दोन्ही हस्तलिखित ग्रंथ पैठणात अन् विशेषतः नाथांच्या वाड्यात मिळायला हवे होते. पण महाराष्ट्राचे भाग्य या बाबतीत उणे पडले आहे. कोणी त्याबद्दल विचारले, की नाथांच्या वंशजांना मौन धरावे लागते. त्यांचे ' जुने ठेवणे ' त्यांनाच आजमितीस अगम्य आहे. औरंगाबादला नाथवाङमय संशोधनमंडळ स्थापन झाले आहे. त्यांना जर या दोन प्रतींचा शोध करता आला; तर ती फार मोठ्या भाग्याची गोष्ट ठरणार आहे.

कृष्णदयार्णवांचा निरोप घेऊन पुढे गेल्यावर नरहरिबुवांनी आम्हाला बक्षी, लद्दू अन् वानोळे या इतिहासकालीन मातबर सावकारांचे वाडे दाखवले. त्यांतले काही पडले आहेत, काही त्या मार्गावर आहे. लक्ष्मी तर गेलीच; पण काहींचा निर्वंशही झाला आहे. पेशवाईच्या काळातले हे कनकनारायण ! राघोबादादाचा तळ इथे पडला आणि तो निष्कांचन झाला त्या वेळी इथल्या वानोळ्यांनी रोजी सव्वालक्ष रुपये या हिशेबाने महिनाभर त्याच्या सैन्याचा खर्च चालवला. त्यांच्या घरीदारी रुपयांची पोत्यावर पोती रचलेली असत, बायाबापड्या जाता येता त्या पोत्यांना आदळत आणि म्हणत, ' काय मेल्याची ही संपत्ती – !'

बक्षी सावकाराचीही अशीच गोष्ट. पेशवे स्वारीत असताना पैठणास येऊन गोदातीरी उतरले होते. बक्षीने त्यांना भोजनाचे निमंत्रण दिले. निमंत्रण स्वीकारण्यापूर्वी नाना फडणिसांनी बक्षीला अट घातली, की ' रुपयांवरून चालवीत नेलेस तर श्रीमंत तुझ्या घरी पायधूळ झाडतील. ' बक्षीने तसे तर केलेच; शिवाय रुपयांच्या राशीवर बसवून त्यांची पूजाही केली. नंतर तो सगळा द्रव्याचा डोंगर त्याने श्रीमंतांच्या सेवेला वाहिला, हे सांगणे नकोच. पेशव्यांचे या सत्काराला दिलेले उत्तरही त्यांच्या दौलतदार हृदयाला साजेसेच होते. ' गोदावरीचा नागघाट नादुरुस्त झाला आहे. या द्रव्याने त्याचा जीर्णोद्धार करा ! '

या घाटावर एका अंगाला जीर्णोद्धाराचा शिलालेख आहे आणि दुसऱ्या अंगाला एका बुरूजावर ज्ञानेश्वरांनी ज्याच्या मुखाने वेद वदवले, त्या रेड्याची लहानशी कोरीव प्रतिमा आहे. घाट अरुंद पायऱ्यांचा आणि खूप उतरता

बांधलेला आहे. नदीचे पाणी त्याच्या अंगावरून खळाळत जाते आणि खालच्या अंगाला वळसा घेते. आम्ही तिथल्या नागप्रतिमेजवळ थोडा वेळ बसलो. मनात उत्साह होता; पण वातावरण कोंदले होते. सूर्याचा प्रवास आता वावभर उरला होता; पण ढगांचे निळे हत्ती तो त्याला सुखाने पुरा करू देणार नव्हते. ते उडतही नव्हते अन् पडतही नव्हते. उगाच तिथल्या तिथे एकमेकांना ढुसण्या देत राहिले होते. पश्चिमेचे क्षितिज कुठे तरी लांब लांब गेले होते. समोरच्या वाळवंटात कोणी दिसत नव्हते. घाटावर कोण्या जानपद रमणीची घागर भरत नव्हती. उड्या मारायला चांगली जागा असूनही मुलांचा तिथे पायरव नव्हता. आम्ही तीन माणसे जणू शून्यारण्यात सापडलो होतो. गोदामैय्याचे सान्निध्य होते; पण संध्या अन् मेघ यांच्या संमिश्र छायेने गोदावरीही दुर्मुखल्यासारखी झाली होती. अशा स्थितीत पाठीमागची रुक्ष, खडकाळ ' पालथी नगरी ' किती उल्हासित दिसत असेल, याची कोणीही कल्पना करावी.

पालथी नगरी म्हणजे ' दे माय धरणी ठाय ' म्हणून धरित्रीच्या पोटात सीतेप्रमाणे गडप झालेले शालिवाहनकालीन पैठण. हैद्राबादच्या पुराणवस्तू संशोधन खात्याने काही वर्षांपूर्वी त्याचे उत्खनन केले. त्यात सापडलेल्या काही मूर्ती आणि फुटकी तुटकी मातीची भांडी जवळच्याच एका वाड्यात ठेवलेली आहेत. मौल्यवान चिजा हैद्राबादच्या वस्तुसंग्रहालयात जाऊन बसल्या आहेत. तिथले ते चर अन् खड्डे तोंडे उघडून प्रेक्षकांना खायला आल्यागत वाटतात. जे नेता आले ते संशोधकांनी उचलले. पण घरांचे पाये, सांडपाणी बाहेर घालवण्यासाठी विटांनी बांधून काढलेले नाले आणि पाणी जमिनीत मुरवण्यासाठी खोल खणलेल्या विहिरी या गोष्टी स्थावर असल्यामुळे जाग्यावर राहिल्या. आपल्या पूर्वजांचे वास्तुशास्त्र कुठवर प्रगत झाले होते, त्याचे वस्तुपाठ आजच्या स्थपतींना तिथे मिळू शकतील.

कऱ्हाड येथील उत्खननात आणि नासिकच्या टेकड्यांवरही अशाच विहिरी गाढळल्या आहेत. नदीकाठच्या उंचवट्यावर वसलेल्या शहरांची उभारणी त्याकाळी एका विशिष्ट पद्धतीने होत असे, याची त्यावरून कल्पना येते. पैठणच्या आसपास उत्खननायोग्य अशी आणखीही काही टेकाडे आहेत. ती खोदली तर सातवाहनकालीन इतिहासावर अधिक प्रकाश पडेल असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे.

हे सगळे भोवतालचे आम्ही पाहून घेतले. पाहणे झाले. आता 'दर्शन' उरले होते 'आतले नाथ' अन् 'बाहेरचे नाथ' या दोन्ही स्थळांचे. दुसऱ्या दिवशी एकादशी होती आणि आम्हाला एक मोठा लाभ घडणार होता. आतल्या नाथांच्या मंदिरात म्हणजे नाथांच्या राहत्या वाड्यातल्या देवघरात अनेक मूर्ती आहेत. त्यात सर्वोपरी विराजित अशी मूर्ती म्हणजे नाथांच्या पूजेतला बाळकृष्ण. रोज त्याला जिथल्या तिथे गंधादि पंचोपचार होतात. पण एकादशीला मात्र मूर्ती खाली काढून तिची अभिषेकपूर्वक पूजा केली जाते.



नाथांच्या पूजेतील बाळकृष्ण

ही वेळ साधून मी सोवळ्याने गाभाऱ्यात प्रविष्ट झालो. माझ्या आधी दोघे पुजारी आत जाऊन संकल्प म्हणू लागले होते. अवती भवती पंचामृते, मिठाई आणि फळे, यांचा नैवेद्य डोळ्यांत भरत होता. बाळकृष्ण 'भिगाचे भिगुळे खांद्यावर आंगुले' वगैरे पोशाख काढून मांगलिक स्नानाला सिद्ध झाला होता.

वीतभर उंचीच्या त्या पंचरसी धातुमूर्तीवर मी दृष्टी स्थिर केली. 'दास, जेऊ घाला वा न घाला' अशी अक्षरे उमटलेल्या विटेवर तो बाळकृष्ण उभा होता. उजवा हात लोणीसाखर चाटून कटीवर उताणा ठेवलेला. डाव्या हाती दक्षिणावर्त शंख. पायात साखळ्यावाळे. हातात कडीतोडे. तुंदिल उदर. पाठी-वर शिदोरी. काखेत कामधेनू म्हणजे झोळी. डाव्या खांद्यावर श्रीखंड्याच्या रूपाने बारा वर्षे कावड वाहिली तिचा पट्टा. गळा रत्नहार. कपाळी रत्नटिळा. मस्तकी शिवलिंगाच्या आकाराचा मुकुट. मुकुटाला खालची रांग रत्नांची.

ते बाळध्यान माझ्या चित्तात ठसले. मला वाटले, आत्ता हा मुरलीमोहन

गोधने चारण्यासाठी वृंदावनाकडे निघेल. यशोदेचे मातृहृदय व्याकुळेल. आपले तान्हे नाजूक सुकुमार आणि वन तर काटयाकुटयानी भरलेले. ती कळवळयाने त्याच्या सवंगडयांना म्हणेल–

जवळीच खेळा नका जाऊ दुरी ।
सांभाळा मुरारी प्राण माझा ।।

ही श्रीमूर्ती उज्जयिनीच्या एका सावकाराने आपल्या उपासनेसाठी घडवली होती. तो तिची आपल्या घरी स्थापना करणार होता. पण त्याला रात्री स्वप्नदृष्टान्त झाला, की 'मला पैठणला नाथांच्या घरी पोचव.' देवाची आज्ञा खरी; पण त्याने ती कशी मानावी ! मग त्याच्या उपासनेचे काय ? त्याने आइक नाइक केले आणि स्थापनेची तयारी सुरू केली. पुन्हा दुसऱ्या रात्री स्वप्नदृष्टान्त. आणि तोही कठोर शब्दात. 'माझी इच्छा अवमानू नको. तुझे भले होणार नाही.'

सावकार घाबरला आणि तसाच्या तसा देवाला घेऊन पैठणला आला. मनाजोगता देव आवडीची धणी पुरवायला घरी चालून आलेला पाहून नाथांना परमानंद झाला. नाथांनी ती मूर्ती समारंभपूर्वक देवघरात ठेवली. मी विचार करू लागलो, की या देवाला पुजून नाथ धन्य झाले, का नाथांसारख्या परम भागवताच्या हस्ते पूजा घेऊन देवच धन्य झाला ? पण मी हा विकल्प काय म्हणून करावा ? देवच निजमुखाने बोलतो आहे ना–

विचारिता आतुवट अर्थ । मी आणि भक्त एकचि ।।

नाथांचा जुना वाडा हेच आता मंदिर झाले आहे. देवघर हेच गाभारा बनले आहे. त्याचा जीर्णोद्धार झालेला असला तरी महाद्वार आणि भिंती नाथांच्या वेळच्याच आहेत. तो नाथद्वारींचा रांजणसुद्धा. रांजण म्हणजे तांब्या लोखंडाचा नव्हे; तर भूमिगत हौद. तिकडे त्यालाच रांजण म्हणतात. तिथल्या प्रत्येक जुन्या वाडयात पाण्याच्या साठवणीसाठी असा रांजण असतो. नाथांच्या घरचा जरा अधिक खोल आहे. कारण त्यांच्या घरी येवाजावा फार होता. त्यामुळे पाणी मुबलक लागायचे. तोंडावर लाकडी फळ्या टाकून तो नेहमी बंद ठेवलेला असतो. कोणी पाहायची इच्छा दर्शवली, तर फळ्या बाजूला करतात अन् पाणीही काढून देतात.

जीर्णोद्धाराच्या वेळी सगळे खांब निराळे घातले असले तरी गाभाऱ्यापुढचे दोन खांब मात्र मूळचेच ठेवले आहेत. त्यांना सांप्रदायिक महत्त्व आहे. देवासम्मुख उभे राहिल्यावर उजव्या हाताच्या खांबात श्रीखंड्या गुप्त झाला आहे. डावा खांब ही नाथांची पुराण सांगायला बसण्याची जागा. त्यांचे व्यासपीठ खांबाला टेकून असायचे. समोर भक्तभाविकांचा अन् बाळयाभोळयांचा समाज कर्णेंद्रियात पंचप्राण गोळा करून श्रवणाला बसायचा. नाथ त्यांना शुद्ध, स्नेहाळ, रसभावफुली फुललेल्या वाणीने भागवतधर्म विशद करून सांगायचे. त्यांना आत्मकल्याणाचा मार्ग उजळून दाखवायचे –

" माझे हरीचे जन हो ! जन्मा आलियांचे फळ मिळवायचे आहे ना ? मग भागवतधर्म आचरा. तोच एक सर्वसुलभ तरणोपाय आहे. भवरोग दूर करण्यासाठी अरण्यात जायला नको. इंद्रिये कोंडायला नकोत. बायकापोरे सोडायला नकोत. संसार सुखेनैव करा; पण तो श्रीहरीचा म्हणून करा. सकल इंद्रियांना हरिसेवेची गोडी लावा. त्याचे प्रेम धरलेत, सकळ कर्मे त्याला अर्पण केलीत, मन-बुद्धींना तोच छंद लावलात, की श्रीहरी तुमच्या अंतरात प्रकटेल. मागेपुढे उभा राहून तो तुम्हाला सांभाळील. सुदर्शनचक्राने तुमच्या अहंकाराचा चेंदा करील. गदेने मोह-ममता छेदील. शंखाने निजबोध जागृत करील- आणि अशा रीतीने तुम्ही भक्तिज्ञानांनी निर्वाळलात की आपल्या हातातले कमळ तुमच्या मस्तकी वाहून तोच तुम्हाला पूजील. भागवतधर्माचे मुख्य सूत्र मी तुम्हाला सांगतो –

**जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवंत ।**

सर्व प्राणिमात्रात देव पाहणे आणि त्याच्या सेवेची आवडी धरणे, हीच खरी भक्ती. कोणी उच्च नाही, कोणी नीच नाही. सर्वत्र जनीजनार्दन भरून उरला आहे. त्याची प्रचीती घेतली पाहिजे. त्याच्याशी अनन्य झाले पाहिजे.

जनता हाच जनार्दन आणि जनसेवा हीच ईश्वरभक्ती असे नाथांनी निःसंदिग्धपणे प्रतिपादिले. नाथांची ही नवी दृष्टी होती. नाथांनी गुरू आणि ईश्वर हे एक केले आणि जनतेच्या विराट् स्वरूपात त्यांचा साक्षात्कार घेतला. त्यांची भक्ती सेवावृत्तीने रंगलेली आहे. नाथ हे ज्ञानेश्वरीचे संशोधक तसेच भाष्यकार. ज्ञानेश्वर जे सूत्ररूपाने सांगतात, तेच नाथ ' रसिकमुद्रे 'ने विशद करतात.

नाथांचा वाङ्मयसंसार अफाट आहे. त्याला समुद्र म्हणायचे, तर क्षीरसागर म्हणावे लागेल. त्यात शेषशायी भगवान् निद्रित नव्हे; तर जागृत आहे. त्यांनी महान् ग्रंथ रचले आणि ते कर्तृत्वाच्या अभिमानासह जनार्दनचरणी अर्पण केले. ते स्वतः निर्लेप, मोकळे. त्यांच्या कोणत्याही ग्रंथात अद्वैताची बैसका कुठेही सुटलेली नाही. द्वैताची सावलीसुद्धा त्यांना खपत नाही. भागवताच्या टीकेला त्यांनी ' एकाकार टीका ' असेच नाव दिले. भावार्थरामायणात राम हा पूर्ण ब्रह्म आणि सीता ही चिच्छक्ती असे भावून त्यांनी सगळे अध्यात्म खेळवले. कृष्ण-रुक्मिणीचे लग्न हे जिवाशिवाचे सामरस्य म्हणून त्यांनी वर्णिले.

एकनाथांच्या थोरवीचे रहस्य त्यांच्या ग्रंथसंपत्तीत तर आहेच; शिवाय ज्या परिस्थितीत भागवतधर्माचा प्रसार करून महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनाची विस्कटलेली घडी पुनश्च ठीक करण्याचा त्यांनी प्रयत्न केला, त्यातही आहे. त्यांच्या कार्याचे परिस्थिती निरपेक्ष मूल्यमापन करणे हे एकांगी ठरेल. ज्ञानेश्वरांच्या नंतर महाराष्ट्रावर संकटांची परंपराच कोसळत गेली. स्वराज्याचा अस्त झाल्यामुळे आणि विधर्मीयांच्या अत्याचारी, विध्वंसक शासनामुळे सगळा समाजच अस्ताव्यस्त होऊन गेला. त्याला कसलेच स्वत्व अन् सत्त्व उरले नाही. धर्म उत्सन्न होण्याच्या मार्गाला लागला. अशा सर्वस्वी विषम परिस्थितीत नाथांनी हिंदुधर्माचा ध्वज फडकत ठेवण्याचे महनीय कार्य केले.

नाथांनी आपला परमार्थ ग्रंथातच ठेवला नाही, तर तो आचरणाच्या क्षेत्रात आणला. ' अंत्यजतोक ' कडेवर घेऊन, श्राद्धान्न महारांना वाढून, निंदकांना आत्मारामाचे गडी समजून, चोरांवरही प्रेमाची पाखर घालून, त्यांनी अभेद आचरून दाखवला. त्यांची धर्मपत्नी गिरिजाबाई हिने नाथांच्या संसारात आणि परमार्थातही त्यांना अंगे प्राणे साथ दिली. तिच्या जीवनाचा सौरभ नाथांच्या चरित्रात सर्वत्र भरून राहिला आहे. भागवतधर्माच्या परंपरेत एकनाथ हिमाचलासारखे भव्योत्तुंग वाटतात. ज्ञानदेवांनी रचलेल्या पायावर त्यांनी सुंदर आणि कलाकुसरीचे वाङ्मयमंदिर उभारले.

आज तीन-साडेतीनशे वर्षे पैठणची नाथषष्ठी गाजते, ती याचसाठी. नाथषष्ठी म्हणजे फाल्गुन वद्य षष्ठी. पाच पर्वे या तिथीत एकत्र झाली आहेत.

जनार्दनस्वामी हे नाथांचे गुरू. त्यांच्या जन्माची अन् निर्याणाची तिथी हीच. जनार्दनांना दत्ताचा आणि नाथांना जनार्दनांचा अनुग्रह झाला तोही याच तिथीला. आणि पाचवे पर्व म्हणजे नाथांचे निर्याण. शके १५२१ या वर्षी नाथांनीही याच तिथीवर आपला देह विसर्जिला. षष्ठीचा हा उत्सव नाथांनी गुरूची पुण्यतिथी म्हणून सुरू केला होता. तोच पुढे नाथांची पुण्यतिथी म्हणून त्यांच्या वंशजांनी आणि वारकऱ्यांनी रूढ केला. गोदेचे विस्तीर्ण वाळवंट पुरू नये, अशी अलोट यात्रा दर वर्षी या तिथीला इथे जमते.

या उत्सवाचा सांगोपांग कार्यक्रम श्री. नरहरीबुवांनी आम्हाला सांगितला. फाल्गुन वद्य द्वितीया ते अष्टमी एवढा उत्सवकाल असतो. द्वितीयेला रांजण उघडा करून त्याची पूजा होते. 'श्रीखंड्या' म्हणून कोण्या तरी पाणक्याची पूजा करतात. केशवस्वामीकृत नाथचरित्राचा पाठ सुरू होतो. गोदेच्या घागरी आणून लोक रांजण भरू लागतात. पंचमीला देवाची अक्षत निघते. षष्ठीच्या दिवशी मध्यान्ही वाळवंटातून दिंडी निघून मागच्या दाराने बाहेरच्या नाथ-मंदिरात येते. मग निरूपण होते. ज्या अभंगावर नाथ स्वतः निरूपण करीत असत, तोच अभंग निरूपणाला घ्यायचा हे ठरलेले आहे. अभंग असा –

**अवघेचि त्रैलोक्य आनंदचि आता**
**चरणी जगन्नाथा चित्त ठेले ॥**
**माये जगन्नाथ बाप जगन्नाथ**
**अनाथाचा नाथ जनार्दन ॥**
**एका जनार्दनी एकपणे उभा**
**चैतन्याची शोभा शोभतसे ॥**


नंतर वाड्यात ब्राह्मणांची महापूजा होऊन लाह्यांचा कुटा आणि मीठ यांचा महाप्रसाद होतो. सप्तमीच्या रात्री छबिना निघतो. अष्टमीस सूर्यास्ताला बाहेरच्या नाथांपुढे गोपाळकाला होतो. रात्री दिंडी, कृष्णकमलातीर्थावर राहते आणि तिथे सेवेसाठी आलेल्या हरिदास-पुराणिकांची हजेरी लागते. एवढे सगळे झाल्यावर उत्सव समाप्त होतो.

आम्ही संध्याकाळी बाहेरच्या नाथाला गेलो. ते समाधिमंदिर गावाच्या कडेला वाळवंटाला लागूनच आहे. वृक्षवेष्टित असल्यामुळे त्या बाजूला नजर

गेली तरी तिकडची ओढ लागते. मंदिर वैभवशाली नसले तरी प्रशस्त आहे, हवेशीर आहे. प्रदक्षिणेसाठी मोकळा मार्ग असून सभोवती ओवऱ्या आहेत, आत-बाहेर स्वच्छ आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात मूर्ती नसून पादुका आहेत. ‘ एका जनार्दन ’ एकीएकपणे त्या पादुकात अंतःप्रविष्ट आहेत. नाथांना स्तवनपूर्वक प्रणाम करायला माझी वाचा दुबळी म्हणून मी हळूच मोरोपंतांच्यावाणीत शिरलो –

नमिला शमिलास्यप्रद शांतिजलधि एकनाथ तो भावें।
शोभावें ज्याचें यश विश्वीं ज्या देववृंद लोभावें ।।

माझ्या मागेपुढें बरेच भक्तगण उभे होते. कपिला गायीचे धारोष्ण दूध सुवर्णपात्रातून पिण्याची इच्छा धरावी, तसे स्वभावशुद्ध गोदाजल गुरुपादुकांच्या प्रक्षालनातून आपल्या अंगावर शिंपडले जावे, ही आस धरून ते सारे भक्त तिथे आले होते आणि येत राहिले होते. पुजारी सुस्नात होऊन समईच्या प्रकाशात त्या पादुका धूत होता. ते पायवणी कमंडलूत धरून त्याने तिथूनच सर्व स्त्री-पुरुषांच्या मस्तकावर शिंपले. त्यातले काही तुषार माझ्याही भाग्याला आले. माझी काया एकदम मोहरून उठली. त्या क्षणापुरते तरी मन उन्मत्त झाले. नतमस्तक होऊन मी पुटपुटलो –



बाहेरचे नाथ

आप: पादावनेजनोद्विषंतं निर्दहंतु मे।

‘ चरणप्रक्षाळणाची ही जळे, माझ्या शत्रूला निःशेष जाळोत, ’ असा त्या

वैदिक मंत्राचा अर्थ आहे. हा शत्रू कोण? अहंकाराशिवाय दुसरा कोण असणार! एकनाथांनी तर तोच 'घुसळखांबा' पहिल्याप्रथम उपटून टाकला आहे. जोवर अहंकार, तोवर माणसे ही माणसेच दिसतील. त्यांचे गुण-दोष, विचार-विकार, सगळे प्रतीत होतील. अहंकार एकदा फिटला, की आपणासकट सगळा ईश्वरच ईश्वर! सगळाच जनीजनार्दन!

# ७. धन्य देहू गाव

श्रावणातली सकाळ आहे. पावसाने रिप् रिप् चालवली आहे. दिशा फाकण्याऐवजी घेरून आल्या आहेत. अंधार उजळायच्याऐवजी अधिकच काळवंडत आहे. ढगांनी डोक्यावर दाट मांडव घातला आहे. पुणे-मुंबई रस्त्यावर जागोजाग पाणी साचले आहे. कडेने जाणाऱ्या पादचाऱ्यांच्या गारठून गेलेल्या अंगावर निर्दयपणे पाण्याचे फवारे उडवीत एस. टी. ची बस धडधडत चालली आहे. आणि याच गाडीतून मी पुण्याहून वायव्येस तीस मैलांवर असलेल्या देहूला जायला निघालो आहे.

धरित्रीच्या कुशीतून आत्ताच डोके वर काढणाऱ्या शेतातल्या अंकुरांना पावसाची गरज होती. तेव्हा पावसाबद्दल तक्रार करण्यात अर्थं नव्हता. माझ्यापुढे प्रश्न होता तो एवढाच, की हा पाऊस मला देहूत मोकळ्या अंगाने फिरू देईल की नाही ? पण मनाने ग्वाही दिली. ‘ सकाळचा पाहुणा आहे, तेव्हा तो बहुधा दुपारला राहायचा नाही. ’ आणि झालेही तसेच. देहूरोड स्टेशनाजवळून आमची गाडी उजवीकडे वळली आणि पूर्वेला वावभर उंचीवर सूर्यनारायण ढगांच्या चक्रव्यूहातून बाहेर पडत म्हणाला, ‘ अयमहमस्मि ! ’

ताबडतोब आसपासच्या ढगांच्या कडा रुपेरी झाल्या. अक्षरशः सोन्यासारखे किरण हिरव्या धरित्रीवर पघळले. देहूच्या रस्त्यावरची डाव्या उजव्या अंगांना असलेली लष्करी अधिकाऱ्यांची घरे उजळून निघाली. त्यांच्या बागेतली विलायती फुले नाचून, डोलून आनंद व्यक्तवू लागली. क्षितिजाकडच्या गिरी-शिखरांवर नेटाने चढणाऱ्या भुरक्या ओलसर ढगात किरणांची सुवर्णछटा अशी काही बेमालूम मिसळली, की जणू एखाद्या सिद्ध योग्याची किमयाच ! मी म्हटले, ज्ञानेश्वरांचा ‘ सोनियाचा दिवस ’ आपल्याला कधीकाळी तरी लाभेल, की नाही देव जाणे ! पण हा अवचित लाभलेला सोन्याचा क्षण तरी हर्षोत्फुल्ल मनाने भोगून घ्यावा.

आज देहूचा परिसर हा एक लष्करी केंद्र बनला आहे. रण-साहित्याचे आगर बनला आहे. काटेरी तारांची दाट, दुर्गम कुंपणे, ठायी ठायी चौक्या पहारे, उंच उंच माचे, बंगले, डेरे राहुटचा, ध्वजस्तंभ, रानोमाळ पडलेल्या अगणित जीपगाडचा अन् लॉऱ्या, असंख्य खोकी, असा हा सगळा अवाढव्य पसारा. तीनशे वर्षांपूर्वी तुकोबा 'आवडीने भावे हरिनाम' घेत ज्या भूमीवरून संचार करीत होते, त्या भूमीचे आजचे स्वरूप हे असे गंभीर आणि बंदिस्त आहे. तुकोबाही युद्धाला अपरिचित नव्हते.

**रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग।**
**अंतर्बाह्य जग आणि मन ॥**

असे ते स्वमुखाने सांगतात.

पण त्यांचे युद्धसकेत वेगळे होते. पद्धती भिन्न होत्या. परिणामही निराळे होते. आतले जग म्हणजे कामक्रोधादि शत्रू, तसेच संकल्प-विकल्पात्मक मन आणि बाहेरचे जग म्हणजे त्यांच्या परमार्थमार्गात काटे पसरणारी आणि निंदा-स्तुतीचे घाव घालणारी माणसे. या दोघांच्याविरुद्ध त्यांना शस्त्रावाचून आणि उघडचा अंगाने लढायचे होते. तुकोबा लढले; रात्रंदिवस लढले. या युद्धात त्यांना विजय मिळाला आणि ते अद्वैताच्या सिंहासनावर पट्टाभिषिक्त झाले.

पुढचा रस्ता चिखलाचा असल्यामुळे आमची गाडी देहू गावापासून अर्धा मैल मागे माळवाडी येथे उभी राहिली. विषयपंक अंगावर उडू न देता तुकोबा जशी परमार्थाची वाट चालले, तसाच मीही तो चिखल चुकवीत चुकवीत गावाच्या शिवेवर आलो. ति` एक गृहस्थ भेटले. त्यांनी सांगितले, 'गावातून देवळाकडे जाणारा रस्ता निसरडा आहे. तुम्ही डाव्या हाताने इंद्रायणीच्या तीराने वर या.'

मी त्यांची सूचना स्वीकारून निघालो, तो पहिली भेट झाली ती मंबाजीबुवाची. नदीकाठीच इनामदारांच्या वाडचाच्या पिछाडीस त्याची बखळ आहे. मी म्हटले चला, 'दुर्जनं प्रथमं वंदे !'

आज तिथे शंकराचे लहानसे मंदिर आणि सभोवती शेत आहे.इथेच त्याकाळी मंबाजीबुवाने आपली मठी उभारली होती. देवतार्चन थाटले होते. जो तावडीत सापडेल, त्याला उपदेश द्यायला तो 'टिळा टोपी माळा' घालून तयार असे.

तो जणू सावजे पकडायला सापळा मांडूनच बसला होता. पण लोक देहूला येत ते मंबाजीच्या पाया पडायला नव्हे; तर तुकोबांच्या दर्शनाला. त्यांचे निववित चार शब्द ऐकायला. त्यांना आस असे ती तुकोबांच्या कृपाप्रसादाची. त्यामुळे आपले बद्द नाणे देहूच्या बाजारात चालत नाही, हे पाहून मंबाजी चडफडे, हात चोळी. तुकोबा आपल्या कीर्तनातून असल्या पिंडपोषक दांभिकांची यथेच्छ खरवड काढीत, ती त्याला जळत, तापत ऐकावी लागे.

**तुका म्हणे ऐसे मावेचे मर्यिद ।**
**त्यांपाशी गोविंद नाही नाही ॥**


अशा स्पष्टोक्तीने ते जनांना सावधानतेचा इषारा देत. ते कोणाचे नाव घेत नसत; पण ती टोपी नेमकी मंबाजीच्या डोक्याला बसे. ज्यांना सत्याचा आणि न्यायाचा आधार नाही, अशा दुर्जनांनी शेवटी क्रोधाचा आसरा घ्यावा हे ठरलेलेच. अशाच रागाच्या भरात त्याने एक दिवस तुकोबांच्या अंगावर हात टाकला आणि त्यांना बेदम मारले. तुकोबांच्या अंगावर वळ उठले खरे; पण त्यामुळे त्यांची आतली तितिक्षा तावून सुलाखून निघाली. ' बरवे संचित होते तैसे जाले रे ' म्हणून ते अनाक्रोश राहिले.

आम्ही गेलो त्या दिवशी इंद्रायणीला पूर नव्हता; पण पाणी मात्र गढूळ होते. तिला तारुण्य आले होते; पण त्याची मुसमूस नव्हती. ती तुकोबाचा कसलातरी सांगावा घेऊन लगबगीने आळंदीकडे निघाली होती. लहानशीच नदी अन् तिच्यावर लहानसाच घाट. त्यावरची न्हाती-धुती माणसेही परिमितच. मी खाली उतरून तिच्या जलाने मार्जन केले आणि घाटाला लागूनच असलेल्या विठ्ठल मंदिराच्या महाद्वारात दाखल झालो. देहूला विठ्ठलाचे दर्शन तेच तुकोबांचे दर्शन.

**भेद नाही सर्वात्मना । नारायणा तुजमज ।**

ही झाली पारमार्थिक धारणा. पण व्यावहारिक दृष्टीने पाहायचे तर देहूत तुकोबांचे मंदिर नाही. सदेह वैकुंठगमन केल्यामुळे कुठे समाधीचा चिराही नाही. पण भाविकांना या गोष्टीचे शल्य बोचत नाही. त्यांचा विरस होत नाही. ते विठ्ठलाच्या आकारातच तुकोबांना पाहतात. ही शिकवण त्यांना संतांच्या भागवतधर्माने दिली आहे. आणि ती त्यांच्या हाडीमासी भिनली आहे.

देवळाच्या प्राकारात समोरच गरुड-हनुमंत आहेत. तिथेच दोन दीपमाळा आहेत. त्यापुढे मंदिरापासून किंचित विलग; पण दुरून मंदिराचाच भाग वाटणारा गरुडमंडप आहे. तिथे अष्टौप्रहर वीणा उभा असतो. पुढे मंदिराचा सभामंडप आणि त्यापुढे गाभारा आहे. तिथे विठ्ठल-रखुमाई जोडीने उभी आहेत. देवळात अन् प्राकारात फरसबंदी आहे. सभोवती ओवऱ्या आहेत. हे प्राकार बांधणीचे काम महाळुंग येथील इंगळे पाटील आणि कल्याण शिवाजी या दोघा तुकाराम भक्तांनी केले आहे. शेजारीच एक राममंदिरही आहे.



तुकोबांच्या पूर्वजांचे विठ्ठल-मंदिर

या स्थळासंबंधी तुकोबांनीच रचलेला एक अभंग दिला, की त्यात सगळा क्षेत्राचा तपशील आला असे समजावे —

" धन्य देहू गाव पुण्यभूमी ठाव ।
तेथे नांदे देव पांडुरंग ।।
धन्य क्षेत्रवासी लोक ते दैवाचे ।
उच्चारिती वाचे नामघोष ।।
कर कटी उभा विश्वाचा जनिता ।
वामांगी ते माता रखुमादेवी ।।
गरुड दारी उभा जोडोनिया कर ।
अश्वत्थ समोर उत्तरामुख ।।
दक्षिणे शंकर लिंग हरेश्वर ।
शोभे गंगातीर इंद्रायणी ।।
लक्ष्मी-नारायण बल्लाळाचे बन ।
तेथे अधिष्ठान सिद्धेश्वर ।।
विघ्नराज दारी बहिरव बाहेरी ।
हनुमंत शेजारी सहित दोघे ।।

तेथे दास तुका करितो कीर्तन।
हृदयी चरण विठोबाचे ॥ "

तुकोबांचे आठवे पूर्वज विश्वंभरबावा यांनी हे विठ्ठलमंदिर प्रथम बांधले. यांचे आडनाव आंबिले आणि कुळी मोरे असल्याचे नासिक येथील क्षेत्रोपाध्यांच्या बाडात नमूद आहे. तुकोबांच्या घराण्याकडे देहू येथील महाजनकीचे अधिकार होते. बाजारपेठेत महाजनकीचा वाडा होता आणि देवाच्या पूजेअर्चेसाठी पुरातन इनाम चालत होते.

तुकोबांनी उदासीन वृत्तीमुळे या महाजनकीची उपेक्षा केली. पण त्यांचे धाकटे चिरंजीव नारायणबोवा यांनी शके १६०० मध्ये शिवाजीमहाराजांना सदर वृत्ती आपल्या घराण्याकडे यथापूर्व चालू ठेवावी म्हणून अर्ज केला आणि त्यावर महाराजांनी पुणे परगणाच्या देशाधिकाऱ्यास पुढीलप्रमाणे आज्ञा दिली, 'यांची महाजनकी मिरासी पहिलेपासून चालत आली, तेणेप्रमाणे चालविणे.'

विश्वंभरबावा – हरिबावा – विठोबा – पदाजी – शंकरबावा – कान्हया – बोल्होबावा – आणि तुकाराम अशी त्यांची वंशवेल आहे. विश्वंभरबावा हे विठ्ठलाचे भक्त आणि वारकरी. त्यांच्या प्रेमाला भुलून पंढरीनाथ देहूत आला. 'तू मजकडे येणे थांबव. मीच तुझ्या गावी येतो. जवळच्या आंबेवनात गेलास की तिथे तुला आम्हा उभयतांच्या पाषाणमूर्ती सापडतील. त्या तू घरात आणून पूजेला लाव.'

या दृष्टान्ताप्रमाणे विश्वंभरबावांना मूर्ती गवसल्या. द्वारकेचे केणे आपल्या बंदराला लागले, असे त्यांना वाटले. त्यांनी देवाची रीतसर प्रतिष्ठा करून पुढे मंदिरही उभारले. 'माझ्या वडिलांची मिरासी' म्हणून तुकोबांनी या देवाचे चरण दृढ धरले.

ज्यांनी तुकोबांच्या अभंगांचे मनन केले नाही, ते त्यांना एक साबडा भाबडा प्राणी असे समजतात. चित्रकार त्यांची बावळट मुद्रेची चित्रे रेखाटून वास्तवदर्शी कला दाखवल्याचे समाधान मानतात. पण लोकांची समजूतच भाबडेपणाची आहे, बिनबुडाची आहे. 'एथ चातुर्य शहाणें जाहलें' अशा अधिकाराचे तुकोबा होते. ते आपले वाणसवद्याचे दुकान उत्तम चालवीत. त्यांना जमाखर्चाची चोख माहिती होती. अनेक व्यापारी पेठांशी त्यांचा संबंध होता. त्या पेठांतून चालू असलेल्या गुजराती, हिंदी या भाषांचाही त्यांनी कामचलाऊ परिचय करून

घेतला होता. तत्कालीन हिंदीतून त्यांनी पद्यरचनाही केली आहे हे लक्षात ठेवायला हवे. मुख्य धंद्याशी संबद्ध असे अनेक गौण धंदे ते चालवीत होते. त्यावेळी निराळ्या अर्थाने 'पांडुरंग' हा त्यांचा देव होता. ते आपल्या व्यवसायात बाराचे सोळा करण्यात इतके गढून गेले होते, की सबंध दिवसात एका क्षणाचीही त्यांना उसंत मिळत नसे.

बाराव्या वर्षी त्यांच्या मस्तकावर पहिल्या मंगलाक्षता पडल्या. बोल्होबावांना सून मिळाली. पण थोड्याच दिवसांत त्यांना कळून आले, की घराला आणलेली पोरगी दमेकरीण आहे. ही मोठी होणार अन् आपल्या तुक्याला सुख देणार हे मिथ्या असे समजून त्यांनी तुकोबांना पुन्हा मुंडावळ्या बांधायला लावल्या आणि पुण्याच्या आप्पाजी गुळवे यांची मुलगी जिजाई ही पहिलीवर दुसरी आणली. तुकोबा भोळसट असते, तर त्यांच्या गळ्यात आपली मुलगी बांधायला वधूपिते राजी झाले नसते. त्यांच्या मुली त्यांना वर आल्या नव्हत्या.

देशावरून कोकणात मीठ विकायला नेणे आणि कोकणातून मिरच्या वरघाटी आणणे असला अचरटपणा तुकोबांच्यावर लादू पाहणाऱ्या शहाण्याला तुकोबा स्पष्ट सांगतात–' मी व्यवहारात पक्का होतो. अट्टल ठकाचीसुद्धा माझ्याकडे हिकमत चालली नाही. आपल्या काळजाचा ठाव दुसऱ्याला लागू न देणे ही कला तर मला स्वभावसिद्ध होती. ' असा टुमटुमीत चाललेला त्यांचा संसार कोसळला तो त्यांच्या नालायकीमुळे नव्हे; तर नियतीने फासा उलटा टाकल्यामुळे !

तुकोबांच्यावर एकामागून एक आपत्ती धावत येऊन कोसळल्या. प्रथम शिरावरचे आईबापांचे छत्र उडाले. बाळगोळीचा हा पहिला वळसा त्यांना चांगलाच झोंबला. पुढे दुष्काळाला कडेवर घेऊन अवर्षण आले. प्रथम द्रव्य गेले. नंतर मान गेला. जगण्यापुरते अन्न मिळण्याचीसुद्धा भ्रांत पडली. एक मुलगा खपला. पहिली बायको अन्नान्न करीत मेली. धंद्याचे दिवाळे वाजले. सर्व बाजूंनी पातेरा उडाला. जिजाईने कर्कशेचा वसा घेतला. कठीण विषम काळी तिने तुकोबांच्या मनाची जपणूक केली नाही. त्यांच्या आहाळलेल्या हृदयावर सहानुभवाची फुंकर घातली नाही. बाहेर अपमान; घरात अप्रतिष्ठा ! या दुधारी सुरीच्या प्रहाराने तुकोबा घायाळ झाले. ते अनुतापाने कढू लागले. त्यांना एकंदर

प्रपंचाचाच वीट आला. त्यांचे मनपाखरू फडफड करीत अधांतरी गिरगिरू लागले. संसाराची डहाळी मोडली; आता बसायला जागाच उरली नाही.

आणि याच वेळी तुकोबांना निर्वाणीचा पांडुरंग आठवला. त्यांनी त्याच्या पायी मिठी घातली. त्यांना वाटले, की हाच आता आपली तड लावील. त्यावेळी देहूतले विठ्ठलमंदिर मोडकळीस आले होते. विठ्ठलाकडे मन गुंतवण्याचे साधन म्हणून तुकोबांनी स्वहस्ते त्याचा जीर्णोद्धार करायचे ठरवले. आप्त-सुहृदांना त्यांचा हा उद्योग म्हणजे ' अव्यापारेषु व्यापार ' वाटला. पण त्यांनी कोणाकडे लक्ष न देता आपल्या घरच्या पांडुरंगाचा आसरा नीट केला. देवळात भजन चाले, त्यात ते हळूहळू रस घेऊ लागले. त्यांनी एकादशीचे उपोषण धरले. ज्ञानेश्वरी आणि नाथभागवत यातले बरेच उतारे पाठ केले. त्यांची श्रद्धा हळूहळू जीव धरू लागली. कुठेच काही नाही असे झाले होते. संसाराच्या सागरातली पायाखालची वाळू निघून गेली होती. त्यामुळे भजन-कीर्तन हे त्यांचे विश्रांतिस्थान ठरले. संतांच्या कीर्तनात ते आवडीने ध्रुपद धरू लागले. वाढत्या मनोल्हासाने त्यांनी संतसेवा आरंभली. लोकांनी याही बाबतीत नाके मुरडली. पण –

**सत्य असत्यासी मन केले ग्वाही ।**
**मानियेले नाही बहुमता ॥**

या निर्णयावर येऊन तुकोबांनी लोकलाज लाथाडली आणि सर्वभावे देव आपलासा केला. भक्तिसुखाची गोडी त्यांना अपूप वाटली. प्रपंचात जे कधीच भेटले नव्हते, ते त्यांना परमार्थात गवसले.

आपल्याप्रमाणेच आपल्या पत्नीनेही परमार्थाला लागून सुखी व्हावे, अशी तुकोबांची इच्छा. ' संसाराचे हे क्षुद्र सुख तू थुंकून टाक; आपला गळा उगवून घे. ' म्हणून तिला ते सारखे उपदेशीत. पण तुकोबांना जसा संसाराचा विश्वास नव्हता, तसा तिला परमार्थाचा. आपला नवरा देवलसी झाला आणि पोरांची कदर करीनासा झाला, हे पाहून ती अगदी कावून गेली होती. आणि तिच्या हातचा एकमेव उपाय म्हणून तुकोबांवर हवे तसे तोंडसुख घेत होती –

" कोण मेला दावेदार होता तो या जल्मी वैर साधायला नवरा होऊन आला आहे. किती आपदा काढायच्या मी संसारात ! काय घालू या पोरांच्या पानात ? ही सगळी मरती तरी बरे होते. हा तर डोचके तिंबतो, माळा घालतो

अन् देवळात टाळ कुटीत बसतो. याच्या जोडीला आणखी काही वेडे खुळे जमले आहेत. सगळे मेले लाजा कोळून प्याले आहेत. यांच्या 'रांडा' घरात तळमळतात, त्यांची दखलगिरी आहे का यांना ? या विठ्याने माझ्या संसाराचे वाट्टोळे केले –"

पुढे पुढे तुकोबांना एकांताचा नाद लागला. त्यांची एकांतस्थळे म्हणजे गोराडा, भंडारा, भामनाथ हे डोंगर. देवळाच्या मागे पश्चिमाभिमुख उभे राहिले की डाव्या हाताला देहूरोड स्टेशनाच्या बाजूस सहा मैलांवर गोराडा दिसतो. थेट पश्चिमेस दोन मैलांवर भंडारा आहे. त्याच्या शिखरावरचे विठ्ठल मंदिर देहूतून अस्पष्टसे दिसते. उजव्या बाजूला डोहाच्या पलीकडे आठ मैलांवर भामनाथ आहे.

तुकोबा लहर लागेल तसे कधी या, तर कधी त्या डोंगरावर जाऊन बसत. आता माणसांची सोयरीक तुटली होती. 'वृक्षवल्ली आम्हा सोयिरी वनचरे' झाली होती. वर आकाशाचा मंडप, खाली धरित्रीचे सिंहासन यामध्ये त्यांचा विठुराणा विराजित झालेला त्यांना दिसे. तिथे त्यांचा स्वतःच्या मनाशीच संवाद चाले. शास्त्रांचे सार आणि वेदांची मूर्ती असा पांडुरंग जिवाचा सखा होऊन तिथे त्यांना सोबत करी.

तुकोबा त्या निवांतपणात तहान भूक विसरत असले, तरी जिजाईला त्यांच्या भुकेचा विसर कधीही पडत नसे. घरी केलेला भाकर तुकडा फडक्यात बांधून ती धर्मपत्नी त्यांना शोधीत डोंगर उरापोटावर घेई. त्यांच्या मुखी ग्रास गेल्यावर ती स्वतःचे पोट पुजी. ती विठोबाला शिव्या देई; पण त्या त्याला ओव्या वाटत. देहभान विसरलेल्या आपल्या भक्तराजाची काळजी घेणाऱ्या जिजाईचे देवाला मोठेच कौतुक होते.

या अखंड एकांत चिंतनात त्यांच्या अभंगवाणीला ओज चढले. ते दिवसभरात डोंगरावर आत्मचिंतन करीत अन् रात्री 'मथियले सार नवनीत' अभंगरूपाने श्रोत्यांच्या श्रवण संपुटात घालीत. तुकोबांचे अभंग देवाला गोड घासासारखे वाटत. पूर्वी नामयाच्या अभंगांनी वेडापिसा झालेला विठ्ठल आता तुकोबांच्या अभंगांनी रिझे, रंजे. मोरोपंतांनी ही गोष्ट लिहून ठेवली आहे –

**श्रीनामदेव तुकया तदभंग प्रभुसि गोड घास तसे,**
**गहिवरतसे परिसतां नाचतसे पांडुरंग हासतसे ।।**

नारदमुनीप्रमाणेच तुकोबांनीही अखंड कीर्तनभक्ती गाजवली. कीर्तन हा त्यांचा नित्यनेम होता. श्रोते येवोत न येवोत, यांचे आपले कीर्तन व्हायचेच. त्या कीर्तनात जनांना 'मेघवृष्टीने' उपदेश चालायचा. जिजाईला, गावच्या पाटलाला, रामेश्वरभट्टाला, अन् मंबाजीबुवाला सुद्धा त्यांनी एकच मंत्र सांगितला – रामकृष्णहरी. नामरंगासाठी 'यारे यारे लहान थोर 'म्हणून सर्वांना पाचारले. आपल्या कथेत देव, भक्त आणि नाम यांचा त्रिवेणीसंगम उभा केला. ते म्हणतात –

**उघडी समाधि हरिकथा सोहळा**
**नरनारीबाळां लहानथोरां ।।**

तुकोबांची अभंगवाणी ही ईश्वरी प्रेरणा होती. पांडुरंगासह नामदेवाने स्वप्नात भेट देऊन त्यांना अभंगरचनेचा आदेश दिला होता. नामदेवाला आपला 'शतकोटी' अभंगांचा अपुरा राहिलेला संकल्प तुकयाच्या वाणीतून पुरा करायचा होता आणि देवाला त्या अभंगांचे अलंकार मिरवायचे होते. अभंगांच्या शेवटी 'तुका म्हणे' ही नाममुद्रा लाव, हीही त्यांचीच शिफारस. तुकोबा त्या आदेशाला जागले आणि मग त्यांच्या स्वैरकथाही अभंगरूप घेऊ लागल्या. याच अभंगांच्या द्वारे तुकोबांनी परमार्थ गावोगाव, घरोघर, झोपडीझोपडीत पोचवला. प्रत्येकाच्या जिभेवर 'तुका म्हणे' ही अक्षरे नाचू लागली. अभंगाबाचून कीर्तन म्हणजे सूर्यावाचून दिवस किंवा चंद्रावाचून चांदणे ठरले. पण ज्या कारणामुळे तुकोबा हे भागवतधर्माचे कळस ठरले, त्याच कारणाने ते वैदिक पंडितांच्या हृदयात शल्य झाले.

**वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा ।**
**इतरांनी वहावा भार माथां ।।**

हे तुकोबांचे निधडे बोल त्या वैदिक कर्मठांना कसे रुचावे ? तुका 'वाणी' श्रुतिस्मृतिप्रतिपादित, गुरुगम्य अर्थ मराठीत आणतो आणि चवाठ्यावर मांडतो, हे त्यांच्या दृष्टीने अब्रह्मण्यम् होते. सनातन धर्माला सपशेल विरुद्ध होते. आणि त्यांच्या मते हा श्रुतींवरचा अत्याचार तावडतोब थांबायला हवा होता.

मंबाजीने अशा लोकांचे पुढारीपण स्वीकारले. गावच्या पाटलालाही अनुकूल करून घेतले. दिवाणीत गाऱ्हाणे गेले आणि रामेश्वरभट्ट या न्यायाधीशाचा

२०८७५ ९५-५५1२

तुकोबांना हुकूम झाला. ‘ताबडतोब तुझ्या अभंगांच्या वह्या इंद्रायणीत बुडवून टाक !’

तुकोबा ‘आलिया भोगासी सादर’ झाले. त्यांनी चांगल्या वेष्टनात बांधून ठेवलेल्या त्या वह्या, तो ज्ञानभक्तीचा अमोल परिपाक, तो मराठीत अवतरलेला दैवी प्रतिभेचा कुवासा, तो त्यांचा ज्ञानमय प्राण, तो शब्दरूप विठ्ठल, त्यांनी स्वहस्ते इंद्रायणीच्या डोहात बुडवला. ती दारुण शिक्षा पाहून कोणी रडले, तर कोणी हसले. तुकोबांच्या अंतराची मात्र तळमळ सुरू झाली. त्यांना कुठेच चैन पडेना. विचार करून करून मस्तक फुटायची वेळ आली. काय मिळवले मी जीवनात ? काय उरले आता माझ्या हातात ? “देव ना संसार। तुका दोहीकडे चोर ! ...”

आणि मग त्यांनी देवाचे ब्रीद पाहायचे ठरवले. एका शिळेवर आसन घालून त्यांनी प्रायोपवेशन मांडले. इतिहासातला हा पहिला ‘सत्याग्रही’ पंचप्राण इरेला घालून बसला. देव तरी भेटो, नाहीतर जीव तरी जावो ! उगवता सूर्य ज्या जागी त्यांना पाही, त्याच जागी मावळता सूर्यही. रात्री नक्षत्रे त्यांच्या त्या अनशनव्रताची साक्षी होत. एक दिवस गेला, आश्वासन नाही. दोन दिवस उलटले, कुठूनही कृपेची झुळूक नाही. तीन, चार, पाच, दहा, तेरा दिवस उलटले. पण कुठेच कशाला पत्ता नाही. अखेर त्यांनी विठाईमाऊलीच्या नावाने टाहो फोडला –


तेरा दिवस झाले निश्चक्र करिता
न पवसी अनंता मायबापा ॥
पाषाणाची खोळ घेऊन बैसलासी
काय हृषीकेशी झाले तुज
तुजवरी आता प्राण मी त्यजीन
हत्या मी घालीन पांडुरंगा ॥
फार विठाबाई धरिली तुझी आस
करिन जीवा नाश पांडुरंगा ॥
तुका म्हणे आता मांडिले निर्वाण
प्राण हा सांडीन चंद्रभागे ॥

आणि दयावंत देवाने मायबापांवर ताण केली. पांडुरंग बालवेषाने तुकोबांच्या पुढे धवधवीत उभा राहिला. त्याने तुकोबांना सर्वांगी निववले. जळातल्या लाह्यांप्रमाणे पाण्याचा बुंदही न लागता त्या अभंगवह्या डोहावर तरंगू लागल्या. भक्त हर्षनिर्भर झाले. निंदकांच्या मुखमुद्रा काळवंडल्या. तुकोबांचे सत्त्व भगवंताने राखले !

आपले वाङ्मयधन लोकधनाच्या पदवीला पोचवण्याचे भाग्य विशेषत्वाने तुकोबांना लाधले आहे. तुकोबांची अभंगवाणी ही गेल्या तीनशे वर्षांच्या काळात महाराष्ट्रवाणीचा एक अविभाज्य घटक बनली आहे. तुकोबांच्याबद्दल मराठी मनाला दूरत्वाची किंवा परकेपणाची भावना कधीच शिवली नाही. तुकोबांच्या अभंगांतील कितीतरी चरण, अर्धचरण, शब्दप्रयोग, कल्पनास्फुल्लिंग मराठी माणसाच्या बोलीभाषेत सहजपणे एकजीव होऊन गेले आहेत.

देहूत पांडुरंगाच्या मंदिराला लागूनच तुकोबांची पहिली भार्या रुक्मिणी हिचे वृंदावन आहे. ज्या शिळेवर तुकोबांनी तेरा दिवस निश्चक्र उपवास केला, ती शिळा आजमितीस त्या वृंदावनाला टेकवून ठेवलेली आहे. तुकोबांचे जन्मस्थान इनामदारांच्या वाड्याला लागूनच आहे. शके १५३० या वर्षी ज्या जागी तुकोबांचे ललाट धरणीला लागले, तिथे विठ्ठलरखुमाईंच्या मूर्ती स्थापलेल्या आहेत.

महाद्वारातून बाहेर आल्यावर समोरच तुकोबांच्या वंशजांच्या काही समाध्या एकाच ठिकाणी दिसतात. त्यातली सर्वात मोठी तुकोबांचे धाकटे चिरंजीव नारायणबावा यांची आहे. नारायणबावा हे ज्ञानेश्वरांचे अवतार होते आणि त्यांनी जीवत्समाधी घेतली अशी एक आख्यायिका मला देहूतच ऐकायला मिळाली.



तुकाराम इथून अदृश्य झाले

तिथून सरळ इंद्रायणीच्या काठाने उत्तरेला निघाले, की काही पावलांवर इंद्रायणीचा तो

मैल दीड मैल लांबीचा डोह सुरू होतो. तिथेही एक लहानसा घाट आहे. त्यावर उभे राहून चार भुईमुगाच्या शेंगा डोहात फेकल्या की भल्या मोठ्या माशांची झुंड पृष्ठभागावर येऊन त्यांवर तुटून पडते. हे मासे म्हणजे स्वर्गातले तेहतीस कोटी देव असे समजतात.

कालियाच्या आशे ।
देव जळीं झाले मासे ॥

अशी वारकऱ्यांची धारणा आहे. देहूकर म्हणतात, की पावसाळ्यात हे मासे आळंदीला जातात अन् भाद्रपद संपल्यावर परत उलटे स्वस्थानी येतात.

तिथून आणखी जरा पुढे गेले, की गोपाळपूर लागते. नांदरुखीच्या झाडांनी ते सुंदर आणि छायामय झाले आहे. त्यातल्याच एका झाडाखाली लहानशा देवळीत तुकोबांची वीणाधारी पाषाणमूर्ती आहे. शके १५७१ फाल्गुन वद्य द्वितीया या दिवशी तुकोबांचे इथेच अखेरचे कीर्तन झाले. इथूनच ते सदेह वैकुंठाला गेले.जाण्याच्या पूर्वी त्यांनी श्रोत्यांचा अन् टाळकऱ्यांचा निरोप घेतला.

आम्ही जातो आमुच्या गावा
आमुचा रामराम घ्यावा ॥

ते पुढे म्हणाले –

" मला देवाघरचे आमंत्रण आले. आता मी माहेराला मोहरलो.शंखचक्रधारी अन् पीतांबर नेसलेला पांडुरंग मला पैलतीरावरून पालवीत आहे. गरुडही फडत्कारे आला आहे. पाहा ती मेघश्याम साजिरी गोजिरी श्रीमूर्ती ! तिच्या तेजापुढे गभस्ती लोपत आहे. आता तुमची आमची ही शेवटची भेट. यापुढे सर्व इतिहासाचा पसारा. देवाने मला अक्षयपद दिले. कृपेच्या सिंहासनी पैठे केले.

याचसाठी केला होता अट्टहास
शेवटचा दिस गोड व्हावा ॥

आणि तो गोड दिवस आज आला. शेवट गोड ते सर्व गोड . . . धर्मकर्माप्रमाणे तुम्हा सर्वांचे कल्याण होवो, हा माझा तुम्हाला आशीर्वाद !

रामकृष्ण मुखी बोला
तुका जातो वैकुंठाला ॥

त्यासरसा नामाचा गजर सुरू झाला. श्रोत्यांच्या हृदयावर पडलेले दुःख–शोकाचे दडपण त्या नामघोषाने दूर झाले. सगळेच नामधुंद झाले. काय घडत

आहे अन् काय घडणार आहे, याची कोणालाच जाणीव उरली नाही. थोड्या वेळाने त्या तंद्रीतून भानावर येतात तो त्यांना काय दिसले ?

**कुडीसहित झाला तुका गुप्त ।**

या नांदरुखीच्या शेजारीच एका झोपडीवजा ओवरीत एक पाषाणप्रतिमा आहे, ती तुकोबांची कन्या भागीरथी. आपला पुण्यश्लोक पिता आपल्याला न कळवता न येण्याच्या वाटेला निघून गेला हे त्या लडिवाळ मुलीला मानवले नाही. तिच्या काळजाने ठाव सोडला. तिने अन्नपाणी वर्ज्य केले. जवळच्याच गावी तिचे सासर होते. सून प्राणान्त मांडून बसली हे पाहून सासरची माणसे घाबरली.

अखेर तुकोबांना तिच्या समाधानासाठी तिच्या घरी प्रकट व्हावे लागले. मुलीच्या हातची शेवयांची खीर खाऊन मगच ते अदृश्य झाले.

देहूला पाहण्याजोगे फार थोडे आहे; पण चिंतनाजोगे पुष्कळ आहे. एका महाभागवताचे समग्र चरित्र या भूमीवर घडले आहे. तुकोबांनी संसार ' फलकट ' मानला, भोगावर पाषाण घातला, विवेक-वैराग्याची कास धरली. आणि ते ' देवाहूनही बळी ' झाले. इंद्रायणीने हा ' नराचा नारायण ' आपल्याला दिला. सुखाचा मार्ग, प्रेमाची जागा आणि जीवनाचे श्रेय त्यांनी आपल्याला दाखवून दिले आहे. देहूला कशासाठी जायचे, ते मातामाऊली आपल्याला सांगतात –

**देहूला जाऊन । देह विसरावा ।।**
**अंतरी स्मरावा । तुकाराम ।।**

# ८. आळंदीची वारी

मी आळंदीच्या अनेक वाऱ्या केल्या आहेत. पुण्याहून आळंदी अवघी चौदा मैलांवर आणि सतत वाहती वाट; त्यामुळे कोणालाही मनात येईल तेव्हा अल्प श्रमात आणि अल्प खर्चात ती यात्रा करता येते. पण माझ्या चित्तावर ज्या एका खेपेचा ठसा वज्रलेप होऊन राहिला आहे, तो प्रसंग भारताच्या इतिहासात अत्यंत पुण्यपावन आहे.

म. गांधींच्या रक्षाविसर्जनाचा तो दिवस होता. आसेतुहिमाचल उभ्या भरतखंडामध्ये गंगा-यमुनादी पुण्यसरितांच्या प्रवाहात, पूर्व-पश्चिम सागरात आणि अनेक पुण्य सरोवरात त्या दिवशी बापूजींची रक्षा विसर्जित होणार होती. आत्मतत्त्वाने विश्वमानव्याला कव घालून राहिलेले बापूजी रक्षारूप जडदेहानेही भारतभर पसरणार होते.

त्यातलीच अंशमात्र रक्षा इंद्रायणीच्या वाट्याला आली होती. चक्रतीर्थाच्या घाटावर पुंडलिकाच्या मंदिराजवळ ती रक्षा इंद्रायणीला लाभायची होती. पुण्याहून आणि आजूबाजूच्या गावांतून फार मोठा जनसमूह चिऱ्यासारखी जड झालेली अंतःकरणे घेऊन तिथे जमला होता. भाग्यवशात् त्या विसर्जन विधीचे धार्मिक पौरोहित्य मजकडे आले होते.ते सारे पुरे झाल्यावर ती रक्षा इंद्रायणीच्या जलपृष्ठावर तरंगली. अनेकांनी त्यासरशी पाण्यात बुड्या मारल्या. अनेकांनी मार्जने केली. मी हे सर्व करीत असता वास्तवातून कल्पनेच्या राज्यात शिरलो. एक निराळेच दिव्य, तेजःपुंज दृश्य माझ्या मनश्चक्षूंपुढे उभे झाले –

इंद्रायणीच्या तळातून बापूजींची आत्मज्योत ज्ञानेश्वरांच्या समाधिस्थानात शिरत आहे. चिरा न हालवता, दार न उघडता. ज्ञानेश्वराची निष्कंप आत्मज्योत या नव्या ज्योतीच्या स्वागतासाठी पुढे झोक देत आहे. दोन्ही ज्योतींमधले अंतर हळूहळू कमी होत आहे. दोघीही एकमेकींच्या हृदयात आपले

प्रतिबिंब पाहात आहेत. दोघीही गीतामाऊलीच्या कन्या. दोघीही गीतार्थाच्या सोयऱ्या. दृश्यपणे वेगळ्या; पण अंतरी अभिन्न. एक 'भावार्थ दीपिका' पाजळणारी तर दुसरी 'अनासक्तियोग' सांगणारी. दोघीही शुद्ध सत्त्वागळ्या. दोघीही तमाची काजळी फेडून राहिलेल्या. संकुचितपणाचा, क्षुद्रतेचा, विषमतेचा, दोघींनाही तिटकारा. दोघींचाही विश्वाला पोटाळून घेण्याइतका व्यापकपणा.


हे विश्वचि माझे घर। ऐसी मती जयाची स्थिर.
किंबहुना चराचर। आपण जाहला॥

हे विचारबीज ज्ञानेश्वरांच्या ज्योतीने पेरले. बापूजींच्या ज्योतीने त्या बीजाचे 'तरु' सगळ्या क्षेत्रात लावले, वाढवले.

आणि आता त्या दोघी पुनश्च एक होत होत्या. प्रेमाने उचंबळून एकमेकींना खेव देत होत्या. आता आधीची कोण अन् नंतरची कोण, हे बोलणे खुंटले होते.

**दो ओठी एक बोलणे। दो पायी एक चालणे।**

दोघींचा मिळून एकच ज्ञानप्रकाश. मला वाटले, इंद्रायणीत महात्माजींची रक्षा विसर्जिण्यात जे आध्यात्मिक औचित्य साधले, ते अन्यत्र कुठेच साधणार नाही. हे रक्षाविसर्जन नव्हेच. ते आहे ज्योतिर्मीलन!



पुलावरून आळंदीचे दर्शन

आळंदीला गेल्यावर इंद्रायणीत स्नान करून शुचिर्भूत व्हावे अन् नंतर ज्ञानेश्वरांच्या दर्शनाला जावे, हा उत्तम पक्ष. पाण्यात उतरून आळंदीकडे पुढा केला, की प्रसन्नता धावून भेटायला येते. एक सुंदर वळण घेऊन इंद्रायणी आळंदीत शिरली आहे. 'नदी वेगेन शुध्यति' हे जितके खरे; तितकेच ती वळते तेव्हा अधिक शोभते हेही खरे. त्यानंतर पुलाखालून ती बरेच अंतर सरळ गेली आहे.

हिचे इंद्रायणी हे नाव दिव्य म्हणजेच देवांशी निगडित आहे. इंद्राच्या तपाचे हे अयन म्हणजे स्थान. त्या तपाची साक्षी म्हणून ही इंद्रायणी. इंद्रच नव्हे; तर कुबेरसुद्धा इंद्रायणीविषयी प्रेमादर बाळगीत होता. जवळच्या धानुरे गावी त्याने आपल्याजवळचा अतिरिक्त धनाचा साठा धरित्रीच्या पेटीत ठेवला आणि तिथे धनेश्वर महादेवाची स्थापना केली, अशी लोककथा आहे. 'ज्ञानबा तुकाराम ' हा मधुर अन् पवित्र महामंत्र इंद्रायणीच्या पाण्यातून उठला. हिची काया छोटी; पण करणी मोठी. हिच्या पंचक्रोशीत तीनशे वर्षांच्या अवधीत ज्ञानेश्वर-तुकाराम हे दोघे संतांचे मेरुमणी गाजले, हे हिचे लोकोत्तरत्व. इंद्रायणीचे पाणी ज्ञानाने पाचक आणि भक्तीने रोचक आहे, असे महर्षी विनोबा सांगतात. हिच्या पात्रात मासे आहेत, तशी कासवेही आहेत. त्यातले एखादे कासव खडकावर बसून लांब मानेने तुमच्याकडे पाहू लागले, की ज्ञानेश्वरमाऊलीची कृपादृष्टी कशी असेल, त्याची तुम्हाला कल्पना येईल.

घाटावर एका ठिकाणी लहान लहान समाधि वृंदावनांचे संमेलन आहे. त्यातच अलीकडच्या काळातले भागवतधर्माचे निष्ठावंत प्रचारक विष्णुबुवा जोग यांचीही समाधी आहे. आता तिथेच शेजारी अलीकडच्या काळातले वारकरी-मंडळाचे नेते वै. मामासाहेब दांडेकर यांची समाधी बांधण्यात आली आहे.

विष्णुबुवा म्हणजे पुण्यातले नावाजते मल्ल. असा माणूस ज्ञानेश्वरांच्या प्रेमधर्माचा पुरस्कर्ता आणि शांतीचा उपासक बनतो हा सकृद्दर्शनी तरी विरोधालंकारच वाटतो. भगवंताचे आणि भागवताचे द्वेष्टे चाणूर-मुष्टिक हे मल्ल मथुरेत निर्माण झाले. भगवद्भक्त मल्ल आपल्याला आळंदीने दाखवला. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, हे म्हाताऱ्यांनी डोळे पुशीत वाचायचे ग्रंथ अशी अजून बहुतेकांची समजूत; पण ध्रुव-प्रल्हादाच्या पंथातल्या या विष्णुबुवांनी तरुणपणीच त्यात बुडी दिली. साक्षात्कारासाठी ज्ञानेश्वरांच्या पायांशी बसून निग्रही अनुष्ठान केले. आणि अखेर शांतिप्रमदेचे कांत होऊन ते स्वरूपी रमले. वारकरी शिक्षणसंस्था प्रथम त्यांनीच निर्माण केली. अजूनही आळंदीत तिचे ज्ञानदान चालू आहे.

चक्रतीर्थाजवळूनच एक दगडी रस्ता वर जाऊन आपणांस ज्ञानेश्वरांच्या महाद्वारात पोचवतो. तिथे माळा, फूलपत्री, नारळ, बुक्का हे पूजासाहित्य आणि नैवेद्यासाठी मिठाई विकणारी दुकाने दुतर्फा हारीने बसलेली आहेत. पंढरपुरात

महाद्वारातली पहिली पायरी जशी नामदेवाची तशी आळंदीच्या महाद्वारातली हरिभक्त हैबतरावबाबांची. तिथला मुंडासे घातलेला पितळी मुखवटा पाहिल्यावर समजून येते, की या महाभागवताने इथे अखेरचा ठाव मागितला आहे. त्यांच्या भक्तियोगाला आरतीतून प्रारंभ झाला आणि ते अखेर ‘ सर्वे भागवतोत्तमः ’ असे झाले. मोठी ऐकण्याजोगी कथा आहे ती —

सातारा जिल्ह्यातले आरफळ हे हैबतरावबाबांचे मूळ गाव. ऐन तारुण्यात नशीब काढण्यासाठी ते घराबाहेर पडले आणि ग्वाल्हेरला पोचले. शिंद्यांच्या दरबारात त्यांनी चाकरी धरली. चढत चढत ते सरदारकीपर्यंत पोचले. बऱ्याच वर्षांनी त्यांना जन्मभूमीच्या दर्शनाची इच्छा झाली. बरीचशी संपत्ती आणि शिपाई प्यादे समागमे घेऊन ते निघाले. वाटेत लागला सातपुडा. या पर्वतश्रेणीत भिल्लांनी त्यांना गाठले, आणि त्यांच्याजवळचे सर्वस्व लुबाडले. प्रतिकाराला सिद्ध होताच मारले, झोडपले. सगळ्यांची पांगापांग झाली. भिल्लांच्या नायकाने बाबांना पकडून एका गुहेत कोंडले. दारावर शिळा लावून परततांना तो म्हणाला. ‘ मर आता ! ’

बाबांना त्यावेळी ब्रह्मांड तर आठवलेच, पण त्याबरोबरच ब्रह्मांडनायकही आठवला. त्यांना ज्ञानेश्वरांचा हरिपाठ मुखोद्‌गत होता. त्याचे त्यांनी अखंड पारायण सुरू केले. ते ‘ हरिनामी संकल्प ’ घालून राहिले. अन्नपाण्याविना त्यांच्या देहाचे काष्ठ होऊ लागले. पण ओठ मात्र हरिपाठ पुटपुटतच राहिले. कर्मधर्मसंयोगाने त्यानंतर थोड्याच दिवसांत त्या भिल्लनायकाची पत्नी पुत्ररत्न प्रसवली. त्या आनंदाप्रीत्यर्थ तिने बाबांना गुहेच्या बाहेर काढून सोडून देण्याची गळ घातली. एकवीस दिवसानंतर बाबांच्या गुहेच्या तोंडावरची शिळा हालली. निषादपतीने त्यांना बाहेर काढले. बाबांचे शरीर अचेतन झाले होते; पण ओठ हालत होते. भिल्लाला त्याचा अचंबा वाटला. त्याने बाबांना सावध केले. ताकद येईपर्यंत त्यांची शुश्रूषा केली. नंतर लुटलेले धन परत देऊन त्यांची सन्मानाने रवानगी केली. सुरक्षित रस्ता येईपर्यंत त्यांना सोबत करायलाही तो चुकला नाही.

बाबांचा पुनर्जन्म झाला होता अन् तोही नामाच्या बळावर. ज्या ज्ञानेश्वरांची मूर्ती त्यांनी आळवली, तिचे सामर्थ्य त्यांना कळून चुकले होते. ज्यांना श्रद्धेचा साक्षात्कार घडला, ते संसाराकडे पाठ फिरवून संतांना सन्मुख

झाले, तर त्यात नवल कसले ! बाबा आरफळला जाण्याऐवजी सरळ आळंदीला आले. पदरी होते ते द्रव्य गोरगरिबांना वाटून केवळ भक्ती तेवढी त्यांनी स्वत:साठी ठेवली.

पुढे बारा वर्षे त्यांनी इंद्रायणीच्या पात्रातल्या सिद्धबेटात अनुष्ठान केले. आणि महाद्वारी उभे राहून भजन केले. बाबांचे भजन रंगात आले, की ज्ञानेश्वरांची समाधी डोलत असे, असे सांगतात. ज्ञानेश्वरांच्या पादुका गळयात बांधून प्रथम त्यांनी पंढरीची वारी सुरू केली. पुढे याच पादुका पालखीतून पंढरीला जाऊ लागल्या. आणि त्यानंतर आळंदीसंस्थानाने हे कार्य आपल्या शिरावर घेतले. आजतागायत ही पालखी आषाढी वारीला पंढरपुरात जाते. या पालखीच्या सोहळयाचे सर्व नियम बाबांनीच बांधून दिले आहेत.

महाद्वारात एक मोठी घंटा आहे. समोर गरुडमंडप आहे. वर नगारखाना आहे. आत शिरल्यावर समोरच संगमरवरी फरसबंदीचा सभामंडप आहे. त्यापुढे आणखी एक लहान दालन असून त्याला लागूनच पुढे गाभारा आहे. आत दिव्यांचा मंदसा प्रकाश सदैव भरून असतो. उदबत्त्यांचा घमघमाट बाहेर येत असतो. फूल-पत्रीचा वासही त्यातच मिसळत असतो. दर्शनेच्छू लोकांची इथे वाण नाही. तुम्ही डाव्या बाजूला रांगेत उभे राहा. आतले लोक उजव्या बाजूने बाहेर येतील आणि तुम्हाला आत प्रवेश मिळेल.

आत शिरल्यावर समोरच काळया पाषाणाची जी ठेंगणीशी वेदी दिसते, तीच ज्ञानोबारायांची समाधी. तुम्ही खाली बसा आणि दोन्ही भुजा पसरून तिला उराउरी भेटा. ' एथ भीड कवणाची धरू ! तू माय आमुची ' असे म्हणा. माऊलीजवळ संकोचाल, तर वात्सल्याला मुकाल. नेणते लेकरू होऊन धनाचा, ज्ञानाचा, वयाचा, कर्तृत्वाचा सगळा अभिमान फेकून देऊन तिच्या पायी मिठी घाला. जो अहंभाव सोडील, त्यालाच माउली ओळखील. त्याचीच दखल घेईल. मस्तक ठेंगणे करायच्या वेळी, ललाट घासण्याच्या वेळी मोरोपंतांची पुढील आर्या स्तुतीचा मंत्र म्हणून तुम्हाला उपयुक्त होईल—

**ज्ञानेशा भगवंता भगवज्जनवल्लभा महासदया ।**
**कलियुगवर्ती जन जो देसी स्मरणेचि मुक्तिचे पद या ।।**

तुमच्या आमच्या मोठेपणाचा काय पाड ! सकल संत त्यांच्या पदी लीन झाले आहेत. नामयाची जनी म्हणते, ' मी जन्मोजन्मी तुझ्यावरून ओवाळून

जाईन ! ' एकनाथ महाराज विनवतात, ' तुम्ही बसोनी अंतरी । मज जागवा निर्धारी. ' तुकोबा त्यांना गळ घालतात, ' राखा पायांपे किंकरा ' मुक्तेश्वर ग्वाही देतात, ' त्याचे चरण चिंतिले मनीं । तेणे पावन झालो जनी '



समाधी आणि विठ्ठल-रखुमाई

मंदिरापुढे उभे राहिल्यावर डाव्याउजव्या हाताला दोन पिंपळपार दिसतील. पैकी उजव्या हाताचा तो ' सोन-पिंपळ ' ' जयाचिये द्वारी सोन्याचा पिंपळ ' तो हाच. आज कैक शतके तो तिथे ' द्वारी तिष्ठत ' आहे. नवी त्वचा आतून येते आणि बाहेरील सालीच्या खपल्या झडून जातात. जुनी पाने पिवळी होऊन गळतात न गळतात तोच नवी आरक्त पालवी वाऱ्यासंगे झुलू लागते. पुन्हा आपला तो नवा तरणा. आज यात्रेकरू त्याच्या पाराला पाठ घासतात सात शतकांपूर्वी ज्ञानेश्वरांची आई प्रदक्षिणा घालून तो पार झिजवीत होती. आपले यजमान विठ्ठलपंत कुठे बेपत्ता झाले आहेत, ते परत येऊन संसाराला लागू देत, म्हणून त्या अश्वत्थ नारायणाला साकडे घालीत होती.

विठ्ठलपंत हे अभिजात विरक्त, तीर्थक्षेत्रे हिंडावी, साधुसमागम करावा आणि आत्मकल्याण साधावे हाच त्यांना हव्यास. आळंदीचे कुलकर्णी सिधोपंत यांनी आपली मुलगी देऊन त्यांच्या पायात सोनेरी शृंखला अडकवली; पण अडवलेला ओघ एक दिवस काशीच्या रोखाने धावलाच, रामानंदस्वामींच्या-कडे जाऊन विठ्ठपंतांनी भगवी वस्त्रे घेतली. त्यांना काय कल्पना, की हा

नवा शिष्य आपल्या पत्नीची अनुज्ञा न घेता, पितृऋण न फेडता चतुर्थाश्रम स्वीकारायला आला आहे म्हणून !

दैववशात् रामानंदस्वामी दक्षिणयात्रेला निघाले आणि एक दिवस आळंदीला पोचले. त्याकाळी हे स्थान सिद्धक्षेत्र म्हणून प्रसिद्ध होते. आदिनाथ शंकराची ही तपोभूमी. अगस्तिप्रमुख अनेक ऋषिमुनींचे हे सिद्धक्षेत्र, पूर्वेला मर्कळचा केशवराज, दक्षिणेला पुण्याचा पुण्येश्वर, पश्चिमेला इंदुरीचा ब्रह्मेश्वर आणि उत्तरेस भीमातीरी खेटकग्रामी सिद्धेश्वर, अशी ही पावन पंचक्रोशी त्याकाळी गाजत होती. म्हणूनच रामानंद या यात्रेला आले होते.

अनेक माणसे या स्वामींच्या दर्शनाला आली, तशी रुक्मिणीही आली. कपाळी कुंकुमतिलक पाहून त्यांनी तिला ठराविक आशीर्वाद दिला. 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव.' तो ऐकून ती बिचारी आपल्या दैवदुर्विलासाला हसली. स्वामींनी हसण्याचे कारण पुसले. 'महाराज, जिचा पती परागंदा झाला आहे, ती पुत्रवती कशी होईल, म्हणून हसू आले.' स्वामी जरा अधिक खोल पाण्यात शिरले. विठ्ठलपंतांच्या खाणाखुणा विचारता त्यांची खात्री झाली, आपला शिष्य चैतन्य हाच हिचा पती असला पाहिजे.

काशीस परत जाऊन स्वामींनी शिष्याला छेडले. सर्व प्रकार त्याच्या मुखाने वदवून घेतला. 'जा, पुन्हा गृहस्थाश्रम स्वीकार. माझी तुला तशी आज्ञा आहे' ते म्हणाले. विठ्ठलपंतांना परत आळंदीस यावे लागले. गृहस्थ व्हावे लागले. संन्याशाने उलटून शिखासूत्र धारण करणे आणि गृहस्थाश्रम चालवणे हा प्रकार त्या काळात अक्षम्य, अधर्म्य होता. ब्राह्मणांनी या जोडप्याला ताबडतोब वाळीत टाकले. साहजिकच आप्तवर्गानेही उपेक्षिले. सर्वतोमुखी निंदा आणि अपमान ! पण एकमेकांच्या प्रेमबळावर त्या दंपतीने आला दिवस साजरा केला.

विठ्ठल-रुक्मिणींना एकंदर चार अपत्ये झाली. तीन मुलगे आणि एक मुलगी. निवृत्ती शके ११९५ मध्ये, ज्ञानेश्वर ११९७ मध्ये, सोपान ११९९ मध्ये आणि मुक्ताबाई १२०१ मध्ये. चारी भावंडात दोन दोन वर्षांचे अंतर. सोन्यासारखी सुंदर, शहाणी मुले; पण आळंदीकरांना त्यांचे काय कौतुक ! शब्दज्ञानी पंडित आणि भिक्षुक ब्राह्मण यांनी या लेकरांचा परोपरी उपहास केला. जिथे जातील तिथे त्यांच्या कानी एकच वाक्य–संन्याशाची कारटी ! आईबापांवरचा बहिष्कार मुलांनाही लागू झाला होता.

ज्ञानेश्वरांना मौंजीबंधन हवे होते. त्याद्वारे मिळणारे संस्कारयुक्त ब्राह्मण्यही हवे होते. पण रूढिनिष्ठ पोथीपंडित त्यांना ते द्यायला तयार होईनात. धर्माची सत्ता ज्ञानेश्वरांना मान्य होती; पण धर्मच त्यांना आपंगीना. आपल्या मुलांना व्रात्यस्थितीत आयुष्य घालवावे लागणार, त्यांचा जन्म केवळ धरणीला भार होणार, म्हणून विठ्ठलपंत उदास झाले. त्यांनी ब्रह्मवृंदाला कळवळून प्रार्थिले, की 'मला प्रायश्चित्त देऊन पावन करा.' त्यावर रुढिवादी पंडितांची वाचा वदली, की 'देहान्त प्रायश्चित्त !'

विठ्ठलपंत त्याही गोष्टीला तयार झाले. त्यांना आपल्या जिवापेक्षा मुलांचे जिणे-जगणे अधिक महत्त्वाचे वाटत होते. म्हणून खरोखरच त्या दयावंत मातापितरांनी प्रयागला जाऊन गंगा-यमुनांच्या संगमात देह लोटून दिले. मुलांसाठी स्वार्थत्याग करणारे पुष्कळ भेटतील; पण स्वात्मत्याग करणारे हेच !

पण तरीही प्रश्न सुटला नाही तो नाहीच. संन्याशाच्या मुलांना मुंजीचा अधिकार सांगायला आळंदीत एकाही शास्त्र्याची पोथी पुढे आली नाही. आळंदीकरांनी या भावंडांना शास्त्रनिर्णयासाठी पैठणची वाट दाखवली. पण तिथेही तेच. ज्ञानेश्वरांनी पैठणच्या नागघाटावर रेडामुखी वेद वदवलेले पाहून पैठणकर चकित झाले. त्यांना या मुलांचे अलौकिकपण कळून चुकले. ते म्हणाले, 'अशा लोकोत्तरांना आम्ही शुद्धिपत्र ते काय द्यायचे ! गंगेला कोणी धुवावे ? अग्नीला कोणी शुद्ध करावे !' अर्थात् पैठणच्या पंडितांनी काढलेली ही पळवाट होती. एतावता त्या भावंडांना शुद्धिपत्र मिळाले नाही आणि त्यामुळे त्यांचे उपनयन होऊ शकले नाही. ती भावंडे शेवटपर्यंत चहू आश्रमांहून वेगळीच राहिली.

आईबापांची शिरावरची सावली गेली अन् ही भावंडे उघडी पडली. निवृत्ती आठ वर्षांचेच होते; पण तरीही आपोआपच त्यांच्याकडे वडीलपण आले. कोरान्न मागून ही मुले निर्वाह करीत. पण ते तरी सुखाने मिळत होते का ? मुळीच नाही. तोंडभर अपशब्द ऐकावे, तेव्हा मूठभर दाणे झोळीत पडावे. ते अपमानित अन्न खाताना त्या कटु वचनांची जळजळ ज्ञानेश्वरांना असह्य होत असावी.

एक दिवस ते भिक्षेहून आले, ते अपमानाच्या ज्वाळांनी जळतच. कोणाचेही दर्शन नको म्हणून ते खोपटात शिरले आणि ताटी लावून घेऊन आत बसले पाठीमागून आली मुक्ता. ती मुळातच मानापमानातून ' मुक्ता ' होती. तिने ताटी बंद पाहिली. ज्ञानेश्वर जगावर रुसल्याचे त्या ब्रह्मींच्या चित्कळेला उमगले. जरा लहान तोंडी मोठा घास घेऊन ती बोलली, ' ताटी उघडा ज्ञानेश्वरा ! '

" हे पाहा, पावन मनाच्या योग्याने जनांचे अपराध पोटात घालावे. विश्व रागाने अग्नी झाले असेल, तर संताने पाणी व्हावे ... "

आणि या सगळ्या विनवणीचा गाभा हा, की ' तुम्हि तरूनि विश्व तारा ! ' एवढीशी चिमुरडी मुक्ता. पण तिची अध्यात्माची झेप पाहताना कल्पनेलाही थकवा येतो. आणि म्हणूनच चौदाशे वर्षे जगलेल्या योगसिद्ध चांगदेवाचे गुरुपद ती भूषवू शकली. खरे म्हणजे बाहुलीला मूल समजून खेळ खेळण्याचे तिचे ते दिवस. पण तिने या जुनाट, जख्खड म्हाताऱ्याला आपला मुलगा मानले. तिने त्याचा निजबोधाचा पाळणा हालवल्यावर त्याने उद्गार काढले. ' चांगा म्हणे आईपोटी आलो ! '

तुम्हाला जर त्या सोनपिंपळाची सळसळती भाषा समजणे शक्य असेल, तर ज्ञानेश्वरमंडळाचा सगळा बालपणाचा वृत्तान्त तो तुम्हाला ऐकवील.

डाव्या हाताचा पिंपळपार ही एकनाथमहाराजांच्या ध्यानाची जागा. ' अजानवृक्षाची मुळी माझ्या कंठाला लागली आहे; ती तू येऊन सोडव. ' हा ज्ञानेश्वरांचा दृष्टान्त घेऊन ते आळंदीस आले. पण त्यांना समाधीचे द्वारच सापडेना. कोणी सांगू शकेना. शेवटी या पारावर बसून त्यांनी ध्यान धरले. त्या अवस्थेत त्यांना द्वार सुस्पष्ट दिसले. मग ते चिरा काढून आत गेले. मुळीचे केवळ निमित्त. त्यातला आशयही गर्भित. ज्ञानेश्वरांना नाथांशी जीवींचे हितगुज बोलायचे होते. ज्ञानेश्वरीचे संशोधन आणि प्रसार यासंबंधी आदेश घेऊन ते समाधीतून बाहेर पडले.

ते कार्य त्यांनी लगेच सुरू केले. ज्ञानेश्वरीचे पाठसंशोधन करून त्यांनी ज्ञानेश्वरीची संशोधित प्रत तयार केली. तीनशे वर्षांच्या काळानंतर नाथांच्या काळी ज्ञानेश्वरी जागी होऊन उठली आणि मराठी जनतेला अमृतरसाचा पान्हा पाजू लागली. अजूनही तिच्या त्या कार्यात खंड नाही.

याच पिंपळपारासमोर सभामंडपाच्या डाव्या अंगाला ओळीने दोन समाध्या

आहेत. डाव्या हाताची ती केसरीनाथांची आणि उजव्या हाताची ती भोजलिंगबोवांची. केसरीनाथ हे नाथसंप्रदायातले अधिकारी पुरुष होते. भोजलिंगबोवा हे जातीने सुतार अन् वृत्तीने योगारूढ. हे ज्ञानेश्वरांचे समकालीन होते. वयाने वडील असल्यामुळे ज्ञानेश्वर त्यांना काका म्हणत.

तिथून पुढे गेल्यावर गाभाऱ्याच्या पूर्व बाजूला लागून एक गवाक्ष आहे. ते यात्रेच्या गर्दीत स्त्रियांना दर्शन घेण्यास उपयोगी पडते. तिथेच जवळ एक सोळखांबी मंडप आहे. तो हेमाडपंती धर्तीचा आहे. त्याच्या दक्षिण अंगाला ज्ञानेश्वरांचे शेजघर आहे. इथे महाराजांच्या पादुका ठेवलेल्या असतात. समाधीच्या थेट पाठीमागे मुक्ताबाईचे मंदिर आहे. तिथे कटेवर कर ठेवून रखुमाईसारखी मुक्ता उभी आहे. समाधीच्या पश्चिम अंगाला सिद्धेश्वराचे मंदिर आहे. गाभारा, मंडप आणि नंदीची जागा असे याचे तीन भाग पडतात. गाभाऱ्यात स्वयंभू शिवलिंग आहे. या क्षेत्रातले आद्य स्थान ते हे. या देवळाचे बांधकाम सुमारे तीनशे वर्षांपूर्वीचे आहे.

पाषाणनंदीच्या खालीच समाधीचे द्वार आहे असे सांगतात. एकनाथ इथूनच खाली गेले आणि परत आल्यावर त्यांनी ते बुजवून टाकले. मी तिथे उभा राहून त्या जागेवर टक लावले. पण चर्मचक्षूंचे किरण आत शिरेनात. मज अभाग्याला ज्ञानचक्षू कुठले ! मन केवळ कल्पना करू लागले—

इथे खाली बेल-तुळशींच्या आस्तरणावर ज्ञानियांचे राजे सिद्धासन घालून बसलेले असतील. दोन्ही करकमळे जानूवर ठेवलेली असतील. डोळां 'भीममुद्रा' लागलेली असेल. सभोवती प्रभावलय स्फुरण पावत असेल. आणि आसनावर सच्चिदानंद स्वरूप ज्ञानेश्वर 'निष्कलं निष्क्रियं शांतम् !'

आणि मला वाटले, नामदेवाचा त्या प्रसंगीचा तो टाहो अजूनही इथल्या वातावरणात सूक्ष्मपणे घुमून राहिला आहे. कापूर जळून जावा आणि अव्यक्त असा वास तेवढा नाकाशी जाणवत असावा, तसा ! पाण्याचा लोंढा निघून जावा आणि भूमीवर ओल्हासा तेवढा उरावा, तसा ! 'ब्रह्मी ज्ञानराज मेळविला' असा तो प्रसंग. त्या प्रसंगावर नामदेवाने अभंग रचले आहेत. काळजाचा गाभा पिळून निघालेले ते विलापकाव्य आहे. तो विलाप म्हणजे अजविलाप नव्हे. रतिविलापही नव्हे. त्याला पार्थिवतेचा वारासुद्धा लागलेला नाही. आपला भक्तिमार्गातला सखा, विठ्ठलाचा ज्ञानी भक्त, संतमंडळाचा मूर्त जिव्हाळा,

आत्मप्रकाशाने विश्व उजळणारा महात्मा आणि जगाचा कोवळा सद्गुरू, समाधीत कायमचा डोळ्याआड होतो, म्हणून नामदेवाच्या वाणीचा तो काव्यमय आक्रोश आहे—

**कासावीस प्राण मन तळमळी**
**जैसी का मासोळी जीवनाविण ।।**
**दाही दिशा वोस वाटती उदास**
**करिताति सोस मनामाजी ।।**
**घातियेली घोण प्राण आला कंठी**
**ज्ञानदेवासाठी तळमळी ।।**
**नामा म्हणे देवा वाटतसे खंती**
**चालली विभूती योगियांची ।।**

ज्ञानेश्वरांच्या वयाला अवघे बाविसावे वर्ष. पण त्यांनी तेवढ्या तरुण वयातच जीवत्समाधी घेण्याचे ठरवले. शके १२१८ ची कार्तिक वद्य त्रयोदशी हा दिवस त्यासाठी निश्चित केला. शुद्ध एकादशीस पंढरीच्या वारीला जाऊन त्यांनी पांडुरंगाला आपला मनोदय कळवला. देवाने मन मारून संमती दिली. सगळ्या संतांना ही वार्ता कळली. ते उदास, अस्वस्थ झाले. पंढरीचा 'पोहा' त्यांच्यासंगे अलंकापुरी म्हणजे आळंदीस आला. इंद्रायणीच्या अल्याड पल्याड पताकांचे भार जमले. रखुमाईसह पांडुरंगही आला. आळंदीस भजन-कीर्तनांची गर्दी उडाली. एकादशीला हरि जागर झाला. द्वादशीला सर्वांनी ज्ञानेश्वरांच्या पंक्तीला पारणे केले. त्रयोदशीच्या दिवशी नामदेवाचे पुत्र नारा-विठा यांनी आधीच तयार करून ठेवलेल्या समाधिस्थानाची झाडसारव केली. वर बेल-तुळशी आंथरल्या. ज्ञानेश्वर निरवानिरव करू लागले. प्रथम त्यांनी आपल्या सद्गुरूचे म्हणजे निवृत्तिनाथांचे पदवंदन केले.

निवृत्ती म्हणजे हर्ष-शोकांच्या पार गेलेला स्थितप्रज्ञ ! गांभीर्याचा सागर आणि धैर्याचा हिमाचल ! पण तो ओसंडून, गदगदून ज्ञानेश्वरांना आळवू लागला. बांधल्या तळ्याचा पाट फुटावा अन् ओघ बारा वाटा मुरडावे, बांधल्या तृणाचा आळा सुटावा आणि तणकाड्या रानोमाळ पांगाव्या तशी निवृत्तिनाथांची अवस्था झाली. ज्ञानेश्वर त्यांना कृतज्ञतेच्या भराने संबोखू लागले. शिष्य गुरूला शांतीचा उपदेश करू लागला –

**पाळिले पोशिले चालविला लळा**
**बा माझ्या कृपाळा निवृत्तिराजा ।।**

त्या बोलांनी निवृत्तिनाथ आणखी विरघळले. त्यांनी ज्ञानेश्वरांच्या मुखावरून हात उतरला. शिष्याचे मुखकमल नेत्रात साठवून घ्यायचे; पण अश्रू त्याला जागा देईनात. दाटलेल्या जनसंमर्दाकडे पाहून निवृत्ती बोलले, ' माझे निधान आज चालले. '

**वरिष्ठांच्या आधी कनिष्ठाचे जाणे**
**केले नारायणे उपराठे ।।**

' याने आजवर माझी कधी अमर्यादा केली नाही. माझे गुरुपण आणि आपले शिष्यपण सिद्धीला नेले. याच्यासारखे आता कोणी भेटायचे नाही. '

सोपान आणि मुक्ता प्राण कासावीस करू लागली. तेव्हा पांडुरंगाने पुढे होऊन त्यांना पोटाशी धरले. नामदेवाला गहिवर फुटला तो आवरेना. स्वतः व्याकुळ झाला; पण देवाला विनवू लागला. ' करा समाधान निवृत्तीचे. '

नंतर ज्ञानेश्वरांनी देवाला १०८ ओव्यांचे नमन केले. सकल संतांना अष्टांगी दंडवत घातले. अवघ्या संतांनी त्यांना नमिले. पांडुरंगांनी त्यांच्या कपाळी केशरी गंधाचा टिळा लावला. गळचात पुष्पहार घातला. ' फार केले कष्ट जगासाठी ' म्हणून देवाने गौरवले. ज्ञानेश्वरांचा एक हात देवाने आणि दुसरा हात निवृत्तींनी धरला. ज्ञानेश्वरांची रातोत्पलासारखी पावले समाधीच्या पायऱ्या उतरू लागली. त्यासरशी संतमंडळीला शोकाचे कढ आले. जनवन दुःखाने कालवले. दाही दिशा, वरचे आकाश, जणू ओस, भिगुळवाणे झाले. देवाने विचारले, ' काय अखेरचे मागणे ? '

**ज्ञानदेव म्हणे सुखी केलो देवा**
**पादपद्मीं ठेवा निरंतर ।।**

ऐन तारुण्यात देहापासून अलग होण्याच्या वेळचे ज्ञानेश्वरांचे हे धालेपणाचे उद्गार ! त्यांच्याहून चौपट आयुष्य लाभलेल्या जीवांना खाऊन, पिऊन, त्यागून भोगूनही अंतकाळी हे शब्द उच्चारता येतील का ? देहासक्तीत गुरफटलेल्यांना, विषयपंकात खोलवर रुतलेल्यांना हे भाग्य कुठले ! ज्ञानेश्वरांना देवाने सुखी केले होते आणि ते सुख त्यांच्या आत्म्यात भरून ओसंडत होते. देव त्यांना वरदान बोलला. ' यावच्चंद्र दिवाकरौ तुझी समाधी स्थिर राहो ! '

देव आणि निवृत्ती बाहेर आले. समाधीच्या द्वारावर त्यांनी शिळा घातली. संतांनी समाधीवर फुले वाहिली. नामदेवाने प्रेमपडिभराने समाधीची पूजा केली. असा हा सगळा करुणरसाचा प्रसंग तिथे घडला.

अजूनही कार्तिक वद्य त्रयोदशीला आळंदीस मोठी यात्रा भरते. कार्तिक शुद्ध एकादशी पांडुरंगाची, वद्य एकादशी ज्ञानेश्वरांची. भजने, निरूपणे, नामघोष यांनी आळंदी त्या तीन दिवसांत दुमदुमून जाते.

अंतरातले बोलायचे, तर वारकऱ्यांना देवापेक्षा ‘ माउली ’चे प्रेम अधिक. संतदर्शनात देव सहजपणे जोडतो, हा त्यांचा दृढ विश्वास. पंढरीच्या वारी-प्रमाणेच आळंदीची वारी करण्याची प्रथा तुकोबांनी पाडली आणि आळंदीहून पालखी पंढरीस नेण्याचा प्रघात हैबतराव बाबांनी पाडला.

ज्येष्ठ वद्य अष्टमीला आळंदीहून पालखी निघते आणि आषाढी एकादशीस पंढरी गाठते. पालखीचा सरंजाम अंकली गावचे सरदार शितोळे यांच्या घराण्यातून येत असतो. त्यात दोन घोडे असतात. एक जरीपटक्यासाठी अन् दुसरा ज्ञानेश्वरांच्या स्वारीसाठी. त्याला नटवून सजवून मोकळा मिरवीत नेतात. ज्ञानोबाचा घोडा आळंदीत शिरला, की आबालवृद्ध त्याच्या दर्शनासाठी गर्दी करतात. तो सर्वांच्या कडून पूजा-नमस्कार घेतो आणि कोणालाही इजा करीत नाही.

माऊलीसंगे वारीला जाणाऱ्या भाविकांची सकाळपासून आळंदीत रीघ लागते. या लोकगंगेला वाटेत शेवटपर्यंत अनेक जनप्रवाह मिळतच राहतात. वाखरीस पोचेपर्यंत सरितेला सागराचे स्वरूप येते. खांद्यावर शिदोरीची पडशी, वर भगवी पताका, दुसऱ्या खांद्यावर कांबळ, गळ्यात टाळ किंवा वीणा, बायकांच्या डोक्यावर पितळी तुळशीवृंदावन, कंबर धोतराने आवळून बांधलेली आणि मुखी ‘ ज्ञानबा तुकाराम ’ हा मंत्र.

वारकऱ्यांत उतारवयाच्या, दुबळ्या देहयष्टीच्या माणसांचा भरणा कमी नसतो. पण आपल्याला प्रवास कसा झेपणार, वारी कशी पूर्ण होणार, याची चिंता कोणाच्याच मुखावर दिसत नाही. माउली सांगाती असल्यावर त्यांनी कशाला चिंता करावी ? शतके लोटली तरी अजून या श्रद्धेत तिळमात्र उणे-पणा आलेला नाही. समाजाच्या सर्व थरात अशाप्रकारे चिरकालीक अखूट श्रद्धा निर्माण करणाऱ्या संतांची थोरवी निःसंशय वादातीत आहे.

पालखीचे प्रस्थान निघण्यापूर्वी ज्ञानियांच्या राजाचा दरबार भरतो. मानकऱ्यांना नारळ वाटले जातात. ' जयशब्दो नमः शब्दः ' गर्जून उठतो. त्या दिवशी ज्ञानेश्वर आळंदीतच आजोळी पहिला मुक्काम करतात. पूर्वेकडील गणपतिदरवाजाजवळच एक बैठे जुनाट घर आहे. ते ज्ञानोबांचे आजोळ घर. पंढरीचा सोहळा आटोपून आषाढ वद्य दशमीस पालखी आळंदीस परत येते. तेव्हा शिणून भागून आलेल्या वारकऱ्यांना चक्रांकितबुवांच्या घरी झुणकाभाकरीचे जेवण मिळते.

सभामंडपाच्या उजव्या अंगाला अजानवृक्षाचा कट्टा आहे. मध्यम उंचीची रोपे तिथे दोन तीन ठिकाणी वाढून वाकलेली दिसतात. चारी अंगी भिंती उभारून तो भाग बंदिस्त केला आहे. ज्ञानेश्वरांनी आपल्या हातातली काठी समाधीच्या जवळच उभी करून ठेवली होती. तिचाच पुढे वृक्ष झाला अन् समाधीतून वर आला. साक्षात्कारासाठी भुकेलेले भक्त या अजानवृक्षाखाली बसून ज्ञानेश्वरीची पारायणे करतात. आळंदीला जायचे म्हणजे ज्ञानेश्वरी जवळ असणे उचित. तिथे बसून एखादा तरी अध्याय वाचणे त्याहून उचित. गीता ही योगेश्वर श्रीकृष्णाची तशी ज्ञानेश्वरी ही ज्ञानोबांची वाङमयमूर्ती आहे. तिचे तुम्ही अंतरंग अधिकारी व्हावे अशी त्यांची आस आहे. त्या गोष्टीचा मुळारंभ अजानवृक्षाच्या सावलीतच करावा आणि त्यामुळे होणारा चित्तप्रसाद घेऊन परत यावे, एवढे तरी सर्वांना सहजसाध्य आहे.



अजानवृक्ष

आपले मन भावप्रवण असेल, सांसारिक चिंतेचे गाठोडे इंद्रायणीच्या पुलापलीकडे टाकून तिथे जाणे झाले असेल, तर या आवारात प्रदक्षिणा करताना एक प्रकारचा सूक्ष्म सुगंध अनुभवाला येईल. हा ज्ञानदेवांच्या विकसित आत्म्याचा

सुगंध आहे. त्यांनी आपल्या हृदयद्वारी लावलेला मोगरीचा वेल तिथे बहरून हा सुगंध पसरीत आहे –

इवलेंसें रोप लावियलें द्वारी
त्याचा वेलु गेला गगनावरी ।।
मोगरा फुलला मोगरा फुलला
फुलें वेंचितां अतिभारू कळियांसी आला ।।

अमुक तमुक स्थान जागृत आहे, असे आपण म्हणतो, तेव्हा ती साक्ष आपल्या श्रद्धावंत मनाला अशाच कोणत्यातरी प्रकारे मिळालेली असते. भागवतधर्माशी ज्यांचे थोडेबहुत 'आतले नाते' आहे, त्यांना आळंदी जुनी वाटत नाही अन् परकीही वाटत नाही. अतिपरिचय घडला तरी त्या स्थळाची अवज्ञा होत नाही. भक्तीच्या डोळ्यांना इथे कैवल्य बागडताना आणि अद्वैत खेळताना दिसते.

इथले हे समाधिमंदिर शके १४९२ मध्ये पुरंदरच्या आंबेकर देशपांड्यांनी बांधले. मंदिराचा 'कलशाध्याय' पुण्याच्या नंदराम गवंड्याने रचला. मुख्य सभामंडप शिंद्यांचे दिवाण रामचंद्र मल्हार शेणवी यांनी शके १६८२ त बांधला. समाधीमागचे मुक्ताबाईचे मंदिर नरसिंहसरस्वतींनी शके १८०३ मध्ये निर्मिले. महाद्वार, दोन्ही बाजूंचा तट आणि ओवऱ्या शके १६७२ मध्ये काशीराव शिंदे यांनी बांधल्या. पश्चिमेचा पाणदरवाजा श्रीमंत बाळाजी बाजीराव यांनी वरील सालीच बांधला. गरुडपाराच्या मागे श्री. प्रसादे यांच्या वाड्याच्या आवारात असलेली दीपमाळ कान्होजी आंग्र्यांची थोरली भार्या लक्ष्मीबाई यांनी शके १६६५ त उभारली. गावाजवळचा इंद्रायणीवरचा सेतुबंध पुण्याचे श्री. आगरवाला यांनी शके १७४२ मध्ये केला.

तिथून बाहेर पडलात, की मागच्या बाजूला राम आणि विष्णू यांची सुंदर मंदिरे आहेत. समाधीच्या पश्चिमेस हरिहरेंद्र स्वामींचा मठ आहे, तोही प्रेक्षणीय आहे. हे स्वामी शके १७४१त पैठणहून आळंदीस आले. इंद्रायणीच्या पात्रात वरच्या बाजूला जे सिद्धबेट आहे, तिथे त्यांनी देहपातापर्यंत तप केले. सिद्धदशेतला 'अमृतानुभव' घेण्याची ज्ञानेश्वरांची हीच जागा होती असे सांगतात. सिद्धबेटासमोर पलीकडच्या तीराला ह. भ. साखरेबुवांचा साधकाश्रम आहे. हरिहरेंद्रस्वामींच्या मठाच्या पश्चिमेला दत्तमंदिर आणि त्याच्या पलीकडे

मल्लाप्पा वासकर या फडकऱ्यांची समाधी आहे. तिथून आणखी पुढे गेल्यावर नरसिंहसरस्वतींनी बांधलेले विठ्ठलरखुमाईचे मंदिर आहे. तिथल्या चौसोपीच्या वायव्यकोणात स्वामींनी समाधी घेतली आहे.

शिवाजीमहाराजांनी शके १५९३ त एका सनदेच्या द्वारे ज्ञानेश्वरांच्या महानैवेद्याची सोय केली आहे. शके १६६१ मध्ये बाळाजी बाजीराव यांनी आळंदी हा गाव हक्कासुद्धा श्रींकडे इनाम करून दिला आहे. पेशवे आळंदीच्या यात्रेस जात असल्याचे कागदोपत्री उल्लेख मिळतात.

आळंदीच्या राजरस्त्याने जायला लागले की जागोजाग प्रशस्त धर्मशाळा दिसतात. नाना जातींच्या लोकांनी आपल्या समाजाच्या सुखसोयीसाठी त्या बांधलेल्या आहेत. बारा मास त्या मोकळचा असल्या तरी कार्तिकी यात्रेच्या वेळी मात्र त्या भरून जातात. या रस्त्याला प्रथम गोरोबाकाकांचे मंदिर लागते. तिथून काही पावले चालल्यावर गावाच्या ईशान्येला ज्ञानेश्वरांनी चालवलेली भिंत दिसते. चांगदेव वाघावर बसून जेव्हा त्यांच्या भेटीला आला, तेव्हा ज्ञानेश्वर एका पडक्या भिंतीवर कोवळे ऊन्ह खात बसले होते. तीच भिंत चालवून ते चांगदेवाला सामोरे गेले. ती भिंत आज जिथे आहे, तिथेच त्यांची भेट झाली. चांगदेवाचे गर्वहरणही तिथेच झाले.

आळंदीला आलेला भक्तभाविक भिंतीच्या दर्शनाला यायचा अन् तिथली मूठभर माती घेऊन जायचा. होता होता भिंत तर संपलीच; पण तिथे तिचकाच खोल चर झाला. आता तिथे दगडी भिंत आहे अन् ती चंद्रभागा नावाच्या एका खानदेशी महिलेने बांधली आहे. तिच्यावर एकामागे एक अशा चारी भावंडांच्या संगमरवरी मूर्ती असून समोरच्या कोनाडचात चांगदेव हात जोडून आणि माथा नमवून बसलेला आहे. खरे म्हणजे या मूर्ती किशोरवयाच्या हव्या होत्या; पण



ज्ञानेश्वरांनी चालविलेली भिंत

त्या चाळिशीच्या घरातल्या दिसतात. मुक्ताई तर सर्वांत धाकटी; पण चार मुलांच्या आईसारखी ती पोक्त, स्थूल आहे. भिंतीशेजारीच भैरवाचे देऊळ आहे.

गेल्या काही वर्षांत आळंदीमध्ये आणखी एक देवस्थान उभे झाले असून ते मारवाडी वैष्णवांनी उभारले आहे. मंदिरात राधा-कृष्णाची मूर्ती सुरेख, सुंदर आहे. सभोवती धर्मशाळा, अतितीगृह आणि गोशाळा अशी त्याची रचना आहे. आळंदीत आता हीच वास्तू नवीन आणि आधुनिक पद्धतीची झाली आहे. यात्रेकरूचे नेत्र सहजपणे तिकडे आकृष्ट होतात आणि पाय नकळत त्या दिशेने चालू लागतात.

ज्ञानेश्वर हे रसेश्वरही होते. ज्ञानेश्वरीत सगळ्या रसांनी त्यांनी शांत-रसाच्या घरी पाहुणेर दिला आहे. आणि हे सगळे कर्तृत्व टीचभर ओवीवृत्तात एवढ्याशा साडेतीन चरणी ओवीत निकराचे तत्त्वज्ञान आणि परतत्त्वाला स्पर्श करणारे अप्रतिम काव्य ओतप्रोत करून त्यांनी त्या वृत्तावर ‘ओवी ज्ञानेशाची’ असा छाप उमटवून ठेवला आहे.

याच ओवीचा पुढे एकनाथ, मुक्तेश्वर, श्रीधर इत्यादी संतपंत कवींनी आधार घेतला आणि आपापली वाङ्मयनाटिका फुलवली. घरोघर स्त्रियांनीही तिचाच पालव धरला आणि हृदयंगम काव्य निर्माण केले. महाराष्ट्राची संस्कृती मुख्यत्वे ओवीतूनच अभिव्यक्त झाली आहे. संस्कृतात जे स्थान अनुष्टुभाचे तेच मराठीत ओवीचे.

ज्ञानेश्वरांनी मुमुक्षू साधकांसाठी ज्ञानेश्वरी लिहिली. स्वानुभवी परमहंसां-साठी अमृतानुभव रचला आणि जाणते अजाणते या सर्वांसाठी हरिपाठ निर्मिला. अशा प्रकारे ज्ञानेश्वर सर्वांचे कल्याणकर्ते झाले. तत्त्ववेत्त्या पुरुषांनी तर्काच्या बळावर अद्वैतापर्यंत मजल मारली; पण ते अद्वैत शुष्क होते. ज्ञानेश्वरांनी त्यात भक्तिप्रेम ओतले. बुद्धी आणि हृदय दोघांचेही त्यामुळे समाधान साधले. त्यांच्या चरित्रात काय किंवा ग्रंथात काय; विश्वप्रेमाचा महासागर भरलेला आहे. त्यांनी ज्ञानाला द्राक्षारसात बुडवून काढले आणि भक्तीला ज्ञानाचे डोळे जडवले. जग सत्य का मिथ्या या शुष्क वादात ते पडले नाहीत. भूतमात्री एकच श्रीहरी नांदतो आहे आणि तोच सर्वभावे सेव्य आहे, हे त्यांनी आळवून सांगितले आहे. ‘भूतां परस्परें जडो । मैत्र जीवाचे’ हेच विश्वधर्माचे रहस्य त्यांनी प्रकट केले आहे.

आणि म्हणूनच त्यांची वाणी स्वादू, मधू झाली आहे. त्यांचे अलौकिकपण दिसून येईपर्यंत समाजाने त्यांना अत्यंत तिरस्काराने वागवले. समाजाकडून ज्यांचा छळ होतो, त्यांची वाणी बहुधा तुसडी, कडूजहर होते; पण ज्ञानेश्वरांच्या वाणीत तसल्या दुर्गुणांचा वासवाराही नाही. ते शांतपणे अन् प्रसन्नपणे आपले तत्त्वज्ञान जनांना उपदेशितात. त्यांनी अवहेलत्या समाजाला क्षमा तर केलीच; पण ती केल्याची जाणीवसुद्धा उरू दिली नाही. 'अनाक्रोश क्षमा' म्हणतात, ते हिलाच !

· जगातले कित्येक 'धर्मस्थापनेचे नर 'ही क्रोधाला वश झालेले दिसतात. मतअस्थापकही आदळआपट करताना आढळतात. पण ज्ञानेश्वर मात्र कोणाला 'दुवाळी' होणार नाही, कोणाची 'भवई' उचलणार नाही, अशा मृदुतेने सर्वत्र बोलले आहेत. इतरांनी शब्दचर्चा, अर्थचर्चा केली. खंडनमंडनासाठी दंड थोपटले. पण ज्ञानेश्वरीत असला खटाटोप नाही. त्यांचे विवेचन भावार्द्र, रसाळ आणि गंगौघासारखे निर्मळ आहे. म्हणूनच ते धर्मसंकीर्तन वाटते. वारकरी ज्ञानेश्वरांना 'माउली' म्हणतात, ते उगीच नव्हे !

# माहूरची रेणुका

कान्यकुब्ज नावाचा देश होता. तिथे इक्ष्वाकुवंशातला रेणू नावाचा एक राजा राज्य करीत होता. त्याला प्रसेनजित असेही म्हणत. याला मुलीची भारी हौस. पण ती काही पुरी होईना. म्हणून त्याने यज्ञ करायचे ठरविले. पुत्रकामेष्टी करतात, तशी कन्याकामेष्टी केली. अग्निनारायण प्रसन्न झाला. तो एका सुंदर, लोभस कन्येला घेऊनच यज्ञकुंडातून वर आला. त्याने ती कन्या राजाला समर्पिली. रेणूराजाने तिचे नाव रेणुका असे ठेवले. तिचे दुसरे लाडके नाव कामली. ती राजाच्या घरी त्याला सुखसमाधान देत मोठी झाली. शिकली-सवरली.

लग्नाला योग्य होताच रेणूराजाला चिंता पडली. ही रूपगुणाची खाण आता कोणाच्या हाती निरवावी ? हिला अनुरूप वर कुठे मिळेल ? कुठे त्याला शोधायचे ? शोधून आणलाच तरी तो रेणुकेला पसंत पडायला नको का ? ती सुबुद्ध आहे, सुसंस्कृत आहे. कुणाच्याही गळ्यात माळ घालणार नाही. दाग-दागिन्यांना भुलणार नाही. मग आपण तिचे स्वयंवरच मांडले तर ? शेकडो राजपुत्र स्वयंवराला येतील. तिच्यासमोर उभे राहतील. मग तिला पसंतीचा वर निवडता येईल.

बेत पक्का झाला. स्वयंवराची तयारी सुरू झाली. देशोदेशींच्या राजांना कुंकुमपत्रिका गेल्या. शोभिवंत मंडप सिद्ध झाला. स्वागत-सत्काराच्या सर्व वस्तू उपस्थित झाल्या. लेणी, लुगडी, आहेर, मान-पान सगळे सगळे रुजू झाले.

स्वयंवराचा दिवस उगवला. राजे आणि राजपुत्र आपापल्या सरंजामानिशी येऊ लागले. ऋषी आणि मुनीही आले. मंडपात स्थानापन्न झाले. आणि थोड्याच वेळात सुवेष, सालंकृत अशी रेणुका मंडपात दाखल झाली. सर्वांना वाटले, दिवसा चंद्रकोर उगवली. सगळ्या मंडपावर चंद्रिकेप्रमाणे तिची प्रभा

पसरली. एक सखी तिची पाठराखीण होती. तिच्या खांद्यावर हात ठेवून रेणुका एकेका रांगेतून पुढे पुढे जाऊ लागली. प्रत्येक राजपुत्राला निरखीत निघाली. सगळ्या रांगा फिरली; पण एकही राजपुत्र तिच्या मनास येईना. सर्व राजपुत्रांच्या आकांक्षा तिने फोल ठरवल्या.

मग सहज तिची दृष्टी ऋषिमंडळीकडे गेली. भस्म लावलेले, जटा वाढवलेले, रुद्राक्षांच्या माळा गळ्यात घातलेले, शुभ्र वस्त्र पांघरलेले असे अनेक ऋषी उत्सुकतेने बसले होते. त्यात वृद्ध होते तसे तरुणही होते. रेणुका कुणाला वरते ही सर्वांनाच उत्कंठा होती. सर्व राजमंडळ उल्लंघून आली तरी तिने कुणालाच माळ घातली नाही, याचा त्या ऋषिमंडळीला अचंबा वाटत होता. पुढे काय होणार ? स्वयंवर होणार का मोडणार ? असे अनेक प्रश्न त्यांच्या मनात उमटत होते.

एवढ्यात रेणुकेची नजर एका ऋषिकुमारावर गेली. तो तरुण होता, तेजःपुंज होता. कुणीही क्षणभर थबकून पाहावे अशी त्याची आकृती होती. साक्षात तपानेच जणू त्याचे रूप घेतले होते. त्या रूपाचा रेणुकेला वेध लागला. काही क्षण दृष्टी स्थिरावून तिने त्याच्याकडे पाहिले. कोण होता हा भाग्यवंत? त्याचे नाव होते जमदग्नी.

ऋषिमंडळीतून वाट काढीत काढीत रेणुका तिथपर्यंत गेली. थोडी लाजली, आणि तिने अलगद वरमाला त्याच्या गळ्यात घातली. जमदग्नी क्षणभर स्तंभित झाला. मग चटकन उभा राहिला. केवढे महद्भाग्य रेणुकेच्या रूपाने त्याच्या पुढे उभे ठाकले होते ! दोघांची दृष्टादृष्ट झाली. आणि पुढच्याच क्षणी जमदग्नीने तिचा कोवळा हात आपल्या हाती घेतला.

केवढे आश्चर्य वर्तले होते ! सर्व राजपुत्रांना डावलून, सत्ता, संपदा आणि सौंदर्य कःपदार्थ मानून रेणुकेने एका पर्णकुटीत राहणाऱ्या तपोधनाला वरले होते. सगळा स्वयंवर-मंडप खडबडून उभा राहिला. सर्व राजपुत्रांनी मुठी आवळल्या. ' ओढा खाली त्या रेणूराजाला. त्या उन्मत रेणुकेलाही पकडा. या दोघांनी समस्त राजमंडळाचा अपमान केला. ' असे म्हणून सर्व राजांनी एकच गिल्ला केला. ते त्या दोघांच्या अंगावर धावले. आणि मग दुसरे आश्चर्य ! जमदग्नी कृतांत काळासारखा खवळला. रेणुका आणि तिचा बाप या दोघांना पाठीशी घालून मेरु पर्वताप्रमाणे उभा राहिला. गर्जून बोलला ' ज्याला आपला

जीव नकोसा झाला असेल त्याने पुढे यावे. ' त्याच्या नेत्रांतून धगधगते अंगार बाहेर पडू लागले. ते तपस्तेज साऱ्या राजमंडळाला दुर्दम्य ठरले. सगळेजण माना खाली घालून मंडपाच्या बाहेर पडले. आल्या वाटेने निघून गेले. रेणुकेला कृतार्थ वाटले.आपल्या पतीचा अभिमान वाटला. रेणूराजाने आपल्या जावयाचा सत्कार केला. जमदग्नी आपल्या नवोढा वधूला घेऊन आश्रमात आला.

हा आश्रम म्हणजेच सांप्रतचे माहूर क्षेत्र होय.

रेणुकेला जमदग्नीपासून पाच पुत्र झाले. सर्वांत धाकटा परशुराम. दशावतारातला सहावा अवतार म्हणून प्रसिद्ध झालेला अतुल पराक्रमी महापुरुष. ज़मदग्नी, रेणुका आणि परशुराम या तिघांचीही सामक्षा जिथे दिसते ते हे माहूर क्षेत्र.

रेणुका ही जमदग्नीची पत्नी, यापेक्षा परशुरामाची माता म्हणूनच प्रसिद्ध आहे. कारण परशुरामाची आगळी मातृभक्ती.

जमदग्नीच्या काळी नर्मदेच्या मुखापासून तो हिमालयापर्यंत हैहय कुळातल्या कार्तवीर्याचे साम्राज्य पसरले होते. हा सम्राट सत्तामदाने अविवेकी बनला होता. त्याने एके दिवशी जमदग्नीच्या आश्रमातील कामधेनू पळवून नेली; पण परशुरामाने तो दरोडा कार्तवीर्याला पचू दिला नाही. त्याने कुऱ्हाड उचलली, कार्तवीर्याची गाठ घेतली आणि त्याला कंठस्नान घातले. आपल्या पित्याच्या हत्येचा सूड घेण्यासाठी कार्तवीर्याच्या पुत्रांनी एके दिवशी जमदग्नीच्या आश्रमावर धाड घातली. ते जमदग्नीचा वध करून पसार झाले. पतीच्या निधनानंतर रेणुका सती गेली, तीही याच पुण्यक्षेत्रात.

माहूर म्हणजे मातापूर. आणि ही माता म्हणजे रेणुका. हे महाराष्ट्रातले नावाजते पुण्यक्षेत्र असले तरी ते आडवळणी आहे. नांदेड जिल्ह्यातल्या किनवट तालुक्यात विदर्भ व मराठा यांच्या सीमेवर ते वसले आहे. भोवताली सर्व डोंगराळ मुलूख. तिथपर्यंतचा प्रवास हा सुखप्रवास नसतो. पण तरीही साऱ्या अडीअडचणी सोसून माणसे त्या क्षेत्राची यात्रा करतात. कित्येक देशस्थ ब्राह्मणांची रेणुका ही कुलस्वामिनी आहे. ते तिच्या दर्शनाला जातात. कित्येक दत्तदर्शनाला जातात. कित्येक माहूरगड पाहायला जातात. मिळून तिथे अखंड यात्रा चालू असते.

रेणुका ही परशुरामाची माता तर आहेच, पण ती आता विश्वाची माता ठरली आहे. आदिशक्ती भवानी म्हणूनच तिची उपासना केली जाते. माहूर हे औट पीठातील एक प्रमुख पीठ आहे. त्याला मूळ पीठ असेच म्हणतात रामानंद कवी आपल्या स्तोत्रात असेच म्हणतो–

मातापुरी मूळ पीठी अंबिका
सगुणरूपे प्रकटली भवानी।

महाराष्ट्राप्रमाणेच कर्नाटकातही रेणुकेची उपासना होते. तिचे कन्नड नाव यल्लम्मा. यल्लम्मा म्हणजे सर्वांची माता म्हणजे जगन्माता. यल्लम्मा किंवा रेणुका ही मुळात भूमिदेवी असावी. रेणुकेचा वारुळाशी संबंध जोडलेला आढळतो. रेणुका ही वारुळातून जन्म पावली आणि वारुळातच अदृश्य झाली, अशी एक कथा दक्षिणेत प्रचलित आहे. दक्षिण कोकणात सांतेरी नावाची एक देवता दिसते. तीही भूमिदेवताच आहे. वारुळाच्या रूपातच तिची पूजा होते. रेणू म्हणजे सूक्ष्म मातीचे कण. अशा कणांचेच वारुळ बनते. तेच भूमिदेवतेचे प्रतीक. यावरून असे वाटते, की मुळात भूमिदेवता म्हणून दक्षिणेत लोकप्रिय असणारी यल्लम्माच आदिशक्तीचे एकरूप म्हणून स्वीकारली गेली असावी आणि परशुरामाची माता रेणुका हिचे चरित्र यल्लम्माच्या रूपाला जोडले गेले असावे.

रेणुकेचे मंदिर हेच इथले प्रमुख दर्शनीय स्थान. ते माहुरगडाच्या जवळ डोंगरात आहे. जमिनीपासून ते दीड मैल तरी उंचीवर असेल. तिथवर पोचायला सुमारे दीड हजार पायऱ्या चढाव्या लागतात. प्रथम भेटतात त्या रेणुकेच्या पादुका. त्यांचे दर्शन घेऊन आणखी काही पायऱ्या चढायच्या. मग आपण मंदिराच्या प्रवेशद्वारी येतो. तिथेएका अश्वत्थवृक्षातळी जमदग्नी शिवलिंगाच्या रूपात बसला आहे. त्याचे दर्शन घेऊन मग मंदिरात जायचे. देवीची मूर्ती नसून तांदळा आहे. त्यालाच चांदीचा मुखवटा चढवलेला असतो. दर्शन घ्यावे, निवांत बसावे, ध्यान धरावे ! मनीच्या आकांक्षा तिला निवेदाव्या. व्यथा–वेदना असतील तर त्या निवारण्यासाठी देवीचा कृपाप्रसाद मागावा आणि कुटलेला विडा प्रसाद म्हणून घेऊन बाहेर यावे. इथे तशीच वहिवाट आहे. भक्त आणि यात्रेकरू इतर अनेक गोष्टींबरोबर देवीला तांबूलच समर्पितात. तिला तीच आवडी.

रेणुकेच्या मंदिराशेजारी महालक्ष्मी आणि तुळजाभवानी यांची दोन छोटेखानी मंदिरे आहेत. म्हणजे आदिशक्तीच्या तिन्ही स्वरूपांच्या दर्शनाची एकाच जागी सोय झाली.



माहूरची रेणुका

इथले प्रमुख तीर्थ म्हणजे सर्वतीर्थ. हे परशुरामाने निर्माण केले आणि त्यात सर्वतीर्थांचे पावित्र्य आणले. म्हणून ते सर्वतीर्थ. जिथे रेणुकेचे वास्तव्य असे ते मातृतीर्थ. याला मोवाळे म्हणतात. यात्रेकरू त्यात स्नान करतात. आत उतरण्यासाठी फरसबंदी घाट आहे आतला झरा जिवंत आहे. शेजारीच रेणुकेची दहनभूमी. हे ठिकाण लझरी या नावाने ओळखले जाते. जवळच कमलतीर्थ आणि अमृतकुंड आहे.

इथून डोंगरी रस्त्याने सुमारे दीड कोस चालून गेले, की दत्तात्रयाचे स्थान लागते. या टेकडीला दत्त शिखर म्हणतात. दत्तात्रयाचे हे शयनस्थान आहे. प्रयागी प्रातःस्नान, करवीरात भिक्षाटण आणि मातापुरी शयन अशी दत्त, अवधूताची त्रिस्थळी आहे. नरसोबाची वाडी, औदुंबर आणि गाणगापूर ही अन्य दत्तक्षेत्रे. पण ती अलीकडची असून माहूर हे अतिप्राचीन दत्तक्षेत्र होय. इथे दत्तात्रेयाची एकमुखी मूर्ती आहे. मंदिराचे आवार प्रशस्त आहे. माहूरच्या सर्व देवस्थानांत हे देवस्थान संपन्न आहे. दसनाम गोसाव्यांपैकी भारती अभिधानाचा एक गोसावी या देवस्थानाची व्यवस्था पाहतो. त्या परंपरेतील अनेक महंतांच्या समाध्या दत्तमंदिराच्या परिसरात दिसतात.

हा दत्त हाच महानुभावांचा देवदेवेश्वर होय. महानुभावांचे संस्थापक

चक्रधरस्वामी. त्यांचा परमगुरू चांगदेव राऊळ. त्याला या क्षेत्रात दत्तअवधूताने वाघाच्या रूपात दर्शन दिले आणि आशीर्वादासाठी आपला पंजा त्याच्या मस्तकावर टेकवला. त्या स्पर्शाने चांगदेवाला दिव्य शक्ती प्राप्त झाली. उपास्य आणि परमगुरू अशा उभय स्वरूपात महानुभाव दत्ताला भजतात.

अर्थात महानुभावांचे हे दत्तस्थान म्हणजे वर उल्लेखलेले शिखरमंदिर नव्हे. ते आहे माहूर गावाजवळच्या एका पर्वतश्रेणीत. त्याची व्यवस्था महानुभावी महंताकडेच असते.

माहूर हे सुमारे १५० वर्षांपूर्वी जवळजवळ उपेक्षितच होते. विष्णुदास या सत्पुरुषाने अविरत उद्योगाने त्याचे महात्म्य वाढवले. यांचे नाव धांदरफळे. ते सातारा येथे मांध्यंदिन शाखेच्या ब्राह्मणकुळात जन्मले. तरुणपणीच वैराग्य आले, म्हणून त्यांनी गृहत्याग केला. माहूर येथे तपश्चर्या केली. तिथे त्यांना दत्तप्रभूंचे सगुणदर्शन झाले. नंतर त्यांनी संन्यास घेतला. मातृतीर्थावर मठ-स्थापना करून ते शेवटपर्यंत तिथे राहिले. विदर्भ-मराठ्यात रेणुकादेवीची उपासना लोकप्रिय केली. तिच्यावर व दत्तावर शेकडो पदे रचली. रेणुका-मातेच्या वात्सल्याचा उत्कट अनुभवही घेतला.


माहूर हे गाव आजमितीस लहान झाले असले तरी पुरातन काळी हे मोठे नगर असावे, असे अनुमानिता येते. कारण माहूरच्या आजूबाजूस कित्येक मैल नगरवस्तीच्या प्राचीन खुणा आढळतात.

इथला गड हा तिन्ही बाजूंनी दुर्गम असून एकाच बाजूने त्याचा पल्ला गाठता येतो. इथल्या भूसपाटीपासून ५०० फूट उंचीच्या पहाडावर माहूर गडाची उभारणी झाली आहे. आज तिथे बरीचशी पडझड आहे. जंगलही खूप वाढले आहे. सहसा कोणी तिकडे फिरकत नाही. ज्याला इतिहासाची आच आहे तोच त्याची मोहोर धरतो. प्रस्तुत क्षेत्राचे चतुर्विध महत्त्व सांगताना श्री. आनंद यात्री पुढीलप्रमाणे उपसंहार करतात–

" दत्तात्रेयाच्या सन्निधानामुळे माहूर ही गुरुभूमी आहे, रेणुकामातेच्या वास्तव्यामुळे ती मातृभूमी आहे, दासोपंत-विष्णुदासांच्या साक्षात्कारी स्मृती-मुळे ती संतभूमी आहे आणि एकान्त व प्रसन्नता यांनी रसरसलेल्या निसर्गामुळे ती स्वयंभू तपोभूमी आहे."

२०८८५

REFBK-0020795
REFBK-0020795


जळगांव
कृष्णेश्वर
ब्रम्हगिरी
पंचवटी
नाशिक
भिमाशंकर
पैठण
औरंगाबाद
अकोला
अमरावती
नागपूर
रामटेक
माहूर
वर्धा
मुंबई
देहू
आळंदी
चंद्रपूर
पुणे
सातारा
मोरगांव
तुळजापूर
नरहरी
सज्जनगड
पंढरपूर
औदुंबर
सोलापूर
कोल्हापूर
परशुराम क्षेत्र
करवीर
महाराष्ट्र राज्यातील तीर्थक्षेत्रे